अकोला । सोमवार
दि. २८ एप्रिल २०२५
वर्ष : १९ अंक : ५८
पाने : ८ + ४

दैनिक **अजिंक्य भारत** बातम्यांचा गतिमान पाठलाग

www.ajinkyabharat.com

स्वागत मूल्य ३ रुपये




सूर्यकुमारच्या धावांचा झंझावात (पान ७ वर..)




## आजचा सामना

राजस्थान
विरुद्ध
गुजरात

स्थळ : सवाई मानसिंह स्टेडीयम, जयपूर
वेळ : सायं. ७.३० वाजता.



## तापमान °C

विदर्भात आज

| जिल्हा | कमाल | किमान |
|---|---|---|
| अकोला | 42.9 | 27.6 |
| चंद्रपूर | 38.2 | 00.0 |
| ब्रम्हपूरी | 41.0 | 22.4 |
| अमरावती | 41.2 | 26.9 |
| वर्धा | 39.9 | 26.5 |
| नागपूर | 39.2 | 25.7 |
| यवतमाळ | 38.8 | 25.4 |
| गडचिरोली | 36.0 | 22.2 |
| वाशिम | 42.4 | 00.0 |
| भंडारा | 40.0 | 24.0 |
| गोंदिया | 37.4 | 24.6 |
| बुलढाणा | 40.2 | 25.8 |

# राज्यातील शेतकऱ्यांना मिळणार गुणवत्तापूर्ण बियाणे

**मुंबई: दि. २७ वृत्तसंस्था**

### फडणवीस सरकारचा निर्णय

राज्यातील शेतकऱ्यांसाठी महायुती सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या संदर्भातील घोषणा आज (दि.२७) केली.

आता आगामी खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांना गुणवत्तापूर्ण बियाणे देण्याचा निर्णय फडणवीस सरकारने घेतला आहे. या संदर्भातील माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या अधिकृत एक्स () अकाउंटवरून दिली आहे. फडणवीस यांनी म्हटले आहे की, शेतकऱ्यांना गुणवत्तापूर्ण बियाणे मिळालेच पाहिजे, यासाठी सातत्याने प्रयत्न होत असतात. सत्यप्रत बियाण्यांच्या (ट्रुथफुल सिड्स) उत्पादनापासून ते विक्रीपर्यंतच्या संनियंत्रणासाठी साथी पोर्टलची राज्यात



अंमलबजावणी करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. आता राज्यातील शेतकऱ्यांना इथून पुढे राज्यात खरीप हंगाम २०२५ पासून राज्यात सत्यप्रत बियाणांची विक्री, वितरण हे साथीपोर्टलद्वारे करावे लागणार आहे. राज्य सरकारच्या सरकारसाठीच्या या निर्णयामुळे आता शेतकऱ्यांना प्रमाणित आणि खात्रीशीर बियाणे उपलब्ध होईल. परराज्यात उत्पादित मात्र, राज्यात विक्री होणाऱ्या बियाण्यांवर यामुळे नियंत्रण ठेवणे शक्य होईल.

या निर्णयाचा निश्चितपणे आमच्या शेतकरी बांधवांना लाभ होई, असे देखील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे.

# पाकिस्तानला धडकी

## भारतीय नौदलाची युद्धासाठी तयारी

**मुंबई: दि. २७ वृत्तसंस्था**



जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताच्या तिन्ही संरक्षण दलांनी युद्ध सरावाद्वारे आपली ताकद दाखवण्यास सुरूवात केली आहे. आज अरबी समुद्रात तैनात असलेल्या भारतीय नौदलाच्या युद्धनौकांनी भव्य शक्तीप्रदर्शन करत जहाजविरोधी क्षेपणास्त्रांचे यशस्वी प्रक्षेपण केले.भारतीय नौदलाच्या जहाजांनी लांब पल्ल्याच्या अचूक आक्रमणासाठी आणि युद्धसज्जतेची चाचणी घेण्यासाठी विविध जहाजविरोधी क्षेपणास्त्रांचे परिक्षण केले. प्लॅटफॉर्म, प्रणाली आणि कर्मचाऱ्यांची तयारीची पडताळणी केली. भारतीय नौदल देशाच्या सागरी सीमांचे रक्षण करण्यासाठी आणि कधीही, कुठेही, कसेही, युद्धासाठी सज्ज आहे, असे भारतीय नौदलाने म्हटले आहे.

यापूर्वी, भारतीय नौदलाने अरबी समुद्रात स्वदेशी बनावटीची विमानवाहू युद्धनौका आयएनएस विक्रांत तैनात केली आहे. भारत आणि पाकिस्तानमधील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर हा एक धोरणात्मक संकेत मानला जात आहे. २२ एप्रिल रोजी जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर ही तैनाती करण्यात आली आहे. एक्स वर पोस्ट केलेल्या उपग्रह प्रतिमांमध्ये विक्रांत अरबी समुद्रात जाताना दिसत आहे.

### पाकिस्तानने भारताला दिली अणुबॉम्ब हल्ल्याची धमकी

**इस्लामाबाद :** पहलगाममध्ये झालेल्या अतिरेकी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यातील तणाव वाढण्यास सुरवात झाली आहे. पाकिस्तानचे मंत्री हनीफ अब्बासी यांनी भारताला अणुबॉम्ब हल्ल्याची धमकी दिली आहे. व्हायरल होत असलेल्या एका व्हिडीओमध्ये पाकिस्तानचे मंत्री हनीफ अब्बासी भारताला सिंधू नदीचे पाणी थांबवल्यास युद्धासाठी तयार राहण्याचा इशारा देताना दिसत आहेत. पाकिस्तानचे पाणी थांबवले तर भारताने युद्धासाठी तयार व्हावे. घौरी, शाहीन, गझनवी ही क्षेपणास्त्र फक्त प्रदर्शनासाठी नाहीत. भारताला उत्तर देण्यासाठीच ठेवली आहेत. आम्ही १३० अण्वस्त्रे प्रदर्शनात मांडण्यासाठी ठेवलेली नाहीत. ती पाकिस्तानात कुठे आहेत हे तुम्ही पाहू शकत नाही. पण हवी तेव्ही आम्ही ती वापरू; या शब्दात पाकिस्तानचे मंत्री हनीफ अब्बासी यांनी भारताला अणुबॉम्ब हल्ल्याची धमकी दिली आहे.

# दिल्लीत ५ हजार पाकिस्तानी नागरिकांची ओळख पटवली

**नवी दिल्ली : दि. २७ वृत्तसंस्था**

पाकिस्तानी नागरीकांचा भारत सोडण्याचा आज शेवटचा दिवस आहे. आजपासून पाकिस्तानी नागरिकांचे अल्पकालीन व्हिसा रद्द होणार आहेत.

दरम्यान, गुप्तचर विभागाने दिल्लीत राहणाऱ्या सुमारे ५ हजार पाकिस्तानी नागरिकांची ओळख पटवली आहे. जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर केंद्र सरकारने गुप्तचर विभागाला दिल्लीत राहणाऱ्या पाकिस्तानी नागरिकांची यादी देण्याचे निर्देश दिले होते.

त्यानुसार गुप्तचर विभागाने दिल्लीत राहणाऱ्या सुमारे ५००० पाकिस्तानी नागरिकांची यादी शहर पोलिसांना दिली आहे. फॉरेन रीजनल रजिस्ट्रेशन ऑफिस ने ही यादी पोलिसांच्या विशेष शाखेकडे पाठवल्यानंतर पडताळणीसाठी ती जिल्हा युनिट्सकडे पाठवली आहे. यादीतील अनेक पाकिस्तानी नागरीकांचे व्हिसे रद्द करण्यात आले आहेत.

दीर्घकालीन व्हिसाअसलेल्या विशेषतः हिंदू पाकिस्तानी नागरिकांना सूट देण्यात आली आहे. गृह मंत्रालयाने स्पष्ट केले आहे की, २७ एप्रिलपासून वैद्यकीय, राजनैतिक आणि दीर्घकालीन व्हिसा वगळता उर्वरित व्हिसे रद्द केले जातील. त्यामुळे दिल्लीत हालचालींना वेग आला असून अधिकारी ३,००० आणि २००० नावांच्या दोन वेगवेगळ्या यादींमध्ये नावे जुळत आहेत का, याची पडताळणी करत आहेत.

# जेवणातून ६०० जणांना विषबाधा; एकाचा मृत्यू

**छत्रपती संभाजीनगर : दि. २७ वृत्तसंस्था**

छत्रपती संभाजीनगर येथे कन्नड तालुक्यात एका लग्न समारंभातील जेवणातून तब्बल ६०० जणांना विषबाधा झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या घटनेत एकाचा मृत्यू झाला असून अनेकांची प्रकृती गंभीर असल्याचे समोर आले आहे. सध्या सर्व पीडितांवर खाजगी तसेच सरकारी रुग्णालयात उपचार सुरू झाले आहेत. मात्र या घटनेनंतर संपूर्ण परिसरात एकच खळबळ उडाली आहे.अंबाडा येथे शुक्रवारी आदिवासी ठाकर समाजातील आठ मुलींचा सामूहिक विवाह सोहळा पार पडला. यामध्ये अंबाळासह महादेव खोरा, तांदूळवाडी, घुसुर आणि इतर ३२ ठाकरवाड्यातील वऱ्हाडी आले होते. विवाह सोहळा संपन्न झाल्यानंतर विवाहासाठी आलेल्या सर्व मंडळींनी जेवण केले. मात्र या जेवणातून अनेकांना उलटी आणि चक्कर येण्यास सुरुवात झाली. एकामागोमाग एक जण रुग्णालयात दाखल झाल्यानंतर विषबाधा झाल्याचे समोर आले.

या विवाहसोहळ्यात अंबाला येथील ग्रामस्थांसह कळंकी, महादेवखोरा, तांदुळवाडी, घुसुर, निमडोंगरी, शिपघाट, कोळवाडी, खोलापूर, धामडोह, ठाकुरवाडी, कन्नड तालुक्यासह निरगुडी पिंपरी तसेच नाशिक, जळगावमधील ३२ ठाकरवाड्यातील पाहुण्यांनी विविध गावातील जवळपास ६०० जणांना जेवणातून विषबाधा झाल्याची माहिती समोर आली. या घटनेत सुरेश गुलाब मधे (८) या बालकाचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. तर १७ लोकांची प्रकृती गंभीर असून त्यांच्यावर उपचार सुरु आहेत.सध्या गंभीर प्रकृती (पान २ वर)

# कार विहिरीत कोसळली; सात जणांचा मृत्यू



**मंदसौर : दि. २७ वृत्तसंस्था**

मध्य प्रदेशमधील मंदसौर जिल्ह्यातील नारायणगड येथे देवदर्शनासाठी निघालेल्या भाविकांची कार चालकाचे नियंत्रण सुटल्याने दुचाकीला धडकली आणि रस्त्याच्या बाजूला असलेल्या विहिरीत कोसळली. या अपघातात ७ जणांचा मृत्यू झाला, तर चार जण जखमी झाले. रविवारी दुपारी ही घटना घडली.नारायणगड पोलीस स्टेशन परिसरातील बुढा-तकरवत क्रॉसिंगवर रविवारी दुपारी २ वाजण्याच्या सुमारास हा अपघात झाला. भरधाव कारने पहिल्यांदा एका दुचाकीला धडक दिली आणि नंतर ती बाजूच्या विहिरीत पडली. या अपघातात आतापर्यंत एकूण ७ जणांचा मृत्यू झाल्याची नोंद झाली आहे. दुचाकीस्वार गोबर सिंग (रा. आबाखेडी) याचा जागीच मृत्यू झाला. तर जखमींना वाचवण्यासाठी विहिरीत (पान २ वर)

## थोडक्यात

### पवार कुटुंबाच्या मनोमिलनावर भुजबळांनी केले वक्तव्य



**मुंबई :** मागच्या काही दिवसांपासून उद्धव आणि राज ठाकरे एकत्र येणार या चर्चांनी जोर धरला आहे. एवढंच नाहीतर नसेचे प्रमुख राज ठाकरे आणि ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनीदेखील या युतीबाबत प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे सकारात्मक विधानं केली आहेत. त्यामुळे ठाकरे बंधू एकत्र येणार ही चर्चा रंगली आहे. या पार्श्वभूमीवर ठाकरेंनंतर पवार काका पुतणे एकत्र येईल या चर्चादेखील रंगू लागल्या. यादरम्यान अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचे नेते तथा आमदार छगन भुजबळ यांनी एक मोठं विधान केले आहे. उद्धव ठाकरे आणि राज ठाकेर हे लहानपणापासून एकत्र आहेत. आऊ साहेब आणि बाळासाहेब ठाकरे राजावर सर्वात जास्त प्रेम करत होते. राजा म्हणजे राज ठाकरे. पण राजकारणामुळे थोडी दरी झाली. सर्व घराण्यांनी एकत्र यावे. पवार कुटुंब पण एकत्र यायला पाहिजे. तसं झालं तर मला त्याचा आनंदच होईल, अशी छगन भुजबळ यांनी दिली.

### महाराष्ट्र बेघरमुक्त राज्य होणार–फडणवीस




**पुणे :** प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत ग्रामविकास विभागाने उत्तम कामगिरी केली असून केंद्राकडून आणखी १० लाख घरांना मान्यता मिळणार आहे. घर मंजूर झाल्यावर जमीन उपलब्ध करून देण्यासाठी मोहीम स्तरावर काम करावे. तसेच, एकही व्यक्ती बेघर राहणार नाही यासाठी प्रयत्न करावेत आणि राज्याला देशातील पहिले बेघरमुक्त राज्य करावे. प्रशासन लोकाभिमुख आणि गतिशील करण्यासाठी मनुष्यबळाचे योग्य व्यवस्थापन आणि तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करावा, असे आवाहन मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यशदा, पुणे येथे 'ग्रामविकास व पंचायतराज विभाग राज्यस्तरीय कार्यशाळा' येथे प्रमुख उपस्थिती दर्शवली.

# १० दहशतवाद्यांची घरे जमीनदोस्त

## स्थानिक दहशतवाद्यांवर सुरक्षा दलांची मोठी कारवाई

**श्रीनगर : दि. २७ वृत्तसंस्था**



जम्मू आणि काश्मीरमधील पुलवामा येथे पर्यटकांवर झालेल्या हल्ल्यापासून, अधिकारी दहशतवाद्यांवर मोठी मोहीम राबवत आहेत. या क्रमाने, सुरक्षा दलांनी मोठी कारवाई केली आहे आणि आतापर्यंत १० दहशतवाद्यांची घरे उद्ध्वस्त केली आहेत. जम्मू आणि काश्मीरमध्ये उपस्थित असलेल्या स्थानिक दहशतवाद्यांवर सुरक्षा दलांनी केलेली ही एक मोठी कारवाई आहे. गेल्या ६ दिवसांत १० दहशतवाद्यांची घरे उद्ध्वस्त करण्यात आली आहेत.या दहशतवाद्यांची घरे स्फोटांद्वारे उडवली जात आहेत. यानंतरही सुरक्षा दलांची ही कारवाई अजूनही सुरूच आहे. आम्ही तुम्हाला सांगतो की यापूर्वी फक्त ६ दहशतवाद्यांची घरे उडवून देण्यात आली होती आणि त्यानंतर आता इतर ४ दहशतवाद्यांची घरेही उडवून देण्यात आली आहेत. यामध्ये लष्कर-ए-तोयबाचा दहशतवादी फारुख अहमदचा समावेश आहे, जो सध्या पाकिस्तानात आहे. याशिवाय, मोहम्मद शफी दार यांचा मुलगा अदनान सफी दार यांचे आणखी एक घर पाडण्यात आले आहे. तो शोपियान जिल्ह्यातील आणखी एक सक्रिय दहशतवादी आहे, जो २०२४ पासून लष्कर आणि टीआरएफसाठी संयुक्तपणे काम करत होता.बांदीपोरा येथील अब्दुल अहद शीर गोजरी यांचा मुलगा जमील अहमद शीर गोजरी यांचे घर स्फोटात उद्ध्वस्त झाले. तो २०१६ पासून सक्रिय दहशतवादी आहे. त्याच वेळी, खासीपोरा त्राल जिल्हा पुलवामा येथील रहिवासी नजीर अहमद वाणी यांचा मुलगा सक्रिय दहशतवादी अमीर नजीर वाणी यांचे निवासी घर देखील एका संशयास्पद स्फोटात उद्ध्वस्त करण्यात आले आहे.

### कोणत्या दहशतवाद्यांची घरे जमीनदोस्त करण्यात आली

आदिल हुसैन ठोकर, अनंतनाग (लष्कर–ए–तैयबा), आसिफ शेख, त्राल (लष्कर–ए–तैयबा), शाहीद अहमद कुट्टे, शोपियान झाकीर अहमद गनई, कुलगाम (लष्कर) अहसान उल हक, पुलवामा आमिर नजीर वानी, अवंतीपोरा (जैशमोरा अहमद गोमेदरा) (२०१६ पासून सक्रिय) अमीर अहमद दार, शोपियान (लष्कर–ए–तैयबा) अदनान साफी दार, जैनपोरा आणि टीआरएफचे फारुख अहमद टेडवा, कुपवाडा

# पाकचे पाणी बंद केले नाही, सरकार जनतेची दिशाभूल करत आहे

**शिर्डी : दि. २७ वृत्तसंस्था**

## प्रकाश आंबेडकर यांची टीका



भारताने पाकिस्तानचे पाणी बंद केलेले नाही, सरकार खोटं बोलत असून देशातील नागरिकांची दिशाभूल करत आहे. २४ एप्रिल रोजी केंद्रीय सचिवांनी पाकिस्तानला लिहिलेल्या पत्राचा दाखला देत वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी सरकारच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित केले आहेत.

पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर प्रतंप्रधान नरेंद्र मोदींसोबत गृहमंत्री अमित शाह, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्यासह वरिष्ठ अधिका-यांची बैठक झाली. त्यानंतर, भारताने पाकिस्तानची कोंडी करणारे ५ महत्त्वाचे निर्णय घेतले. त्यामध्ये, पाकिस्तानची पाणी कोंडी करत सिंधू जल वाटप कराराला स्थगिती दिल्याचे सांगण्यात आले. प्रकाश आंबेडकर यांनी पाकिस्तानला पाणी बंद केल्यासंदर्भाने दिलेले पत्रच त्यांनी दाखवले. या पत्रामध्ये कुठेही पाणी बंद केल्याचा उल्लेख नाही. धरणातील पाणी आम्ही सोडणार नाही, असा कुठेही उल्लेख नाही. याचाच अर्थ इंडस करार भारत सरकारने रद्द केलेला नाही, असे त्यांनी म्हटले.माझ्या भाषेत नरोबा कुंजोबा आणि कायद्याच्या भाषेत स्टेटस्को अस हे पत्र. त्यामुळे जनतेला हे पत्र दाखवले तर सरकार कुठल्या प्रकारची कारवाई करत आहे, हे समोर येईल. हा गंभीर मुद्दा असून शासनाने याकडे डोळे झाक करू नये. या सगळ्यात फक्त पाकिस्तानी नागरिकांचा भुसार रद्द करून त्यांना बाहेर काढता येत आहे, एवढीच वस्तूस्थिती असल्याचेही त्यांनी म्हटले.सिंधू जल कराराबाबत आंबेडकर म्हणाले, कोणताही करारनामा लगेच रद्द करता येत नाही, त्याच्यासाठी किंमत मोजावी लागते.

# 'पोप फ्रान्सिस' यांच्यावर अंत्यसंस्कार

## जगभरातील अनेक देशांचे राष्ट्रप्रमुख उपस्थित



**बॅसिलिका : दि. २७ वृत्तसंस्था**

ख्रिश्चन धर्मियांचे सर्वोच्च धर्मगुरू पोप फ्रान्सिस यांच्य पार्थिवावर आज हजारोंच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले. या प्रसंगी जगभरातील प्रमुख देशांचे राष्ट्रप्रमुख आणि कॅथोलिक चर्चचे वरिष्ठ पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित राहिले होते. पोप फ्रान्सिस यांचे सोमवारी वयाच्या ८८ व्या वर्षी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले होते.

राष्ट्रप्रमुख आणि राजघराण्यातील सदस्य सेंट पीटर्स स्वेअर येथील सामुहिक प्रार्थनेमध्ये सहभागी झाले. तर बॅसिलिका येथे पोप यांच्या दफनविधाला विविध देशांमधून आलेले शरणार्थी आणि कैदी उपस्थित राहिले होते. पोप फ्रान्सिस यांच्यासाठी बॅसिलिका चर्चमध्ये करण्यात आलेल्या सामुहिक प्रार्थनेसाठी तब्बल अडीच लाख लोकांनी (पान २ वर)

### ४० विशेष अतिथी

व्हॅटिकनच्या कॅरिटास चॅरिटी आणि सँट एजिडिओ समुदायाने आयोजित केलेले चाळीस विशेष पाहुणे बॅसिलिका येथे उपस्थित राहिले होते. यामध्ये पोप फ्रान्सिस यांनी पोप म्हणून प्राधान्य दिलेल्या दुर्लक्षित गट, बेघर लोक आणि स्थलांतरित, कैदी आणि ट्रान्सजेंडर लोकांना विशेष स्थान देण्यात आले होते.आजच्या दिवशी पोप यांना अखेरचा निरोप देण्यासाठी तब्बल अडीच लाख लोक पोप यांच्या अंत्यदर्शनासाठी राग लावून थांबले होते. शुक्रवारी संध्याकाळी बॅसिलिका चर्चचे दरवाजे बंद केले गेले होते. अंत्यदर्शनासाठी थांबलेल्यां हजारो जणांना पोप यांचे अंत्यदर्शन देखील मिळू शकले नाही.

# सिंहस्थ प्राधिकरणासाठी आराखडा सादर

## प्रयागराज धर्तीवर स्थापना : मंत्रिमंडळ मान्यतेसाठी सादर केला जाणार



### ...तर सिंहस्थ स्नानावर बंदी घाला

नाशिक : गोदावरी नदीच्या प्रदूषणमुक्तीसाठी उच्च न्यायालयाच्या आदेशांचे पालन प्रशासनाकडून होत नसल्याची खंत व्यक्त करत, नदी प्रदूषणमुक्तीसंदर्भातील आदेशांचे पालन करण्यासाठी न्यायालयाने सर्व शासकीय यंत्रणांना विशिष्ट कालमर्यादा घालून द्यावी, अशा आशयाचा अर्ज पर्यावरणप्रेमी राजेश पंडित यांनी मुंबई उच्च न्यायालयात दाखल केला आहे. कालमर्यादेत आदेशांची अंमलबजावणी न झाल्यास आगामी कुंभमेळ्यात गोदावरीत स्नानास बंदी घालावी, अशी मागणी पंडित यांनी या अर्जाद्वारे केली आहे.

**नाशिक :: दि. २७ वृत्तसंस्था**

नाशिक- त्र्यंबकेश्वर येथे २०२७ मध्ये होऊ घातलेल्या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी स्वतंत्र सिंहस्थ प्राधिकरण स्थापन करण्याचा आराखडा प्रशासनातर्फे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना सादर करण्यात आला.सिंहस्थ प्राधिकरण स्थापन करण्याचा आराखडा प्रयागराजच्या धर्तीवर तयार करण्यात आला असून, नगरविकास विभागाकडून हा आराखडा मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी सादर केला जाणार आहे. सिंहस्थाशी संबंधित प्रत्येक विभागाचा अधिकारी या प्राधिकरणात असणार आहे. त्याचप्रमाणे सिंहस्थाशी संबंधित निर्णय घेण्याचे अधिकार प्राधिकरणातील उच्चस्तरीय समितीकडे असणार आहेत.

आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या प्रशासकीय तयारीला वेग आला आहे. सिंहस्थासाठी नाशिक महापालिकेचा १५ हजार कोटींचा, तर अन्य शासकीय विभागांकडून नऊ हजार कोटी असा एकूण २४ हजार कोटींचा आराखडा शासनाला मंजुरीसाठी सादर करण्यात आला आहे. मात्र अद्याप या आराखड्याला मंजुरी मिळालेली नाही. सार्वजनिक बांधकाम विभाग वगळता अन्य विभागांच्या कामांना अद्याप निधी मिळालेला नाही. आता सिंहस्थाला जेमतेम दोन वर्षांचा कालावधी असताना सिंहस्थकामांना सुरुवात होऊ न शकल्याने साधू-महंतांमध्ये शासनाविषयी नाराजी वाढत आहे. त्यामुळे राज्य सरकारने आता सिंहस्थ नियोजनाला गती दिली आहे. काही महिन्यांपूर्वी नाशिकमधील अधिकाऱ्यांचे पथक प्रयागराज येथील महाकुंभमेळ्याच्या दौऱ्यावर जाऊन आले. सिंहस्थ कुंभमेळ्यात करावयाच्या (पान २ वर)

## पान 1 वरून...

### कार विहिरीत कोसळली...

उतरलेल्या दोघांचा विषारी गॅसमुळे गुदमरून मृत्यू झाला. तीन वर्षांच्या मुलीसह चार जखमींना वाचवण्यात आले आहे. त्यांना मंदसौर जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. दरम्यान, मृतांची संख्या वाढू शकते.कारमध्ये १३ लोक होते, जे उज्जैन जिल्ह्यातील उन्हेल येथून नीमच जिल्ह्यातील अंतरी माता मंदिरात दर्शन घेण्यासाठी जात होते. अपघातानंतर विहिरीतून क्रेनच्या मदतीने इको व्हॅन बाहेर काढण्यात आली. घटनेची माहिती मिळताच उपमुख्यमंत्री जगदीश देवदा, जिल्हाधिकारी अदिती गर्ग, एसपी अभिषेक आनंद, अतिरिक्त एसपी गौतम सोलंकी आणि एसडीओपी नरेंद्र सोलंकी घटनास्थळी पोहोचले.उपमुख्यमंत्री जगदीश देवदा यांनी सांगितले की, चालकाचे व्हॅनवरील नियंत्रण सुटल्याने व्हॅन रस्त्यावरून विहिरीत पडली. मृत्यूंची संख्या स्पष्ट नाही. व्हॅनमध्ये दोन मुले होती. चार जणांना वाचवण्यात आले असून त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. विहिरीत विषारी वायू असल्याने बचाव कार्य वेगाने सुरू आहे,'' असे ते म्हणाले.

### जेवणातून ६०० जणांना ...

असणाऱ्या पीडितांना पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथील रुग्णालयात हलवण्यात आले आहे. काही रुग्णांवर करंजखेड येथील ग्रामीण रुग्णालयात तर काही जणांवर खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहे. मात्र विषबाधा कोणत्या कारणामुळे झाले हे अद्याप समोर आले नाही.

### सिंहस्थ प्राधिकरणासाठी ...

सोयीसुविधांसाठी स्वतंत्र प्राधिकरण स्थापनेची शिफारस या पथकाने केली होती. त्यानुसार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सिंहस्थासाठी स्वतंत्र प्राधिकरण स्थापन करण्याची घोषणा केली होती. शुक्रवारी शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली प्राधिकरणासंदर्भात बैठक पार पडली. यावेळी पालक सचिव एकनाथ डवले, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम आणि आयुक्त मनीषा खत्री यांच्या उपस्थितीत प्राधिकरणाचा आराखडा सादर करण्यात आला.सिंहस्थ कुंभमेळ्याच्या नियोजनासाठी प्राधिकरणात महसूल, महापालिका, सार्वजनिक बांधकाम, जलसंपदा, पोलिस, महावितरण, स्मार्ट सिटी, राज्य परिवहन महामंडळ, न्हाई अशा विविध विभागांचे अधिकारी सदस्य असणार आहेत. भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी या प्राधिकरणाचा प्रमुख असणार असून, त्याच्या अध्यक्षतेखाली हाय पॉवर कमिटी अर्थात उच्चस्तरीय समिती असणार आहे. सिंहस्थाशी संबंधित संपूर्ण कामांचे नियंत्रण समितीकडे असणार आहे.

### 'पोप फ्रान्सिस' यांच्यावर ...

उपस्थिती लावली होती. तर पोप फ्रान्सिस यांची शवपेटी ठेवलेल्या मोटारगाडीच्या मार्गावर हजारो लोक रांगेत उभे होते, टाळ्या वाजवत आणि पापा फ्रान्सिस्कोचा जयजयकार करत होते. शहराच्या दुसऱ्या बाजूला असलेल्या सेंट मेरी मेजर बॅसिलिका येथील दफनभूमीत जागतिक रोमन कॅथोलिक चर्चच्या प्रमुखांचा दफनविधी करण्यात आला.

सेंट पीटर्स स्क्वेअरमध्ये सुमारे २ तास चाललेल्या या अंत्यसंस्कारात विविध विधी पार पडले. तत्पुर्वी स्वीस गार्डच्या वाहनातून पोप यांचे पार्थिव चर्चमध्ये नेण्यात आले. कार्डिनल्स कॉलेजचे ९१ वर्षीय डीन कार्डिनल जियोव्हानी बॅटिस्टा रे यांनी फ्रान्सिस यांच्या कार्याची प्रशंसा केली, ते लोकांचे पोप होते, ते एक असे पाद्री होते. ज्यांना अनौपचारिक, उत्स्फूर्त शैलीने आपल्यातील कमीत कमी लोकांशी कसे संवाद साधायचा हे माहित होते. ते सर्वांप्रती खुले मन असलेले लोकांमधील पोप होते, असे कार्डिनल यांनी सांगितले. पोप फ्रान्सिस यांच्या १२ वर्षांच्या पोप पदाच्या कार्यकाळात त्यांनी ख्रिश्चनांमधील कट्टरवादी प्रथांमधील सुधारणांना प्राधान्य दिले, याचा उल्लेख देखील कार्डिनलनी आवर्जुन केला. पोप फ्रान्सिस यांच्या अंत्यसंस्काराला अमेरिकेचे विद्यमान अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प, माजी अध्यक्ष ज्यो बायडेन, युक्रेनचे अध्यक्ष वोलोदायमिर झेलेन्स्की, संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस ऍन्टोनिओ गुटेरेस आणि ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर यांच्यासह ब्रिटनचे युवराज विल्यम्स आणि युरोपातील राजघराण्यांचे वंशज देखील उपस्थित होते. शिवाय १६० मान्यवर देखील या प्रसंगी उपस्थित होते. पोप फ्रान्सिस हे मूळचे अर्जेंटिनाचे नागरिक होते. त्या नात्याने अर्जेंटिनाचे अध्यक्ष झेवियर मिलेई हे देखील मान्यवरांमध्ये उपस्थित राहिले होते.पोप फ्रान्सिस यांच्या अंत्यसंस्काराच्या निमित्ताने अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प आणि युक्रेनचे अध्यक्ष झेलेन्स्की यांची अल्पकाळ भेट झाली. दोघांमध्ये अल्पकाळ संवाद देखील झाला. मात्र पोप फ्रान्सिस यांच्या अंत्यसंस्काराचे निमित्त असल्यामुळे कोणतीही राजकीय चर्चा यावेळी होऊ शकली नाही. शांततादूताला अंतिम निरोप देत असताना दोन्ही नेत्यांमध्ये शांततेची चर्चा झाली, असावी, असा अंदाज निरीक्षकांकडून व्यक्त होत होता.२०१५ च्या फिलीपिन्स दौऱ्यात वापरलेल्या उघड्या पोपमोबाईलवर फ्रान्सिस यांची शवपेटी ठेवण्यात आली होती. या शवपेटीसह शहरातून निघालेल्या अंत्ययात्रेचे आणि सामूहिक प्रार्थनेचे जगभरात थेट प्रक्षेपण करण्यात आले.या प्रसंगी इटलीच्या प्रसासनाकडून कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला होता. २,५०० पोलीस आणि १,५०० सैनिक अंत्ययात्रेच्या मार्गावर बंदोबस्तासाठी तैनात करण्यात आले होते. बंदोबस्ताचा भाग म्हणून पोलिसांच्या हेलिकॉप्टरमधून देखरेख देखील केली जात होती.

# पाकिस्तानचे कंबरडे मोडण्याची वेळ आलीय - ना.एकनाथ शिंदे

## शिवसेनेचा आभार मेळावा : शिंदेचा विरोधकांवर हल्लाबोल

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**बुलढाणा, दि. २७ :** पहलगाम हल्ला संपूर्ण देशावर असून तो भारताच्या आत्म्यावर आहे. याची सजा दहशतवाद्यांना नक्कीच मिळेल. पाकिस्तानला संपवायची वेळ आली आहे. दहशतवाद्यांना या हल्ल्याचा करारा जवाब मिलेगा असा इशारा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज दिला. बुलढाण्यात रविवारी आयोजित आभार मेळाव्यात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे बोलत होते.




यावेळी केंद्रीय राज्य मंत्री प्रतापराव जाधव, मंत्री गुलाबराव पाटील, संजय राठोड, आ. संजय गायकवाड, आनंदराव आडसूळ, माजी आ.संजय रायमुलकर, शशिकांत खेडेकर यांच्यासह शिवसैनिकांची उपस्थिती होती.

» महाराष्ट्रात असलेल्या पाकिस्तानी नागरिकांना राज्य, देश सोडण्याचे ठणकावून सांगितले. पोलिस शोधतील, जागेवर ठोकतील. देशाच्या या लढाईत आमचा शिवसैनिक मागे राहणार नाही. शिवसैनिक जवानासारखा लढेल, असे एकनाथ शिंदे म्हणाले. हल्ला झाला त्या ठिकाणी पोहोचणे हे मी माझे कर्तव्य समजले विरोधकांनी त्यातही राजकारण केले. जे कधी घराच्या बाहेर पडत नाहीत अशा लोकांनी त्यावर टीका केली असे उद्धव ठाकरे यांचे नाव न घेता त्यांनी टोला लगावला व विरोधकांवर सडकुन टीका केली. तर बुलढाण्याचे आमदार संजय गायकवाड यांनी मुख्यमंत्री असताना एकनाथ शिंदे यांनी ७० वर्षात बुलढाण्याला जे मिळाले नाही ते दिल्याच सांगितले. लाडक्या बहिनींना खूप काही दिले, तरुणांच्या हाताला रोजगार देण्यासाठी प्रयत्न केले, शेतकरी सुखावला तर मोताळा तालुक्यात विविध कामांची पायाभरणी त्यांच्यामुळे शक्य झाल्याचे ते म्हणाले.

अब कोई हद नही कोई सरहद नही... आता केवळ बदला. खून का बदला खून असे परखड वक्तव्य करून दहशतवाद्यांना संपवण्याचा इशारा एकनाथ शिंदे यांनी दिला.

# साखरखेर्डा येथील मेंढपाळाच्या २६ शेळ्या , मेंढ्याचा मृत्यू

## ६ लाख ५० हजारांचे नुकसान

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**साखरखेर्डा, दि. २७ :** येथील एका मेंढपाळाने आपल्या शेळ्या , मेंढ्या चराईसाठी नेल्या असता त्या मृत पावल्या आहेत . साखरखेर्डा पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून महसूल अधिकाऱ्यांनी आज पंचनामा केला आहे . साखरखेर्डा येथील लखन रामानंद खरात यांच्या मालकीच्या ५ शेळ्या , १५ मेंढ्या , बोकड ५ , आणि दोन एडके चराईसाठी रानात नेले . साखरखेर्डा शिवारातील गट नंबर १४६ मधील रमेश भगवान खरात यांच्या शेतामध्ये शेळ्या , मेंढ्या चराई करीत असताना दुपारी एका हौदावर पाणी पिल्या . त्यानंतर एका बाभळीच्या झाडाखाली जाऊन बाभळीच्या शेंगा खाऊन तृप्त झाल्या .

त्या बाभळीच्या झाडाखाली काही अंतरावर एका प्लास्टीकच्या



टोपलीतील पाणी प्राशन केले . त्या ठिणावरुण सर्व शेळ्या , मेंढ्या हाकलून दुसरीकडे नेल्या असता सायंकाळी एक एक करीत शेळ्या , मेंढ्या जमीनीवर पडून गतप्राण झाल्या . अशी तंक्रार लखन रामानंद खरात यांनी आज साखरखेर्डा पोलीस स्टेशनला दिली . त्यानंतर पशुधन अधिकारी डॉ . वैशाली उईके यांनी गतप्राण झालेल्या शेळ्या मेंढ्याची वैद्यकीय तपासणी करून मृत घोषित केले . साखरखेर्डा येथील ग्राम महसूल अधिकारी प्रशांत पोंधे यांनी पंचनामा केला असता लखन खरात यांचे ६ लाख ५० हजारांचे नुकसान झाले आहे . उपरोक्त पंचनामा करून अहवाल तहसिलदार यांना पाठविला आहे.

# अनिकट परिसरात झालेल्या हत्येचा रिसोड पोलिसांनी केला पर्दाफाश

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. २७ :**शहरातील अनिकट परिसरात असलेल्या जर्जर पोलिस निवासस्थानात एका व्यक्तीची बेदम मारहाण करून हत्या केल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी सुरुवातीला आकस्मिक मृत्यू म्हणून गुन्हा दाखल करण्यात आला होता; मात्र रिसोड पोलिसांनी चोरीच्या तपासात केलेल्या चोख चौकशीतून खऱ्या हत्याकांडाचा पर्दाफाश केला.

अकोला शहरातील अनिकट परिसरात पोलिस कर्मचारी राहण्यासाठी बांधलेले काही सरकारी क्वार्टर्स सध्या पूर्णतः उजाड व निष्क्रिय आहेत. देखभालीअभावी या ठिकाणी असामाजिक तत्वांनी तळ ठोकला आहे. याच परिसरातील एका जर्जर इमारतीत काही दिवसांपूर्वी एका व्यक्तीवर अमानुष हल्ला झाला होता.

### जुने पोलिस क्वार्टर्स बनले गुन्हेगारांचे अड्डे

कोतवाली पोलिसांना १८ एप्रिलच्या रात्री ९.३० वाजता माहिती मिळाली की, अनिकट परिसरातील पोलिस क्वार्टर्समध्ये एक व्यक्ती गंभीर जखमी अवस्थेत आढळला आहे. त्यानंतर पोलिसांनी आकस्मिक मृत्यू म्हणून नोंद केली होती.

दरम्यान, वाशिम जिल्ह्यातील रिसोड येथील एका मंदिरात चोरी झाल्याच्या प्रकरणात पोलिस निरीक्षक रामेश्वर चव्हाण व त्यांच्या टीमने अमोल रामदास बायस्कर व सिद्धार्थ वामनराव दीपके या दोन संशयितांना अटक केली. चौकशीदरम्यान या आरोपींनी चोरीची कबुली दिली आणि अनिकट परिसरात एका व्यक्तीला पैशाच्या वादातून मारहाण करून टाकल्याची धक्कादायक कबुली दिली. अकोला पोलिसांकडून माहिती घेतल्यानंतर स्पष्ट झाले की, त्या व्यक्तीचा मृत्यू झाला होता. यानंतर सिटी कोतवाली पोलिसांनी आकस्मिक मृत्यूचा गुन्हा बदलून हत्येचा गुन्हा दाखल केला आहे.

अकोल्यातील अनेक पोलिस क्वार्टर्स सध्या विना देखभाल, जर्जर अवस्थेत असून तेथून पोलिस कर्मचारी स्थलांतरित झाले आहेत.

### रामेश्वर चव्हाण यांचे निरीक्षण

पोलिस निरीक्षक रामेश्वर चव्हाण यांनी आपल्या अनुभवाच्या जोरावर आरोपींची हालचाल, बॉडी लँग्वेज यावरून संशय घेतला आणि चिकाटीने केलेल्या चौकशीतून अखेर हत्येचा उलगडा केला. त्यांच्या कामगिरीमुळे एक गंभीर गुन्हा उजेडात आला आहे.

# दर्यापूरात डॉक्टरच्या हलगर्जीपणाने प्रसुत महिलेसह बाळाचा मृत्यू

## नातेवाईकांचा आरोप; नातेवाईकांचा नवजीवन हॉस्पिटलवर राडा

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**दर्यापूर, दि. २७ :** शहरातील बनोसास्थीत नामवंत नवजीवन हॉस्पिटल मध्ये प्रसूती करिता दाखल असलेल्या महिलेला प्रकृती गंभीर होत असल्याचे बघून नातेवाईकांना तातडीने अकोला येथे रेफर करण्यास सांगितले. मात्र बुधवारी अकोला येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यासाठी नेत असताना महिलेसह तिच्यापोटातील बाळ सुद्धा मृत्यू पावले. यावरून चिडलेल्या नातेवाईक गुरुवार (दि.२४) हे नवजीवन हॉस्पिटल मधील डॉक्टरांना जाब विचारण्यासाठी धडकले होते . दरम्यान चिडलेल्या नातेवाईकांनी दर्यापूर पोलीस स्टेशन मध्ये जाऊन डॉक्टर वर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

दर्यापूर तालुक्यातील कळाशी येथील वर्षा दीपक कुटेमाटे (वय. २५ ) राहणार कळाशी या महिलेची दुसरी प्रसूती करण्यासाठी तिच्या कुटुंबीयांनी नवजीवन हॉस्पिटल मध्ये महिलेला दाखल केले होते. दोन दिवस उपचार घेतल्यानंतर प्रकृतीत सुधारणा होत नसल्याचे लक्षात आल्याने कुटुंबीयांनी डॉक्टरांकडे विचारणा केली असता डॉक्टरांनी यावर मी उपचार करतो असे सांगत महिलेला विविध औषधांचा डोस दिला असल्याचे मुत महिलेच्या कुटुंबीयांनी सांगितले. डॉक्टर नी ऐनवेळी महिलेची प्रसुती ही सिजर कराव लागते असे सांगून आपल्याकडे ती व्यवस्था नसल्याचे सांगत तातडीने या महिलेला दुसऱ्या रुग्णालयात घेऊन जाण्याचे डॉ. रवींद्र साबळे यांनी सांगितले. यावरून चिडलेल्या कुटुंबीयांनी डॉक्टरांना जाब विचारला मात्र त्यांची समजूत काढत महिलेला तातडीने ॲम्बुलन्स मध्ये टाकून अकोला येथील शासकीय महिला रुग्णालयात दाखल करण्यासाठी हलविले. सदर प्रसूतीग्रस्त महिला अकोला येथील रुग्णालयात पोहोचताच डॉक्टरांनी तपासल्यानंतर मृत घोषित केले. नातेवाईकांनी गुरवारी महिलेचे शवविच्छेदन अकोला येथेच करून घेतले. दरम्यान नवजीवन हॉस्पिटलच्या डॉक्टरांनी योग्य उपचार केले नसल्याचे आरोप करत सदर नातेवाईकांनी मृतदेहासह नवजीवन हॉस्पिटल गाठत डॉक्टरांना जाब विचारण्याचा प्रयत्न केला मात्र डॉक्टर तिथे उपस्थित नसल्याचे सांगण्यात आले. ,यामुळे चिडलेल्या नातेवाईकांन काहीवेळ गदारोळ घातला मात्र तरीही डॉक्टर उपस्थित झाले नाही. अखेर नातेवाईकांनी दर्यापूर पोलीस स्टेशन गाठले यावेळी सदर डॉक्टरांवर कारवाई झाल्याशिवाय आम्ही मृतदेह उचलणार नसल्याचे सांगितल्याने तणाव वाढला अखेर पोलिसांनी मध्यस्थी करत तुमची तक्रार दाखल करून घेतो अगोदर अंत्यविधी करून घ्यावा असा सल्ला दिल्याने नातेवाईकांनी महिलेचे अंत्यसंस्कार केले.

माझ्या पत्नीला मी नवजीवन हॉस्पिटलमध्ये उपचारार्थ दाखल केले होते. मात्र योग्य उपचार पद्धती डॉक्टरांनी अवलंबली नाही. प्रकृती अस्वस्थ झाल्यावर ऐनवेळी पत्नीला दुसऱ्या दवाखान्यात न्यावे असे सांगण्यात आले डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळेच माझ्या पत्नीचा व पोटातील बाळाचा मृत्यू झाला याबाबत आम्ही पोलिसांना तक्रार देण्यासाठी गेलो होतो.

**- दीपक कुटेमाटे ,**
मृतक महिलेचा पती

सदर महिला माझ्या हॉस्पिटलमध्ये उपचार घेत होती. यावेळी योग्य उपचार करण्यात आले असून तिची प्रकृती अगोदरच क्रिटिकल झाली होती. प्रसूती सिझरियन होणार असल्याचे लक्षात आल्याने आम्ही नातेवाईकांना याबाबत सूचित केले. आमच्या हॉस्पिटलला भूलतज्ञ सुद्धा उपस्थित नसल्याने सदर महिलेला दुसऱ्या हॉस्पिटलला घेऊन जाण्याबाबत सांगितले उपचारांमध्ये आमच्याकडून कोणतीही चूक झालेली नाही.

**- डॉ. रवींद्र साबळे,**
संचालक नवजीवन हॉस्पिटल दर्यापूर

महिलेच्या मृत्यूप्रकरणी कळाशी येथील नागरिक व नातेवाईक पोलीस स्टेशनला तक्रार देण्यासाठी आले होते.यासंबंधी अकोला येथे शवाविच्छेदन झाल्याचे सांगण्यात आले आहे. याबाबत आम्ही चौकशी करत आहोत. महिलेवर अंत्यसंस्कार झाल्यानंतर तिचे नातेवाईक तक्रार देण्यासाठी येणार होते.

**- शिवम विसापूरे,**
पोलीस उपअधीक्षक दर्यापूर

# यवतमाळच्या 'अभिप्राय कक्षा'चा राज्यभर डंका

## आज मुख्यमंत्र्यांच्या हस्ते तत्कालिन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांचा होणार गौरव





दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. २७ :** शासकीय ऑनलाइन सेवा नागरिकांना विहित वेळेत आणि शुल्कात मिळतात की नाही, याचा थेट लाभार्थ्यांकडून रोज मागोवा घेण्यासाठी यवतमाळचे तत्कालीन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी सुरू केलेल्या अभिनव 'अभिप्राय कक्षा'ची राज्यस्तरावर दखल घेण्यात आली आहे. या नाविन्यपूर्ण उपक्रमामुळे शासकीय सेवांच्या वितरणात आलेल्या गतिमानता आणि पारदर्शकतेबद्दल आज सोमवारी (दि. २८) 'सेवा हक्क दिनी' मुख्यमंत्र्यांच्याहस्ते डॉ. आशिया आणि या उपक्रमाचा गौरव केला जाणार आहे.

लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत नागरिकांना विविध शासकीय सेवा ऑनलाइन आणि कालमर्यादेत देण्याचे बंधन असले, तरी प्रत्यक्षात अनेक अडचणी येत होत्या. सेवा वेळेत न मिळणे, विहित शुल्कापेक्षा जास्त पैसे घेणे, केंद्रांवर चांगली वागणूक न मिळणे अशा तक्रारी होत्या. यावर लक्ष ठेवण्यासाठी आणि सेवा सुधारण्यासाठी डॉ. आशिया यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात हा 'अभिप्राय कक्ष' स्थापन केला. या कक्षात १० तरुण ऑपरेटरची टीम दररोज सुमारे एक हजार लाभार्थ्यांना त्यांच्या मोबाईलवर संपर्क साधून सेवेबद्दलचा अभिप्राय नोंदवून घेते. सेवा वेळेत मिळाली का, योग्य शुल्क आकारले का, केंद्रावर वागणूक कशी मिळाली, असे प्रश्न विचारले जातात. तसेच, कक्षाचा स्वतंत्र दूरध्वनी क्रमांक (०७२३२-३५०८००) आणि प्रत्येक केंद्रावरील क्यूआर कोड स्कॅन करूनही नागरिक आपला अभिप्राय किंवा तक्रार नोंदवू शकतात. या माध्यमातूनही रोज सुमारे १५० अभिप्राय मिळतात. या थेट संवाद आणि प्रतिसादाच्या प्रणालीमुळे सेवा देणाऱ्या विभागांवर आणि आपले सरकार सेवा केंद्र/सेतू सुविधा केंद्रांवर मोठा वचक बसला आहे. कामकाजात सुलभता, गतिमानता आणि पारदर्शकता वाढली आहे.

### अतिरिक्त शुल्काला चाप!

'अभिप्राय कक्षा'मुळे सेवा केंद्रांकडून होणाऱ्या अतिरिक्त शुल्क आकारणीला मोठा आळा बसला आहे. थेट फोनवरून शुल्काची विचारणा होत असल्याने नोव्हेंबर २०२४ मधील ४९.५२ टक्के गैरप्रकार आता १२ टक्क्यांवर आले आहेत. तसेच, अनेक नागरिक गावातच सेवा घेत असून, कामासाठी तालुक्याला जाण्याचे प्रमाण ५७.४३ टक्क्यांवरून लक्षणीयरीत्या ३२.८९ टक्क्यांपर्यंत घटले आहे. सेवा अधिक सुलभ आणि पारदर्शक झाल्या आहेत.

राज्य शासनाने या उपक्रमाची उपयुक्तता ओळखून त्याची प्रशंसा केली आहे.

# लभटीदेवी उत्सवात हजारो भाविकांनी अनुभवला दैत्यमर्दन

## देऊळगाव राजात तुरेवाले मंडळाने जपली साडेतीनशे वर्षाची परंपरा

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**देऊळगाव राजा, दि. २७ :** शहरातील शंकर प्रसादिक तुरेवाले मंडळ सुमारे साडेतीनशे वर्षांपासून पलभटीदेवी दैत्य मर्दनाचा धार्मिक उत्सव अखंडपणे आजही जोपासत आहे.शनिवारी रात्री हजारो युवक अबालवृद्ध आणि महिला भाविकांच्या सहभागाने रात्रभर पलभटी देवीचा उत्सव भक्तीभावाने साजरा करण्यात आला. पहाटे चार वाजेच्या सुमारास श्री बालाजी फरसावर परलभटी देवीने दैत्य राक्षाचा वध केला अन् हा दैत्य मर्दानाचा थरार भाविकांनी याची डोळा याची देही अनुभवला.

देऊळगाव राजा शहरातील जुना जालना मार्गावरील विठ्ठल मंदिरात रात्री एका युवकाने पलभटी देवीचे रूप धारण करीत हिंगलाज माता की जय गजरात देवीची मिरवणूक निघाली. शहरातील विविध मार्गाने मिरवणूक निघाली असता जागोजागी सुवासिनींनी देवीचे औक्षण करून ओटी भरली.



मिरवणुकी दरम्यान चतुश्रुंगी देवीच्या मंदिरात महाआरती करण्यात आली, रात्री तीन वाजे सुमारास शहर भ्रमणानंतर मिरवणूक ग्रामदैवत श्री बालाजी महाराज मंदिरासमोर फारसावर पोहचली. त्यावेळी दैत्य मर्दानाचा प्रतीकात्मक सोंग बघण्यासाठी हजारो भाविकांनी गर्दी केली होती. मंदिरासमोर प्रतिकात्मक दैत्य हा देवीला दाखविण्यात आले त्यावेळी त्याचा वध करण्यासाठी हजारोंच्या गर्दीत या टोकापासून त्या टोकापर्यंत पलभटी देवी आवेशाने धावत सुटली. शेवटी हा प्रतिकात्मक दैत्य राक्षसाचा देवीने वध केला हा दैत्य मर्दानाचा थरार फरसावर उपस्थित आबाल वृद्ध महिला भाविकांनी याची डोळा याची देही अनुभवला. यावेळी पलभट्टी देवी की जय, हिंगलाज माता की जय च्या गजरात बालाजींचा फरस दुमदुमून गेला.

CHANGE IN NAME

My Old names was ARJUMAND FIRDOUS IMRAN AHMAD SIR DESHMUKH R/O tekdi pura near arya samaj mandir Akot , I have changed my new name to ARJUMAND DESHMUKH MOHAMMED UMAR FAROOQUE for all future purposes. Address Tekdi pura near arya samaj mandir akot Dist Akola 444001

## थोडक्यात

### सोलापुरात २५ पाकिस्तानी नागरिक; १४ जणांना अल्प मुदतीचा व्हिसा- जयकुमार गोरे




**सोलापूर :** सोलापुरात सध्या २५ पाकिस्तानी नागरिक अधिकृतपणे वास्तव्य करीत आहेत. यात दीर्घ मुदतीचा व्हिसा असलेले ११, तर अल्प मुदतीचा व्हिसा असलेल्या १४ नागरिकांचा समावेश आहे. त्यांना पाकिस्तानला परत पाठवण्याची परिस्थिती आहे. परंतु ते सर्वजण सिंधी हिंदूधर्मीय आहेत. त्यामुळे त्यांना परत पाठवण्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्याशी चर्चा करून व त्यांचे मार्गदर्शन घेऊन पुढील कार्यवाही केली जाईल, अशी माहिती सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिली.जम्मू-काश्मीरमध्ये पहेलगाम येथे निरपराध पर्यटकांवर दहशतवाद्यांनी क्रूरपणे केलेल्या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर मोदी सरकारने पाकिस्तानच्या विरोधात कठोर भूमिका घेत भारतात येऊन राहणाऱ्या सर्व पाकिस्तानी नागरिकांना तत्काळ देश सोडून जाण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार सोलापुरात वास्तव्य करीत असलेल्या पाकिस्तानी नागरिकांची मोजदाद पोलीस प्रशासनाने केली आहे. त्याचा संक्षिप्त तपशील देताना पालकमंत्री गोरे म्हणाले, या १४ सिंधी नागरिकांना परत पाठविण्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा करून पुढील कार्यवाही केली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

### पैशांसोबत रिल्स काढण्याच्या बहाण्याने ३२ लाखांचा गंडा

**अहिल्यानगर :** पैशांसोबत रिल्स काढण्याच्या बहाण्याने एकाने त्याच्या मित्राची तब्बल ३१ लाख ७० हजारांची रोकड घेवून पोबारा केल्याची घटना गुरुवारी अहिल्यानगर येथे घडली. श्रेयश पांडुरंग लटपटे (वय २३, रा. भायगाव, ता. शेवगाव) अशी फसवणूक झालेल्या तरुणाचे नाव आहे, तर सुजित राजेंद्र चौधर (रा. निपाणी जळगाव, ता. पाथर्डी) असे आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी श्रेयश लटपटे याच्या फिर्यादीवरून एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी श्रेयश हा आनंद मशिनरी अ‍ॅण्ड इलेक्ट्रिकल्स या फर्ममध्ये मॅनेजमेंटचे काम पाहतो. या फर्मकडे पाईप डिस्ट्रीब्युशनची डिलरशीप आहे. त्यांच्या फर्मच्या अहिल्यानगर, अकोला व इतर ठिकाणी ब्रँच आहेत. या सर्व ठिकाणच्या रकमेचे कलेक्शन करण्याचे काम फिर्यादी श्रेयश हा करतो. गुरुवारी त्याने कारंजा मालेगाव, मेहकर येथील दुकानदारांकडून रोख रकमेचे कलेक्शन केले. त्यानंतर तो ३१ लाख ७० हजारांची रोकड घेवून ते अहिल्यानगरला येत होता. त्यावेळी त्याला त्याचा मित्र सुजित राजेंद्र चौधर याचा फोन आला.तुझ्याकडे रोकड आहे का? मला रोकड सोबत रिल्स काढायची आहे. त्यावेळी फोन करणारा हा ओळखीचा मित्र असल्याने श्रेयश याने रोकड असल्याचे सांगितले. सकाळी ९ च्या सुमारास दोघे एमआयडीसी येथील सनफार्मा चौकात भेटले. तेथून ते सुजित चौधर याच्या मारुती सियाझ कारमध्ये बसून शेंडी बायपास रोडवर गेले. तेथे गेल्यावर आरोपी चौधर हा फिर्यादी श्रेयशला म्हणाला की, तू समोर उभ्या असलेल्या गाडीतून कॅमेरा घेवून ये. त्यावेळी श्रेयश याने त्याच्या जवळील रोकड असलेली बॅग मारुती सियाझ कारच्या सीटवर ठेवून तो कॅमेरा आणण्यासाठी गेला.त्याचवेळी आरोपी चौधर याने कार सुरू करून तो भरधाव वेगात ३१ लाख ७० हजारांची रोकड असलेली बॅग घेवून पसार झाला.

### अक्कलकोटमध्ये भक्तिमय वातावरणात स्वामी समर्थ पुण्यतिथी सोहळा



**सोलापूर :** दत्तात्रेयाचे चौथे अवतार मानल्या गेलेल्या अक्कलकोटनिवासी वटवृक्ष श्री स्वामी समर्थ महाराजांचा १४७ वा पुण्यतिथी सोहळा स्वामीनामाच्या जयजयकाराने भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. यानिमित्ताने सुमारे अडीच लाख भाविकांच्या गर्दीने अक्कलकोट नगरी फुलून गेली होती.अंगाची लाही लाही करणारा तप्त उन्हाळा असूनही त्याची पर्वा न करता स्वामिभक्तीपोटी अक्कलकोट नगरीत भाविकांची मांदियाळी पाहायला मिळाली. श्री स्वामी समर्थ दर्शन सुलभतेने होण्यासाठी वटवृक्ष श्री स्वामी महाराज देवस्थान समितीने नेटके नियोजन केले होते. स्त्री आणि पुरुष भाविकांसाठी दोन स्वतंत्र रांगांची व्यवस्था करण्यात आल्याने दर्शन सुलभ झाले. उन्हाची झळ बसू नये म्हणून दर्शनरांगेत चटई आणि सावलीसाठी कापडी मंडपाची उभारणी करण्यात आली होती. दर्शनाबरोबरच भाविकांसाठी भक्तनिवास, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे यात्री निवास, राजेराय मठासह अनेक ठिकाणी निवास व्यवस्था उपलब्ध झाल्याने भाविकांमध्ये समाधान व्यक्त करण्यात आले.वटवृक्ष श्री स्वामी समर्थ देवस्थानात पहाटे दोन वाजता काकड आरती, नामस्मरण, नगर प्रदक्षिणा, श्री स्वामी महाराजांना लघुरुद्र अभिषेक अशा विविध धार्मिक विधींनी श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी सोहळ्यास प्रारंभ झाला. दुपारी अक्कलकोट संस्थानचे मालोजीराजे भोसले यांनी संस्थानाच्यावतीने श्री स्वामी महाराजांना पूर्वापार परंपरेनुसार महानैवेद्य अर्पण केला.

# यंदाच्या उन्हाळ्यात राज्यभर जलशोष

## सरासरीपेक्षा जास्त पाऊस होऊनही राज्यात अनेक ठिकाणी वाढत्या तापमानाने टंचाई

**पुणे : दि. २७** वृत्तसंस्था

जागतिक तापमानवाढीमुळे दर वर्षीच ऊन जरा जास्त असते, तसे यंदाही. पण, तेच केवळ पाणी आटवणारे नसून, 'प्रगत' महाराष्ट्राला पावसाचे पाणी अजूनही नीट साठवता येत नसल्याने जनतेच्या घशाला कोरड आहे. गेल्या पावसाळ्यात राज्यात सरासरीपेक्षा जास्त पाऊस झाला. तरी बहुतांश भागांत, अगदी छोट्या-मोठ्या शहरांतही रोज पाणी देणे अशक्य आहे.परिणामी टँकरवर भिस्त. शिवाय, विंधन विहिरींतून वारेमाप उपसा आणि पाणी वापराच्या बेशिस्त सवयींपोटी त्याचा प्रचंड अपव्यय. अशात पाणी पुरविण्यासाठीच्या योजनांत पाण्यापेक्षा अर्थकारण अधिक मुरते, या वास्तवाने भर घातल्याने यंदाच्या उन्हाळ्याची सावलीही कोरडीच असल्याचे चित्र आहे.सामान्यांना टंचाईची झळ बसू द्यायची नसेल, तर शिल्लक पाण्याचे उत्तम नियोजन आणि समान वाटप हेच आता प्रशासनापुढचे आव्हान आहे.

**नाशिक :** उत्तर महाराष्ट्रात नाशिक आणि जळगाव या दोन जिल्ह्यांत ६४ गावे आणि १३८ वाड्यांना ६६ टँकरव्दारे पाणीपुरवठा केला जात आहे. नंदुरबार आणि धुळे जिल्हे अजून तरी टँकरमुक्त आहेत. राष्ट्रवादीचे माजी मंत्री छगन भुजबळ यांच्या येवला तालुक्यात ३१ गावे आणि ४१ वाड्यांसह ७२ ठिकाणी २९ टँकर सुरू आहेत. मनमाड येथे १३ दिवसांआड दोन तास, येवल्यात पाच दिवसांआड एक तास तर, मालेगाव येथे दोन दिवसांआड एक तास नळ पाणीपुरवठा केला जातो आहे. जळगाव शहरात तीन दिवसांआड, भुसावळमध्ये १५, असोद्यात १५ ते २० आणि नशिराबादला पाच ते सहा दिवसांआड नळ पाणीपुरवठा होत आहे.



**छत्रपती संभाजीनगर :** मराठवाड्यात सध्या १९२ टँकरने पाणीपुरवठा केला जात आहे. बहुतांश शहरांत रोज पाणी येतच नाही. जालना जिल्ह्यातील जाफ्राबाद नगरपालिकेमध्ये १० दिवसांतून एकदा पाणीपुरवठा होतो. भोकरदनमध्ये पाच-सहा दिवसांतून एकदा पाणी येते. अंबडमध्ये हा कालावधी नऊ दिवसांतून एकदा असा आहे.छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील गंगापूर, खुलताबाद, फुलंब्री या नगरपरिषदांत चार दिवसांतून एकदा पाणी दिले जाते. लातुरात अनेक ठिकाणी अगदी स्वयंपाकघरातील लहान पातेलेही पाण्याने भरून ठेवली जात आहेत.

**पुणे :** पश्चिम महाराष्ट्रात सोलापूरकरांना महापालिका प्रशासनाकडून पाच ते सहा दिवसांआड पाणीपुरवठा केला जातो. उजनी-सोलापूर समांतर जलवाहिनी योजनेचे काम अंतिम टप्प्यात आहे. ही योजना सुरू झाल्यास १३ लाख लोकसंख्येच्या सोलापूरची तहान भागवण्यासाठी उजनी धरणातून दर तीन महिन्यांतून एकदा चार ते पाच टीएमसी एवढे प्रचंड पाणी सोडावे लागणार नाही. माळशिरस व मंगळवेढा तालुक्यातील सहा गावे आणि ६१ वाड्या-वस्त्यांना सहा टँकरने पाणीपुरवठा करावा लागतो आहे. सातारा जिल्ह्यात ४९ गावे व ३०८ वाड्या तहानलेल्या आहेत. तेथील ९२ हजार ८७२ नागरिक आणि ६२ हजार ७४७ जनावरांना ५५ टँकरने पाणीपुरवठा केला जात आहे. खंडाळा, फलटण, माण, खटाव, कोरेगाव तालुक्यात पाणीटंचाई आहे.

**अहिल्यानगर** जिल्ह्यात फेब्रुवारीअखेरपासूनच पिण्याच्या पाण्यासाठी टँकर सुरू करावे लागले आहेत. जलजीवन मिशन कार्यक्रमातील पाणीयोजना रखडल्याने टंचाईग्रस्त गावांत आणखी ११३ गावांची भर पडणार आहे. जिल्ह्यात सध्या ८३ गावे, ४२४ वाड्या-वस्त्यांवरील १ लाख ६४ हजार ३९४ लोकसंख्येला ९६ टँकरमार्फत पाणीपुरवठा सुरू आहे. तीन मोठे प्रकल्प व सहा मध्यम प्रकल्पांतून एकूण सुमारे ३५ टक्के जलसाठा शिल्लक आहे. अहिल्यानगर शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या मुळा धरणात ४५.७० टक्के जलसाठा आहे. मात्र, नियोजनाअभावी शहराच्या उपनगरांत चार ते पाच दिवसांनंतर पाणीपुरवठा होत आहे, तर १५ टँकर सुरू आहेत. शहराला दिवसाआड पाणीपुरवठा होत आहे.

**अलिबाग :** रायगडमधील १२८, तर रत्नागिरीतील ३५७ गावांतील ७२२ वाड्यांना पाणीटंचाईची झळ बसली आहे. त्यामुळे हंडाभर पाण्यासाठी वणवण फिरण्याची वेळ कोकणवासीयांवर आली आहे. मुंबईच्या वेशीवर असलेल्या रायगड जिल्ह्यात पाणीटंचाईचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर बनत चालला आहे. जिल्ह्यातील ३५७ गावांतील ७२२ वाड्यांना पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे. रत्नागिरी, खेड, संगमेश्वर, दापोली, मंडणगड, चिपळूण आणि लांजा या सात तालुक्यांतील पाणीप्रश्न गंभीर आहे. तेथे टँकरने पाणीपुरवठा होत आहे.

**नागपूर :** विदर्भातील ग्रामीण भागांत सध्या ५० गावांमध्ये ६३ टँकरने पाणीपुरवठा होत आहे. अमरावती विभागातील पाणीसाठा ४५ टक्के, तर नागपूर विभागातील जलसाठा ३७ टक्क्यांपर्यंत खाली आला आहे. बुलढाणा जिल्ह्यात सर्वाधिक २६ गावांमध्ये टँकरने पाणी पुरविण्यात येत आहे.

ठाणे जिल्ह्यातील शहापूर आणि मुरबाड या भागात दरवर्षी उन्हाळ्यात मोठ्या प्रमाणात पाणीटंचाई जाणवत असते. मात्र गेल्या दोन वर्षाच्या कालावधीत फेब्रुवारी महिन्याच्या अखेरनंतरच या दोन्ही तालुक्यांमध्ये तीव्र पाणीटंचाई जाणवू लागली आहे.

## मुख्यमंत्र्यांनी घेतली गणबोटे अन् जगदाळे कुटुंबियांची भेट



**पुणे , दि. २७** वृत्तसंस्था

जम्मू काश्मीरमध्ये दहशदवादी हल्ला करुन अशांतता निर्माण करण्यात आली आहे. पहलगाम भागात भीषण दहशतवादी हल्ला करण्यात आला आहे. या हल्ल्यात हिंदू पर्यटकांना लक्ष्य करण्यात आले. यामध्ये आतापर्यंत २८ पर्यटकांचा मृत्यू झाला आहे. यामध्ये सहा महाराष्ट्रातील पर्यटकांचा समावेश आहे. पुण्यातील २ पर्यटकांचाही मृत्यू झाला आहे. या घटनेचे तीव्र पडसाद आंतरराष्ट्रीय स्तरावर देखील पडत आहेत. दहशतवादी हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्या कौस्तुभ गणबोटे आणि संतोष जगदाळे या पर्यटकांच्या घरी जाऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या कुटुंबियांचे सांत्वन केले.

आतापर्यंत ज्याप्रमाणे आपण खंबीर राहिले त्याचप्रमाणेच यापुढेही खंबीर राहावे, राज्य शासन आपल्या दुःखात सहभागी असून आपल्या पाठीशी आहे, अशा शब्दात मुख्यमंत्री फडणवीस यांनी त्यांना धीर दिला. यावेळी गणबोटे यांच्या गंगानगर कोंढवा येथील घरी मुख्यमंत्र्यांसमवेत नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, आमदार योगेश टिळेकर, सुनील कांबळे, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, कौस्तुभ गणबोटे यांच्या पत्नी संगीता गणबोटे, मुलगा तुषार, कुणाल, स्नुषा कोमल गणबोटे उपस्थित होते. जगदाळे यांच्या कर्वेनगर येथील निवासस्थानी मुख्यमंत्र्यांसमवेत राज्यमंत्री माधुरी मिसाळ, आमदार भीमराव तापकीर, सुनील कांबळे, स्व. संतोष जगदाळे यांच्या पत्नी प्रगती जगदाळे, मुलगी आशावरी जगदाळे आदी कुटुंबातील सदस्य उपस्थित होते. यावेळी गणबोटे यांच्या पत्नी आणि मुलांनी तसेच जगदाळे यांच्या पत्नी आणि मुलगी यांनी घडलेल्या घटनेबाबत सविस्तर माहिती सांगितली.

## लग्नाला गेली अन् पाकिस्तानात अडकली!

**नागपूर, दि.२७** वृत्तसंस्था

माहेरी लग्न असल्याने पाकिस्तानात गेलेल्या नागपुरातील कमलीबाई पाकिस्तानात अडकल्या आहेत. कमलीबाई भारतात लाँग टर्म व्हिसावर स्थायिक झाल्या आहेत. पाकमधील हिंदूना असा व्हिसा दिला जातो. परंतु पहलगाम हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानची सीमा बंद केल्यामुळे त्या भारतात कुटुंबाकडे परतण्यासाठी धडपडत आहेत.

त्यांचे कुटुंब मुळचे पाकिस्तानच्या सिंध प्रांतातील मात्र, २००९ मध्ये लाँग टर्म व्हिसावर (एलटीव्ही) रवी कुकरेजा यांचे कुटुंब भारतात स्थायिक झाले. नागपुरातील जरीपटका भागात त्यांचे कुटुंब वास्तव्यास असल्याचे सांगण्यात येते.कुकरेजा यांच्या पत्नी कमलीबाई यांच्या माहेरी मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात लग्न असल्याने त्या पाकिस्तानात गेल्या. मात्र, पहलगाम हल्ल्यानंतर २२ एप्रिलला केंद्र सरकारने दोन्ही देशांची सीमा बंद केली. त्याच रात्री त्या सीमेकडे निघाल्या. शुक्रवार (ता.२५) पासून त्या अटारी बॉर्डरवर थांबून आहेत.परंतु त्यांना भारतात प्रवेश देण्यात येत नसल्याचे रवी यांचे म्हणने आहे.

## वाल्मिक कराडला तुरुंगातच आला पॅनिक अटॅक

**बीड, दि.२७** वृत्तसंस्था



मस्साजोग गावाचे सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करुन निर्घृणपणे हत्या करण्यात आली. संतोष देशमुख यांना मारहाण केल्याचे धक्कादायक फोटो देखील समोर आले. या हत्येनंतर बीडसह संपूर्ण राज्यभरातून रोष व्यक्त करण्यात आला. या प्रकरणामध्ये वाल्मिक कराड याच्यावर मुख्य आरोपी म्हणून आरोप करण्यात आले आहेत. या प्रकरणावरुन वाल्मिक कराड हा सध्या जेलची हवा खात आहे. मात्र तुरुंगामध्येच वाल्मिक कराडला पॅनिक अटॅक आल्याची माहिती समोर येत आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणामुळे वाल्मिक कराडच्या अडचणींमध्ये वाढ झाली आहे. तो सध्या बीडच्या मध्यवर्ती कारावासामध्ये आहे. या प्रकरणामध्ये आपला कोणताही संबंध नसल्याचा दावा कराडकडून केला जात आहे. त्यासाठी त्याने न्यायालयामध्ये धाव घेतली आहे. मात्र सीबीआय अंतर्गत सुरु असलेल्या तपासामध्ये वाल्मिक कराड विरोधात सबळ पुरावे शोधण्याचे सुरु आहे. यामध्ये आता वाल्मिक कराडची प्रकृती खालावली आहे. त्याला तुरुंगामध्येच पॅनिक अटॅक आला आहे. यानंतर त्याची डॉक्टरांनी तपासणी केली. यापूर्वी देखील वाल्मिक कराडची प्रकृती खालावली होती.


संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराडला दुपारच्या वेळी अस्वस्थ वाटू लागलं. त्याची प्रकृती अचानक बिघडली. कारागृहात गेल्यापासून कराडच्या प्रकृतीच्या तक्रारी वाढल्या आहेत. डॉक्टरांनी त्याची तपासणी केली. त्याला पॅनिक अटॅक आल्याचे निदान करण्यात आले. डॉक्टरांनी त्याच्यावर उपचार केले. त्याच्यावर औषधोपचार करण्यात आले. जिल्हा रुग्णालयातील डॉक्टरांनी त्याची तपासणी केली. त्याला रक्त तपासणी करण्याचा सल्ला देण्यात आला. त्याचा रक्त नमुना अहवाल आल्यानंतर त्याच्यावर पुढील उपचार करण्यात येणार आहे.

बीड जिल्हा कारागृहात बबन गितेच्या समर्थक कैदी आणि परळीतील विरोधी गटातील कैद्यांमध्ये मारामारी झाली. या घटनेत वाल्मिक कराड व सुदर्शन घुलेलाही मारहाण करण्यात आल्याचे आमदार सुरेश धस यांनी सांगितले होते.

## शिर्डी विमानतळावर आणखी दोन हेलिपॅड, ८ वाहनतळ

**राहाता, दि.२७** वृत्तसंस्था

आगामी नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर शिर्डी आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे दोन हेलिपॅड व ८ वाहनतळ उभारण्यास व विमानतळाचे विस्तारीकरण, अद्ययावतीकरणास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्र विमानतळ प्राधिकरणाच्या मुंबईत झालेल्या बैठकीत मान्यता दिली. महाराष्ट्र विमानतळ प्राधिकरणाच्या संचालक मंडळाची ९१ वी बैठक मुंबईत झाली. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपस्थित होते. प्राधिकरणच्या उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक स्वाती पांडे यांनी सादरीकरणाद्वारे माहिती दिली.



शिर्डी येथील विमानतळाच्या कार्गो टर्मिनलचे काम वेगाने सुरू आहे. नाशिकपासून शिर्डी विमानतळ जवळ असल्याने नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळ्याच्या वेळेस हवाई मार्गाने येणाऱ्या भाविकांना शिर्डी विमानतळ सोयीचे होणार आहे. त्यावेळी होणाऱ्या संभाव्य गर्दीचा विचार करून व नाशिक येथील विमानतळाची क्षमता लक्षात घेता शिर्डी विमानतळाचे विस्तारीकरण प्रस्तावास मान्यता देण्यात आली. यामध्ये ८ वाहनतळे, दोन हेलिपॅडसह टर्मिनलच्या अद्यावतीकरणाचा समावेश आहे. याचा फायदा कुंभमेळ्यादरम्यान येणारी विमाने व हेलिकॉप्टर सेवेसाठी होणार आहे. प्राधिकरणाचे संचालक तथा वित्त विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, परिवहनचे अतिरिक्त मुख्य सचिव संजय सेठी, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. वेलरासू आदी उपस्थित होते.

## रेल्वेतील नोकरीच्या नादात नांदेडच्या तरुणांना कोट्यवधींचा गंडा

**किनवट, दि.२७** वृत्तसंस्था

नॉर्थ रेल्वे विभागाचा ई-मेल येतो. दहा तरुणांचे मेडिकल होते. लेटरहेडवर जॉईनिंग लेटर मिळते. आयडी कार्ड मिळते आणि उत्तर प्रदेशातील हापूर रेल्वे स्टेशनवर ट्रेनिंग सुरू होती. २० दिवस हा फिल्मी स्टाइल प्रकार चालल्यानंतर ट्रेनरचा फोन बंद होतो अन् हे सर्वच बनावट असल्याचे समोर येते.

या नियुक्त्यांमध्ये दिल्लीच्या दोन भामट्यांनी नांदेडच्या तरुणांसोबत 'स्पेशल छब्बीस' चित्रपटाचा सीनच आखला. रेल्वेतील नियुक्तीसाठी दहा तरुणांकडून तब्बल १ कोटी ११ लाख ८६ हजार रुपये या भामट्यांनी उकळले. याप्रकरणी किनवट (जि. नांदेड) येथील गजानन बाबू जाधव यांच्या तक्रारीवरून हरेंद्र भारती आणि आशिष पांडे या भामट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

दिल्ली येथे विभागात कमर्शिअल क्लर्कच्या जागा आहेत. आम्ही डीआरएम कार्यालय नवी दिल्ली येथे जागा भरण्याचे काम करतो. पण, अगोदर रक्कम द्यावी लागेल, खात्रीशीर काम होईल, असे सांगत आरोपी हरेंद्र भारती व आशिष पांडे तसेच डीआरएम कार्यालय नवी दिल्ली येथील काही कर्मचाऱ्यांनी किनवट येथील गजानन बाबू जाधव तसेच जिल्ह्यातील ६, तर इतर ठिकाणचे ४ अशा एकूण दहा तरुणांकडून १ कोटी ११लाख ४५ लाख ८६ हजार रुपये उकळले.

गजानन व त्यांचे वडील तसेच त्यांच्या मित्रांकडून ६ एप्रिल २०२४ ते १२ नोव्हेंबर २०२४ या कालावधीत वेळोवेळी रक्कम आरोपींनी घेतली. गजानन व इतर मुलांना भारतीय रेल्वे विभागाचे बनावट ई-मेलवरून बनावट मेडिकलचे पत्र, जॉईनिंग लेटर पाठविले. एवढेच नव्हे तर गजानन जाधव व इतर मुलांना ४५ दिवसांचे प्रशिक्षण देण्याचे सांगून बनावट आयडी कार्ड व साहित्य देऊन त्यांना उत्तर प्रदेशातील हापूर रेल्वे स्टेशन येथे पाठविले.

## पाकिस्तानी नागरिकांना देश सोडावाच लागेल- चंद्रशेखर बावनकुळे

**नागपूर , दि.२७** वृत्तसंस्था



केंद्र सरकारने पाकिस्तानी नागरिकांना देश सोडून जाण्यासाठी डेडलाईन दिली आहे. त्यांना भारत देश सोडावाच लागेल. या देशात राहून पाकिस्तानचा जयजयकार करणे चालणार नाही.

जेव्हा पाकिस्तान जिंकतो तेव्हा इकडे फटाके फोडतात, अशी ही वृत्ती मोडून काढली पाहिजे. पाकिस्तान जिंकल्यानंतर भारतात पाकिस्तानचे झेंडे फडकवणे हे आम्हाला मान्य नाही, म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदींनी पाकिस्तान के लोक चले जाव ही भूमिका घेतली आहे. ती योग्य आहे, असे मत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी माध्यमांशी बोलताना शनिवारी व्यक्त केले.

'भारत जोडो' यात्रेदरम्यान राहुल गांधी यांना स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याबाबत केलेल्या वक्तव्यावर सर्वोच्च न्यायालयाने फटकारले. यावर बावनकुळे म्हणाले, राहुल गांधी यांनी महाराष्ट्र आणि देशातील जनतेची जाहीर माफी मागितली पाहिजे. त्यांना साथ देणाऱ्या आणि मिठ्या मारणाऱ्या नेत्यांनी यापासून धडा घेतला पाहिजे.

सावरकरांनी विश्वाला प्रेरणा दिली. त्यांची निंदा करणे, त्यांना वाईट पद्धतीने बोलले जात असतानाही उद्धव ठाकरे हे राहुल गांधी यांच्या मांडीला मांडी लावून बसले. त्यांना पाठिंबाही दिला. आदित्य ठाकरे त्यांना मिठी मारत होते, असा टोलाही चंद्रशेखर बावनकुळे यांनी हाणला.

**राज्य विकसित होईपर्यंत फडणवीस मुख्यमंत्री राहावे**

महाराष्ट्र विकसित करण्याचा संकल्प मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. महाराष्ट्र विकसित होत पर्यंत ते मुख्यमंत्री राहिले पाहिजे, असे बावनकुळे एका प्रश्नाच्या उत्तरात म्हणाले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजितदादा आम्ही सगळे विकसित महाराष्ट्रासाठी एकत्र आलो आहोत. आमचे राज्यात सरकार पुढचे पंधरा वर्षे आले पाहिजे. म्हणून आम्ही काम करत असल्याचे बावनकुळे म्हणाले. फडणवीस गतिमान मुख्यमंत्री आहे आणि त्यांच्या नेतृत्वात महाराष्ट्र पुढे जावा अशी भावना आहे. जनतेला राज्यात फडणवीस मुख्यमंत्री पाहिजेत असेही त्यांनी सांगितले.

## पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा अमरनाथ यात्रेवर परिणाम

**नाशिक , दि.२७** प्रतिनिधी

काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या अतिरेकी हल्ल्यानंतर जिल्ह्यातील अमरनाथ यात्रेकरूंची नोंदणी प्रक्रिया थंडावली आहे. गेल्या आठवड्यात जम्मू अँड काश्मीर बँकेत नोंदणी करण्यासाठी भाविकांची गर्दी होत होती. मात्र, हा हल्ला झाल्यानंतर दिवसभरात ८ ते १० भाविकही नोंदणीसाठी येत नसल्याची माहिती जम्मू अँड काश्मीर बँकेच्या व्यवस्थापकांनी दिली. अमरनाथ यात्रेला जाण्यासाठी दोन मार्ग आहे. एक पहलगाम येथून तर दुसरा बालठाण येथून. मात्र, भाविक पहलगाम मार्गाचा अधिक वापर करत असतात. येथूनच अमरनाथ यात्रेला प्रारंभ होतो. मात्र, तेथेच भयावह दहशतवादी हल्ला झाल्यामुळे भाविकांच्या मनात भीती निर्माण झाली आहे. त्यामुळे भाविक अमरनाथला जाणे टाळत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

गेल्या आठवड्यात जम्मू अँड काश्मीर बँकेत भाविकांची गर्दी वाढल्याने पोलिस बोलवावे लागले होते. तेथेच शुक्रवार रोजी दिवसभरात १० भाविकही नोंदणीसाठी आले नसल्याचे दिसून आले. दरम्यान, ३ जुलैपासून अमरनाथ यात्रा सुरू होणार असून, शुक्रवारपर्यंत १३ जुलैपर्यंतची नोंदणी पूर्ण झाली होती. जम्मू अँड काश्मीर बँकेतून जवळपास १००० लोकांनी आतापर्यंत नोंदणी केली आहे. दररोजच्या तुलनेत ३० ते ४० टक्केच नोंदणी होत असल्याचेही वाघ यांनी सांगितले.



### 'या' कागदपत्रांची आवश्यकता

सुरक्षेच्यादृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या अमरनाथ यात्रेसाठी सहजासहजी परवानगी मिळत नाही. यासाठी जिल्हा शल्य चिकित्सक अथवा ग्रामीण रुग्णालयातील प्रमुखांचे प्रकृती तंदुरूस्त असल्याचा दाखला आणावा लागतो. अमरनाथ यात्रेसाठी दोन मार्ग आहेत. पहिला पहेलगाम मार्गे आहे. या मार्गे एका दिवसात यात्रा पूर्ण करता येऊ शकते तर दुसरा मार्ग बालठाण मार्गे आहे. येथून गेल्यास दोन दिवस यात्रेला लागतात.

आपले पत्र या मेलवर पाठवावे. आम्ही त्याला प्रसिद्धी देऊ
ajinkyabharat23@gmail.com

# संपादकीय...

## वॉटर स्ट्राइक?

भारत आणि पाकिस्तानमधील तणाव वाढला आहे. पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ बढाया मारत होते. पहलगाम हल्ल्याशी आमचे या हल्ल्याशी काही देणेघेणे नाही येथपासून ते भारतातल्याच सरकार विरोधात प्रचंड नाराजी आहे वगैरे वाकबाण त्यांनी सोडले. त्यांनी भारतातील अल्पसंख्यकांचा कथित कैवार घेताना भारतातील कोणत्या कोणत्या राज्यांत अशांतता आहे याची यादीही दिली. भारत सरकारने दहशतवादी हल्ल्यानंतर कोणती पोपटपंची केलेली नाही. विरोधी पक्षांच्या नेत्यांनीही सरकारला एकमुखी पाठिंबा देत अगोचर विधान केले नाही.सर्वपक्षीय बैठकही झाली. त्यात पाकिस्तानची कोंडी करण्याची रणनीती ठरवली गेली. मागच्या दहशतवादी हल्ल्यानंतर ज्या प्रकारे भारताने सर्जिकल स्ट्राइक केला तसाच आताही करावा अशी केवळ सरकार पक्षातील अथवा विरोधी पक्षातील नेत्यांचीच नव्हे तर सर्वसामान्यांचीही अपेक्षा आहे. पण एकच मात्रा दरवेळी लागू पडत नाही. पहिल्यांदा पाकिस्तानचा गाफीलपणा दहशतवाद्यांचा खातमा करण्यास उपयुक्त ठरला. आताही तसेच होईल असे नाही. ख्वाजा आसिफ असतील किंवा पाकिस्तानचे माजी राजदूत असतील त्यांनी यावेळी पाकिस्तान सज्ज आहे असे विधान केले आहे. आमचे प्रत्युत्तर घातक असेल असेही म्हटले आहे. तथापि, भारत त्यांना अनपेक्षित धक्का देतो आहे. सिंधू जल कराराला स्थगिती देण्याचा निर्णय भारताने घेतला आहे. त्याची संभावना काही माध्यमांनी वॉटर स्ट्राइक अशी केली आहे. पाकवर होणारा हा वॉटर स्ट्राइक घातक ठरू शकतो. त्याला जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय न्यायालयात पाककडून आव्हान दिले जाऊ शकते, तथापि, राष्ट्रीय सुरक्षेचा मुद्दा उपस्थित करून भारत ते पेलू शकतो. पाकिस्तानचा पायाच डळमळीत करण्याची क्षमता भारताच्या या कारवाईत आहे. भारताने वॉटर स्ट्राइकचे सूतोवाच करताच पाकचे संरक्षण मंत्रीही आता त्यांच्या पदाला शोभेल असे बोलू लागले आहेत. त्याही पेक्षा महत्वाचे म्हणजे त्यांनी त्यांचा देश बऱ्याच वर्षांपासून भारताच्या विरोधातील दहशतवादाचे समर्थन करत आला असल्याची स्वच्छ कबुली त्यांच्याच देशातील एका माध्यमाशी बोलताना दिली आहे. तथापि, हे करताना त्यांनी या कृत्यात अमेरिका, पश्चिम आणि ब्रिटनचाही सहभाग असल्याची मखलाशी केली आहे.तीन दशकांपासून आम्ही त्यांच्यासाठी हे घाणेरडे काम करत आहोत, तसे केले नसते तर पाकिस्तान आज स्वच्छ असता असा त्यांचा दावा आहे. केवळ ४८ तासांत ख्वाजा आसिफ यांनी यू टर्न घेतला. ज्या अन्य देशांसाठी किंवा ज्यांच्या कथित सांगण्यावरून आम्ही हे करत होतो हे ते म्हणत आहेत त्याचे गांभीर्य त्यांना समजत नव्हते का? रशियाला अफगाणिस्तानातून हुसकावून लावण्यापासून म्हणजे १९७० च्या दशकापासून ते अमेरिकेवरील ९/११ च्या हल्ल्यापर्यंत पाकिस्तानने बरीच चुंबाचुंबी केली आहे. आपल्या लाभाचाच पाकिस्तानातील सत्ताधीशांनी विचार केला आणि त्याकरता त्यांनी देशातील जनतेला केवळ धर्माचा आणि जिहादचा आणि भारतद्वेषाचा पाठ पढवणाऱ्यांच्या हवाली करत वाऱ्यावर सोडले.भारताने हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून जो निर्णय घेतला आहे त्यात एक गोळीही न झाडता पाकिस्तान गुडघ्यावर येणार असेल तर तो भारताचा महत्वाचा विजय ठरेल. १९ सप्टेंबर १९६० रोजी भारत आणि पाकिस्तान यांच्यात सिंधू जल करारावर स्वाक्षरी झाली होती. या करारानुसार पाकिस्तानला सिंधू, झेलम आणि चिनाब या नद्यांचे पाणी मिळते. सिंधू जल करार हा सिंधू नदी व तिच्या उपनद्यांचे पाणी वापर आणि वाटपाचे व्यवस्थापन करतो. यानुसार पाकिस्तानला मिळणारे पाणी तेथील शेतीसाठी अत्यंत महत्वाचे आहे. सिंधू आणि तिच्या उपनद्यांचे ८० टक्के पाणी पाकिस्तानला मिळत असल्यामुळे हा करार त्या देशासाठी अत्यंत फायद्याचा आहे. भारत जर पाकिस्तानला जाणारे हे पाणी थांबवू शकला अथवा कमी करू शकला तर त्याचा थेट परिणाम पाकिस्तानच्या एवढ्या जनतेवर होणार आहे. त्यांच्या कृषी क्षेत्राला जी त्यांच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे त्याला अभूतपूर्व असा हा फटका असेल. पाणी मिळालेच नाही किंवा कमी मिळाले तर शेतीचे उत्पादन घटणार हे स्पष्ट आहे. त्यामुळे अगोदरच महागाईने बेजार झालेल्या आणि कर्जबाजारी झालेल्या पाकिस्तानला आपली भूक भागवणे जिकरीचे होणार आहे.विविध देशांच्या मदतीने त्यांनी आतापर्यंत डोलारा कसाबसा सांभाळला आहे. बेरोजगारीची समस्या तेथेही आहे. राजकीय अस्थैर्य आहे. इम्रान खान या माजी पंतप्रधानांच्या अटकेनंतर तेथे सरकार आणि विरोधक शत्रु असल्यासारखेच वावरताना दिसत आहेत. पाकिस्तानचे लष्कर जबाबदारी न घेता केवळ अधिकार गाजवण्यातच धन्यता मानते. भारताच्या या संभाव्य स्ट्राइकमुळे त्यांना लढण्याचीही गरज भासणार नाही. म्हणजे सगळ्याला कारणीभूत ठरूनही त्यांना नामानिराळे होता येणार आहे व सर्व दोष नागरी सरकारच्या माथी मारता येण्यास ते मोकळे असतील.

## पोप फ्रान्सिस





लक्ष्यभेद
जयदीप सोनखासकर
9890508017


**जगभरातून आले चाहते**
**तसेच विविध राष्ट्र प्रमुख**
**अश्रूपूर्ण दिली मानवदंनाते**
**ही ठरली कार्याची ओळख**

**मानवतेचा दिला संदेश**
**मदर मेरी प्रत समर्पित**
**समाजसेवेचा अभिनिवेश**
**अंत्यविधी राही लक्षात**

**भारताच्या राष्ट्रपती मुर्मू**
**देखील होत्या उपस्थित**
**फक्त नाव लिहावे फ्रान्सिस**
**विसावला हा संत समाधीत**

## ॥ अभंगवाणी ॥

- प्रवीण हटकर
८०५५२१३२८१



तुला जसे वाटे
जगा का ? वाटेल ।
ही गोष्ट कळेल
केव्हा तुला ॥

जगाला नकोच
वेठीस तू धरू ।
हे नको विसरू
तू न सर्व ॥

बा तुझी किंमत
किती ठरविते ।
काम ठरविते
कर्मातुन ॥

तू केलेले कर्म
तुझे शिल्पकार ।
बनती आधार
पुढे तुला ॥

# थांबला तो जगला



## कानोसा

विद्या भगतसिंग राणे
अकोला, 8888509456




लोकायले कायची घाई अशीन बरं इतली? जराक थांबत नाईत. बोलतांनी,कोन्तीई कृती करतानी,आव-इच्यार करून तोच या दुनियेत टिकला. तन-मन -धनाची तोळफोळ करतात.

नाईतं मराले तं सरेच आले. फक्त आपला मुक्काम या ग्रहावर जास्तीत जास्त अन् यशस्वी व्हाव यासाटी जो प्रयत्न करीन त्याचंच जगनं कामाचं.

कोनी कोनाले उलटून बोललं का बात्तच हमरीतुमरीवर येतात. येच्यातून मोठमोठे गुन्हे घळतात. आपली इज्जत आपल्याले इतली प्यारी अशीन तं तिले संभावून नाई ठुता येत? उलटून काई बोलतीन असं काऊन कराव? मिजास दाखोनं,बयादाटून गाळ्याईची स्पीड वाढोनं, पोरी दिसल्या का बिनकामी तिवरनं हे काय लय शानपनाचं लक्षन हाये?

सिग्नलवर जो-याजो-यात वाजोल्या जानारे हार्न मान्साच्या उतावळेपनाची साक्ष देतात. कुठीई जा कोनीच कोनाले नाई आईकत. लोकायचा को-को बजार, मंदिर,देवी गनपती उत्सवातला गान्या-गरब्याचा दांगळो,त्यात हरेकाची कमी होयेल सहनशक्ती, परिस्थिती कशी काय हाताळाव बरं सामान्य मान्सानं,पोलीसाईनं?

आल्या दिवसाले... याक्शीडंट झाला, सुनीले जीवू मारलं, आत्महत्या केली, पोरगा- पोरगी पळून गेले, वैमनस्य-खून, बँकेत घापला...अशा बातम्याईनं पूरा पेपर भरेल रायते. जराक इच्यार करा का हे सरं व्हाच्या आंदी त्यात फशेल लोकायनं येक शेकंद थांबून मंग कृती केली तं किती साजरं हुईन? जिंदगी बर्बाद केल्यापक्षी येक शेकंद वाट पावून, सारासार इच्यार करून वागतात तेच खरे शायने!

रस्त्यावरून कोन्ती गाळी आपल्यापुळे निंगाली तरी पोट दुखनारी पिळी काय समाजसेवा करीन, देव जाने! त्याची तं अपेक्षाबी नाई म्हना पन निदान आपापले कामं तरी बराबर कराव का नाई? रस्त्यानं जो-यात गाळी चालोना-या पोराले म्या हटकलं तं तो म्हंते तेवळ्याच सुट्ट्या भेटतीन क्लासले! हा इच्यार नाई करनार का त्यात आपला नाईतं दुस-याचा जीव गेला तं? हे लोकं फक्त आपल्यापुरताच इच्यार करतेत. गाळीले कट मारल्याकारनानं मर्डर क-याले निंगना-या लोकाईचा दिमाक केवळा अशीन? भरधाव चारचाकीनं येका जवान बाईचा जीव घेतला न् अंदरलं पोट्टं म्हंते ''मले पकळसान तं मी पुलावून खाली उळी मारीन.'' पा यायची अक्कल!

मान्साचे षड्रिपू- षड् रिपू- सहा अवगुन- त्याईले मान्साचे दुस्मान म्हतलं संताईनं. तेच मान्साले खराब रस्त्यावर चालाले भाग पाळतात. काम, क्रोध, लोभ, मद, मोह, मत्सर हे अवगुन मान्सातली मानुसकी हिरावून घेतात न् त्याले आव-इच्यार करू देत नाईत. मंग मोठ्ठं नुकसान होते त्यावक्ती अक्कल येते. टाईम निंगून गेल्यावर अक्कल यीवून बी काई फायदा नसते.

भांडनं क-याच्या पैले जराक थांबून मनातच आपली काय चूक होती हा इच्यार केला तं किती साजरं हुईन? शक,बदला, खूनासारक्या कितीतरी गुन्ह्याईचा आपल्याच मनात हिसोब लावला का पुळची दुर्घटना घळत नाई. या जराभर थांबन्याचा फायदा बळीले बी अन् गुन्हेगारालेबी सारकाच भेट्टे. न् तो तितला टाईम येकखेप निंगून गेला का मंग काय टेंशन हाये? अपराध होतंच नाई तं कोनाचं आपल्याच्यानं वाईट झालं हे अपराधीपनाची भावना संगं मीरोयाचं कामच नाई. बिनाकामी गुन्ह्याचं आपल्या मनावर वझं घ्याचं कामच नाई ना!!

जगन्याच्या धावपयीत मानूस सारासार इच्यार करनं इसरला. सोताले जगज्जेता समजाले लागला. मी हावो तं कोनी नाई म्हंते. आयुष्यात कदीबी इतलं येकच करा, जर काई वाईट घळ्लं, काई संकट आलं तं आमासंक थांबाव न् मंगच तेच्यावर प्रतिक्रिया द्याव. हर परिस्थितीत आपला विवेक जागृत ठुला पायजे. म्हंजे ह्या इतल्या केसा कोर्टाईनं पळेल हायेत त्याचा भार उलसाक कमी हुईन. आपला वखद न् पैसा सरंच वाचीन. दिमाक ताजातवाना राईन. फक्त येक शेकंद थांबनं कितीक फायद्या चं पळते पा! थांबला तो संपला हे म्हन मान्साच्या प्रगतीसाठी हाये अन् मान्साले शायनं करून जगन्यालायक बनोते तो इच्यार म्हंजे थांबला तो जगला!!

# मनातील आठवणी



## संवाद

सौ.प्रांजल रायपुरे
9028825708



आठवणीचा कोपरा मनातील हीत गुज रोम रोमांचित करते आनंदासाठी मोठेपणी सुख वेचतो पण आयुष्याच्या पाल्याडात दुःखात सुख सुखात दुःख पाहतांना लटके हसूत रमतो... प्रत्येकाच्या आयुष्यात संघर्ष असतोच अवतरलेल्या देवांनाही संघर्ष करावा लागला आव्हानाचा सामना करून हसत हसत जगावे. अशी शिकवण समाजाला दिली अपयशाच्या दरीतही यशाचे शिखर गाठुन असे प्रसंग आयुष्यात आठवणीचं नवं घर बांधते आठवणीचा कोपरा तीन किल्ल्यात जगते मेंदू मन भावना मेंदूत आठवणीचे विचार ''जमापुंजी'' करते त्यावर मंथन होते निर्णय कोणती गोष्ट योग्य की अयोग्य ही ठरवण्याची क्षमता मेंदूत असते मन हे ऊर्जा स्तोत्र विल पावर आहे ती दिसत नाही पण जाणवते...

भावना उद्रेक करणाऱ्या असतात प्रेम असो किंवा द्वेष मन आणि मेंदू यांच्या युद्ध अभ्यास सतत मनात रुळत राहतो सुखदुःखाचे कोपरे तयार करतो...

माणूस हा सृष्टीतील महत्त्वपूर्वक घटक आहे मनातील आठवण हा त्याचा प्रतिबिंब आहे प्रतिबिंब म्हणजे आपल्यातीलच दुसरं दुसऱ्यातील चांगले वाईट गुण सामावून घेणे प्रत्येकाच्या आयुष्यात आठवणीचा कोपरा असतोच पण आनंदाचा हसरा कोपरा स्वतःबरोबर सहवासातील परिजनांचा आत्मा पुलकित करतो अनगीनत आठवणीचे कोपरे असतात पण आपल्या मनाप्रमाणे जगण्या सारखा कोपरा क्वचितच...

आयुष्याची पाहाटात आकाशा सारखे रंग भरावे

प्रहराप्रमाणे ...जीवनशैली निसर्गाची ही सुद्धा आपण आपल्या रंगातच रंगतो पटलं तर घ्या अशा विचाराने सृष्टी बनलेली आहे. प्रत्येक सकाळ ही जीवनातील पहिली सकाळ असावी .झोपेतून उठणे म्हणजे मेल्यावर पुन्हा जिवंत होणे त्याच क्षणी व्यक्ती शांत असतो... काही आठवणी विसरल्या जात नाही नात्यांचा परिहार असाह्य झाला की एकांतात येतात जातात मन मनाला दिवसभर छळतात. काही जरी करत असलं तरी आठवणी एकांताच्या कळा खूप गहिवरून येतात...

स्नेहभाव माया मामतेचा मूळ सांगतात बालपणीचा अंगण आठवले की आजही मित्र ,मैत्रिणी भाऊ-बहीण दंगा ,मस्ती करायची पण रुसायचं कधी कधी बाबा दिसतात सर्व चिडीचूप होई नंतर खेळायला मस्तीला सुरुवात होई...

आठवणी मनातल्या कविता होतात नाहीतर वाळूनही जातात .मनात जीवापाड जपल्या जातात माहेरच्या आठवणी स्त्री मनास रडवते .प्रेमळ जीवाभावाची पण तीच नजर शोधे हरीचे राऊळ.... तान्हा बाळाला आईच्या पाण्याची ओढ ...मनातील तळ कधी कधी इतका साचतो भूतकाळात नेतो सुखदुःख कसे उभारले कसे भोगले सोसले आज आचार्य वाटते असे सारे निभवले...

जेव्हा आठवणी पुटपुटतात तेव्हा संवेदना बहरून येतात आठवणीची वाट धाव घेते स्वतःला हरवून बसते वेड्या मनाला उमगते आठवणी हृदयात मोर पिसारा फुलवितो मनातील आठवणी गोड असतात नंतर अंगात स्मृतीचे वेड लावून जातात आत्माराम झंकारून नयन मात्र ओलावतात... आयुष्याच्या नित्य प्रवासी कधीच थकत नाही ध्येय गाठूनी यात्रा मात्र सुकवायची नाही कधी कधी कितीही पळालो कितीही धावलो तरी क्षणभरही वेड मन थांबत नाही विचारी शृंगतेने स्वतःसाठी वेळ काढावा तरच नव्याने ओळख होईल अंतर्मुख होऊन मनाचा तळ ढवळून याचे उत्तर शोधायला हवं नाहीतर दुसऱ्यांच्या सुखामागे धावून केवळ दम छाक होईल ..आयुष्याची शर्यत उलटी असते सावली देणारे झाड सुद्धा ऐनवेळी शर्यतीतून पळ काढतात

मनातील विचारांची दरी खरी आयुष्याची कुरकुर करते अस्तित्व नष्ट करते एकाकी राहण्याचे वारे निर्माण करते .किंमत नसते कोणाची मी म्हणेल तेच खरे व्यसनाधीन होऊन जगतो फक्त स्वतः साठी....सुखद आठवणी टिकवायची असेल तर नात्यांमध्ये प्रत्येक क्षणातील विचारांमध्ये केवळ आनंदी आठवण असावी दोन्ही कडील समतोल साधले तर कटूता येणारच नाही... आयुष्य सुखी अभिमानी वाटेल समजूतदारपणा हीच खरी आठवणीचे शांतीचे निवांत परिसर होय...

# हक्काची दशकपूर्ती : सेवा हक्क दिन विशेष



## प्रासंगिक

विकास मीना
जिल्हाधिकारी, यवतमाळ




लोकसेवा सर्वसामान्य नागरिकांना विहित कालावधीत, पारदर्शीपणे आणि कमीत कमी त्रासात शासकीय सेवा उपलब्ध करून देणे कोणत्याही शासन, प्रशासनाचे प्राधान्याचे काम असते. काही वर्षांपूर्वी शासकीय सेवा मिळविण्यासाठी नागरिकांना वारंवार शासकीय कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागत होते. आजपासून बरोबर १० वर्षांपूर्वी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम अस्तित्वात आला आणि शासकीय सेवा पारदर्शीपणे आणि वेळेत देण्याचे कायदेशीर बंधन आले. या अधिनियमान्वये सेवा उपलब्ध करून देण्याच्या कामात एकप्रकारे क्रांतीच घडून आली आहे.

शासकीय विभागांकडून पारदर्शक व कालबध्द पध्दतीने सेवा प्राप्त करण्याचा हक्क राज्यातील नागरिकांना या अधिनियमाने दिला आहे.

नागरिकांना दिलेल्या हक्काची प्रभावी अंमलबजावणी होते किंवा नाही याचा आढावा घेऊन लोकसेवा हक्क अधिनियमाची पुढील वाटचाल अधिक प्रभावी होण्यासाठी २८ एप्रिल हा दिवस 'सेवा हक्क दिन' म्हणून साजरा करण्यात येत आहे.

**जिल्ह्यात १० वर्षात ६७ लाख सेवा:**

सेवा हक्क अधिनियमान्वये यवतमाळ जिल्ह्यातील नागरिकांनी मागील दहा वर्षात ७० लाख ३२ हजारावर ऑनलाईन अर्ज सादर केले. त्यापैकी ६७ लाख ३८ हजारावर अर्ज मान्य करुन कालमर्यादेत सेवा पुरविण्यात आली आहे. अर्ज निपटाऱ्याचे प्रमाण ९६ टक्के आहे. सेवा मिळण्यासाठी साधारणतः सरासरी दरवर्षी ७ लक्ष ३ हजारावर ऑनलाईन अर्ज दाखल होतात. अर्ज करण्याचे प्रमाण वाढत असून २०२४-२५ या एका वर्षामध्ये ९ लाख ८० हजार ऑनलाईन अर्ज दाखल झालेले आहेत.

**अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी:**

अधिनियमाच्या प्रभावी अंमलजबावणीसाठी जास्तीत जास्त सेवा ऑनलाईन करण्यावर भर देण्यात येत आहे. सेवा देणाऱ्या कार्यपध्दतीमध्ये सरलता, सेवा देणाऱ्या यंत्रणांचे सक्षमीकरण, सेवा देणाऱ्या प्रणालीचे सनियंत्रण, जनजागृती, अधिनियमाची प्रचार व प्रसिध्दी, नागरिकांकडून अभिप्राय घेऊन त्यामध्ये सुधारणा, घरपोच सेवा उपलब्ध करण्यासारखे उपक्रम राबवून या अधिनियमाची अधिक प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याचे प्रयत्न सातत्याने केले जात आहेत.

**सेवांची संख्या ३५० वरून १०२७:**

लोकसेवा हक्क अधिनियम अंमलात आला त्यावेळी अंदाजे ३०० ते ३५० एवढ्याच सेवा अधिसूचित होत्या. सेवांची संख्या आता वाढवून १ हजार २७ एवढी करण्यात आलेली आहे. या सेवांमध्ये आणखी वाढ होणे अपेक्षित आहे. त्यासाठी आपले सरकार पोर्टल अद्ययावत करण्यात येत आहे.

**सेवादूताद्वारे आता घरपोच सेवा:**


लोकांच्या मागणीनुसार काही खाजगी संस्था उत्पादने व सेवा घरपोच पुरवितात. त्याचप्रमाणे सेवादूत या उपक्रमाद्वारे सेवा हक्क अधिनियमान्वये शासनाच्या सेवा देखील सेवादूतामार्फत आता घरपोच मिळणार आहे. ज्यांना शासकीय कार्यालयांमध्ये जाणे शक्य होत नाही, त्यांना घरपोच सेवेचा लाभ घेता येणार आहे. सेवा हमी अधिनियमाची ही एक महत्वाची उपलब्धी आहे.

**पंधरवाड्यात प्रलंबित प्रकरणांचा निपटारा:**

लोकसेवा हक्क अधिनियमाच्या दशकपुर्ती निमित्त दि.२८ एप्रिल ते १२ मे या कालावधीत सेवा पंधरवाडा राबविण्यात येत आहे. या कालावधीत आपले सरकार सेवा पोर्टल, नागरी सेवा केंद्र, सार्वजनिक तक्रार पोर्टल व शासनाच्या विविध विभागांच्या संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या व २५ एप्रिल रोजी प्रलंबित असलेल्या सर्व अर्जाचा मोहिम स्वरुपात निपटारा करण्यात येणार आहे. सर्वसामान्य जनतेशी निगडीत महसूल, ग्राम विकास, कृषि, सार्वजनिक आरोग्य, आदिवासी इत्यादी विभागामार्फत अधिसूचित केलेल्या सेवा कालबध्द पध्दतीने पुरविण्यात येतील.

लोकार्थ

# पोलादी भारतासाठी एकत्र या -इंडिया स्टील २०२५ परिषदेत पंतप्रधानांचे आवाहन



लवचिक पण पोलादी व मजबूत भारताची उभारणी करण्यासाठी पोलाद स्टील क्षेत्रातील उद्योगांनी एकत्र यावे असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्टील २०२५ परिषदेच्या उदघाटन प्रसंगी दृक श्राव्य माध्यमाद्वारे संवाद साधताना केले. पोलाद हे उदयोन्मुख उद्योगक्षेत्र आहे. या क्षेत्रासाठी देशाला कच्चा मालाचा पुरवठा सुरक्षित करण्यासाठी जागतिक भागीदारी मजबूत करण्याची आवश्यकता आहे. यासाठी पोलाद उत्पादन वाढविण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या ग्रीनफिल्ड खाणींमधून लोहखनिज काढणाया सुरवात करण्याचे आवाहन पंतप्रधानांनी केले. देश अजूनही निकेल,कोकिग, कोळसा आणि मँगेनीज साठी आयातीवर अवलंबून आहे. म्हणूनच आपण जागतिक भागीदारी अधिक मजबूत केली पाहिजे. पुरवठा साखळी सुरक्षित केली पाहिजे आणि तंत्रज्ञानाच्या सुधारणांवर लक्ष केंद्रित केले पाहिजे याकडे देखील मोदींनी लक्ष वेधले.

मोदी म्हणाले कि, २०२३ पर्यंत स्टील उत्पादन क्षमता ३० कोटी टनापर्यंत वाढविन्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये स्टील उत्पादनक्षमता १७९ मेट्रिक टन होती. त्याच कालावधीत दरडोई स्टीलचा वापर सध्याच्या ९८ किलोवरून १६० किलोपर्यंत वाढविण्याचे लक्ष देखील आहे.

पंतप्रधानांनी सांगितले कि,देश १.३ लाख कोटी अमेरिकन डॉलरच्या राष्ट्रीय पायाभूत सुविधांना पुढे नेत आहे. आणि शहरांना मोठ्या प्रमाणात स्मार्ट सिटी मध्ये रूपांतरित करण्यासाठी व्यापक स्तरावर काम सुरु आहे.

# ड्रीम टेक्नॉलॉजीची पहिली भारतीय ब्रँड ॲम्बेसेडर कृति सेनन





स्मार्ट होम टेक्नॉलॉजी क्षेत्रात जागतिक नेतृत्व असलेल्या ड्रीम टेक्नॉलॉजीनं बॉलिवूड अभिनेत्री कृति सेनन हिला आपला पहिला भारतीय ब्रँड ॲम्बेसेडर जाहीर केलं आहे. ही भागीदारी भारतात नाविन्यपूर्ण आणि बुद्धिमान गृह उपाययोजना आणण्याच्या ड्रीमच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे, जो रोजच्या घरगुती कामांना अधिक सोपं आणि कार्यक्षम बनवण्याच्या दिशेनं एक नवी व्याख्या ठरतो आहे.

कृति सेनन आणि ड्रीम टेक्नॉलॉजी यांच्यातील ही जोडी भारतातील कंपनीचं अस्तित्व आणखी मजबूत करण्यासाठी एक मोठं पाऊल आहे. यामागचा उद्देश म्हणजे अशा भारतीय ग्राहकांना लक्षात घेऊन स्मार्ट उपाययोजना देणं, जे स्वच्छता आणि पर्सनल केअरसाठी इंटेलिजंट प्रोडक्ट्स शोधत आहेत, जेणेकरून ते स्वतःच्या स्वप्नातील आयुष्याकडे लक्ष केंद्रित करू शकतील. कृति सेनन ड्रीम टेक्नॉलॉजीच्या स्मार्ट होम क्लीनिंग आणि ग्रूमिंग प्रोडक्ट्सच्या विस्तृत श्रेणीचं प्रतिनिधित्व करतील. यामध्ये हात न लावता घराची स्वच्छता करणारे इंटेलिजंट रोबोटिक व्हॅक्यूम, हाय-परफॉर्मन्स कॉर्डलेस स्टिक व्हॅक्यूम, ओलसर व कोरडा कचरा दोन्ही साफ करणारे मल्टी-यूज व्हॅक्यूम, आणि एअरस्टाइल व हाय-स्पीड हेअर ड्रायरसारखे ग्रूमिंग प्रोडक्ट्स यांचा समावेश आहे. हे सगळे प्रोडक्ट्स अशा लोकांसाठी आहेत जे स्मार्ट, जलद आणि कंफर्टेबल जीवनशैली शोधत आहेत.

संकलन -संयोजन : सुशीलकुमार मोबाईल -९६१९५८२८३५
ईमेल -susheelkuma80@yahoo.com

# आपणचं तयार करा हे महाशब्दकोडे 25




## हे कोडे कसे सोडवाल

मित्रांनो
संकेतामध्ये काही शब्द दिलेले आहेत. हे शब्दच योग्यप्रकारे या बौकटीत लिहून हे महाशब्दकोडे आपणचं तयार करा.

**संकेत शब्दः—**

**दोन अक्षरी**
अधु
कस
किर्ती
खुजा
गत
गय
गर
गवा
जल
नया
तमा
तव
ताड
थोर
दिया
नाद
नाला
पाट
पार
बीज
माळ
लक
वार
वाव
शत
शनी
साल
हुत

**तीन अक्षरी**
आलय
कराची
खडावा
खलाशी
गवत
जवान
झेंगट
टपाल
टवाळ
तगर
तपन
दरड
द्धादशी
पाईक
बुरशी
मावशी
माहुत
रगड
वऱ्हाडी
शीतल
साकार

**चार अक्षरी**
अलबत
अलगुजा
आकारणे
इजाबिजा
करवला
गवगवा
जगबुडी
जमानत
जलचर
टमाटर
नायगरा
नामांकित
बहुतेक
भाऊबीज
मधुकर
मणगट
यजमान
रामायण
लुटमार
सामाईक

**पाच अक्षरी**
गणेशवात
भगवाझोंडा
मनमोडणे
लाभकारक
स्वपनीनसणे


**अन्य अक्षरी**
मोरुचीमावशी
मनी वसे ते
स्वप्नी दिसे

### मागील महाशब्दकोडेचे उत्तर



Uday Munde - 8446302691

# महाशब्दकोडे 405



**आडवे संकेत :—**
1) बाल गुन्हेगारांना संस्कारक्षम शिक्षण देणारी शाळा, रेफ्रिमेन्टरी स्कूल
3) एका मागून एक असे तीन वेळा घडल्यास हे म्हणतात
6) वाट बघणे
8) हल्ला, छापा, प्रहार
9) मार्ग, वाट, रस्ता
10) ओढा किंवा नाल्यावरील तकलादू पूल
13) जमलेले लोक, समुदाय
15) देवाचे एकसारखे केलेले नामस्मरण
17) मन मोहून घेणाऱ्या श्रीकृष्णाचे आणखी एक नाव
18) बाजू, पक्ष
19) हस्त
20) दिवस, वासर
21) क्रीडा, खेळ, मौज
22) द्विचक्रपादयान
24) जमीन
25) दंश, चावणे
26) उंची (हिं.)
27) गुप्त बातमी देणारा अज्ञात माणूस
29) शेळ्या, मेंढ्या पाळणारा
32) बायकांच्या हातात बांगड्या भरणारा
34) एक रंग
35) उचलण्यास वजनी
36) चुपचाप, गप्प
37) हाताच्या बाह्या वर करून धैर्याने पुढे होणे
39) लक्ष, चित्त
40) नेहमी, निरंतर
41) नाना प्रकारचे
42) पंधरवाड्यातील सहावी तिथी
43) कामात नेहमी आळस करणारा, सुस्त
46) चालविणारा, मुख्य सुत्रधार
48) बांगला देशाचे एक चलन
51) परस्त्रीशी प्रेम करणारा
52) निरूपयोगी, अनावश्यक
54) एक श्रीरामपुत्र
56) पैसा, आशय
57) संपत्ती, पैसाअडका
58) समुदाय, टोळी
59) वातावरणाची स्थिती
60) मुसलमानांचा सण
62) अरण्य, जंगल
64) आयुध, हत्यार
65) अतिशय वाईट माणूस
67) तन, देह
68) कर, सारा वगैरेचे उत्पन्न
70) पति, स्वामी
71) शहरात आयात होणाऱ्या मालावरील कर
72) किमती सामान
73) घोड्याला काबूत ठेवणारी चामड्याची पट्टी
77) लक्ष्मीपतिचे दहा अवतार
78) नदी किंवा समुद्राचा तट
79) कोंबड्याचे पहाटेस ओरडणे

**उभे संकेत :—**
1) समाजात सुधारणा घडवू पाहणारा
2) भाजीपाला
3) उपाय, उपचार
4) दुसऱ्यांदा लग्न करणारा
5) मृत व्यक्तिस अर्पण करावयाचे तीळमिश्रीत उदक
6) अपघात घडल्यावर सर्वात प्रथम करावयाचे उपचार
7) धुणे
11) प्रतिध्वनी
12) कृपावंत होऊन देणे
14) खवा
16) पळून जाणे
23) नकळत आलेली दुर्मिळ संधी
26) देऊळाचे शिखर
28) थंडीत अंगावर पांघरण्याचे एक उंची वस्त्र
29) धट्टाकट्टा, तरणाबांड
30) पोलिस शिपायांनी दिलेला रात्रीचा पहारा
31) पैश्याच्या वसूलीकरीता एकसारखे मागे लागणे
32) जीव व्याकूळ होणे
33) दक्ष, जागृत, हुशार
35) एक धान्य प्रकार, सातू
36) स्वर्गलोकीची एक अप्सरा
38) सूर्य
39) आश्चर्यचकित होणे
40) धातूची शलाका
44) छत्रपती शिवाजी महाराजांच्या मातोश्री
45) सरकारकडून मिळणारे संस्थेस किंवा व्यक्तिस मिळणारे आर्थिक सहाय्य
47) स्वार्थ हेतू एखाद्याशी जवळीक साधणे
49) काळाचे परिमाण
50) पृथा पुत्र अर्जुन
52) हानी, दुखापत
53) एकाच देवतेच्या हजार नावांचा जप करणे
55) जंगलाचा राजा सिंह
56) पसंती, संमती, विचार
61) दहाही दिशा, चहूकडे
63) आश्चर्य, चकित होणे
66) ढकलणे, धक्का देणे, कसेतरी निभावून नेणे
69) सुंदर स्त्री
72) चोप, ताडन
74) चिखल
75) वृक्षाच्या भोवती बांधलेला ओटा
76) महाभारतात नकूल – सहदेवाची आई
(उत्तर पुढील अंकी) ●

### मागील महाशब्दकोड्याचे उत्तर



Uday Munde - 8446302691

## राशी-भविष्य

**मेष :** आज खाण्याच्या सवयींवर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. अनावश्यक दिखाव्यापासून दूर राहा. मानसिक शांतीच्या शोधात असाल.

**वृषभः** खूप काम असेल. नोकरीत इच्छित बदली आणि पदोन्नती मिळण्याची शक्यता देखील आहे. आर्थिक गुंतवणूक हुशारीने करा.

**मिथून :** आज तुम्हाला तुमच्या पत्नीकडून सहकार्य आणि पाठिंबा मिळेल. व्यवसायात प्रगती शक्य आहे. व्यवसायात काही नवीन योजना आखल्या जातील.

**कर्क :** सामाजिक कार्यक्रमांमध्ये तुमची प्रशंसा होईल. व्यवसायात फायदेशीर सौदे आत्मविश्वास वाढवतील. आज धैर्य आणि शौर्य वाढेल. धार्मिक ग्रंथ वाचण्यात रस वाढेल.

**सिंह :** तुम्ही इतरांवर खूप लवकर विश्वास ठेवता, काळजी घ्या. प्रतिकूल परिस्थितीला खंबीरपणे तोंड देऊ शकाल. व्यवसायातील अडचणी संपतील.

**कन्या :** तुमच्या दैनंदिन दिनचर्येत बदल झाल्यामुळे तुमच्या वैयक्तिक कामावर परिणाम होईल. कुटुंबात शुभ प्रसंग येतील. व्यवसायात नफा मिळण्याची शक्यता आहे.

**तुळ :** आज प्रलंबित पैसे मिळाल्याने तुमची बचत वाढेल. आपण आत्मविश्वासाच्या बळावर पुढे जाऊ. कौटुंबिक आनंद आणि समाधान

**वृश्चिक :** तुम्ही तुमच्या आरोग्याबाबत किती निष्काळजी आहात. नवीन व्यवसायात गुंतवणूक करण्याची शक्यता आहे. आज तुम्हाला विद्वानांच्या सहवासात राहण्याची संधी मिळेल.

**धनु :** तुम्ही तुमच्या नातेसंबंधांबद्दल निष्काळजी आहात. व्यवसायात विकासाच्या योजना आखता येतील. आर्थिक समृद्धीमुळे आनंदाचे साधन वाढेल.

**मकर :** तुम्हाला नोकरीत बदल हवा आहे, परंतु निर्णय घेताना गोंधळ होईल. साहित्य वाचनात रस वाढेल. मुलांच्या भविष्याबद्दल चिंता असेल. व्यवसायात विचारपूर्वक घेतलेले निर्णय शुभ परिणाम देतील.

**कुंभ :** वेळेचा सदुपयोग करा. तुमची सुसंगतता बदला. दुसऱ्यांच्या प्रगतीने दुःखी होऊ नका. तुम्ही कठोर परिश्रम केले पाहिजेत आणि तुमची संकुचित मानसिकता बदलली पाहिजे.

**मीन :** वेळेवर काम न झाल्यामुळे मन अस्वस्थ राहील. कलात्मक कामांना बक्षीस मिळेल. नवीन व्यवसाय योजना आखल्या जातील. बांधकाम कामात सुधारणा होईल.

आचार्य पं. श्रीकांत पटैरिया: मो. ७८७९३७२९१३

## थोडक्यात

### पहलगाम हल्ल्याचा तपास एनआयएकडे, गृहमंत्रालयाचा महत्त्वाचा निर्णय

**नवी दिल्ली :** केंद्र सरकारने जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा तपास राष्ट्रीय तपास यंत्रणेकडे सोपवला आहे. गृह मंत्रालयाने याबाबत अधिकृत परिपत्रक जारी केलं आहे. त्यामुळे एनआयए औपचारिकपणे या हल्ल्याचा तपास करणार आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार एनआयएचं पथक हल्ला झाल्यापासून पहलगाममध्ये असून या प्रकरणाचा तपास करत आहे. आता केंद्र सरकारने अधिकृतपणे संपूर्ण तपास एनआयएकडे सोपवण्यात आला आहे.राष्ट्रीय तपास यंत्रणा स्थानिक पोलिसांकडून या हल्ल्याशी संबंधित आतापर्यंत मिळालेली माहिती, केस डायरी, एफआयआर आणि इतर महत्त्वाची कागदपत्रे ताब्यात घेईल आणि पुढील तपास सुरू करेल. पहलगाममधील हल्ल्यामुळे काश्मीर खोऱ्यातील नागरिकांच्या, पर्यटकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. परिणामी येथील सुरक्षेची जबाबदारी प्रमुख दहशतवादविरोधी संस्थेकडे सोपवण्यात आली आहे. एनआयए लवकरच या हल्ल्याच्या सर्व पैलूंचा सखोल तपास करेल. हल्ल्याचा कट कोणी व कुठे रचला? यामध्ये सहभागी दहशतवादी संघटना, त्यांची भूमिका, स्लीपर सेलचा संभाव्य धोका याविषयीचा तपास करून लवकरच गृह मंत्रालयाला अहवाल सादर करेल.

एनआयएने या प्रकरणाशी संबंधित प्राथमिक माहिती गोळा केली आहे. जेणेकरून त्यांना त्यांचा तपास राष्ट्रीय पातळीवर पुढे नेता येईल. सुरुवातील जम्मू-काश्मीर पोलीस या प्रकरणाचा तपास करत होते. परंतु, हल्ल्याचं गांभीर्य, नागरिकांची सुरक्षितता, मोठा दहशतवादी कट व आगामी धोके लक्षात घेता गृह मंत्रालयाने या हल्ल्याचा तपास एनआयएकडे सोपवला आहे.

### भारताने बदला न घेतल्यास लज्जास्पद परिस्थिती



**काश्मीर :** ; पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर संपूर्ण देश, विशेषतः जम्मू आणि काश्मीरमध्ये सतर्कता आहे. जम्मू आणि काश्मीरच्या सीमावर्ती भागातही व्यापक सुरक्षा व्यवस्था केली जात आहे. या क्रमाने, पाकिस्तानी सीमेला लागून असलेल्या गावातील लोकांनी जुन्या बंकरची साफसफाई सुरू केली आहे. अरिना येथील ट्रेवन गावातील एका स्थानिक रहिवाशाने सांगितले की, पूर्वी गोळीबाराच्या वेळी लोक सरकारने दिलेल्या बंकरमध्ये आश्रय घेत असत. पहलगाम घटनेनंतर आता पुन्हा एकदा तयारी तीव्र करण्यात आली आहे. स्थानिकांनी एका वृत्तवाहिनीशी बोलताना, ''सीमेवर बराच काळ शांतता होती, त्यामुळे बंकरचा वापर बंद करण्यात आला. परंतु सध्याची परिस्थिती लक्षात घेता जिथे कधीही काहीही घडू शकते, आता बंकर पुन्हा स्वच्छ केले जात आहेत''असे त्यांनी म्हटले.. ते म्हणाले की, सिंगल बंकर ताबडतोब तयार होतात, परंतु कम्युनिटी बंकर दुरुस्त करण्यासाठी वेळ आणि कठोर परिश्रम लागतात. पहलगाम हल्ल्यावर ग्रामस्थांनी संताप व्यक्त केला आणि म्हटले की जर भारताने त्याचा बदला घेतला नाही तर ते आपल्यासाठी लज्जास्पद असेल. आम्ही सीमेजवळ राहत असल्याने, कोणत्याही परिस्थितीचा सर्वात आधी परिणाम आम्हालाच होईल.

### ३८ वर्षांपासून भारतात राहणाऱ्या शारदाबाईंना देश सोडण्याची नोटीस



**नवी दिल्ली :** पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तान विरोधात कठोर पाऊले उचण्यास सुरवात केली आहे. याचाच भाग म्हणून केंद्र सरकारने पाकिस्तानी नागरिकांना दिले जाणारे व्हिसा रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाचा फटका बसलेल्यांमध्ये पाकिस्तानी वंशाच्या ५५ वर्षीय शारदाबाई यांचाही समावेश आहे. त्यांचे लग्न एका भारतीय नागरिकाशी झाले असून, गेल्या ३८ वर्षांपासून त्या ओडिशामध्ये राहत आहेत.

शारदाबाई, लग्नानंतरच्या शारदा कुकरेजा यांचा जन्म १९७० मध्ये पाकिस्तानच्या सिंध प्रांतातील सुक्कुर शहरात झाला होता, असे त्यांच्या पाकिस्तानी पासपोर्टवरून दिसून येते. जिल्हा पोलिसांनी त्यांना भारत सोडण्याची नोटीस पाठवली आहे. यामध्ये म्हटले आहे की, शारदाबाई यांच्याकडे भारताचा दीर्घकालीन व्हिसा नाही किंवा त्या सूट दिलेल्या श्रेणींमध्येही येत नाहीत. त्यांनी दिलेल्या मुदतीत भारत सोडला नाही तर, त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे. शारदाबाई म्हणाल्या की, त्यांचे वडील १९८७ मध्ये त्यांच्या सहा मुलांसह ६० दिवसांच्या व्हिसावर भारतात आले आणि ओडिशाच्या कोरापुट जिल्ह्यात स्थायिक झाले.

# हल्ल्यातील आरोपींना न्यायाच्या चौकटीत आणा

## संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा समितीचे मत; परिस्थितीवर लक्ष

**न्यूयॉर्क, दि.२७ वृत्तसंस्था**

संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा समितीने (यूएनएससी) पहलगाममधील दहशतवादी हल्ल्याचा तीव्र शब्दांत निषेध नोंदविला. तसेच या निंदनीय दहशतवादी कृत्यातील दोषी आणि त्यांच्या मदतनीसांना जबाबदार धरले पाहिजे आणि त्यांना न्यायाच्या चौकटीत आणले पाहिजे, असे मत व्यक्त केले.

समितीच्या १५ सदस्य देशांच्या वतीने शुक्रवारी (ता.२५) जम्मू आणि काश्मीरमधील दहशतवादी हल्ल्यासंबंधी एक निवेदन प्रसिद्ध करून तीव्र शब्दात निषेध केला. ''कोणत्याही प्रकारचा दहशतवाद हा आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षेसाठी गंभीर धोक्यांपैकी आहे. कोणत्याही दहशतवादी कृत्यांचा हेतू काहीही असो, ते कुठेही,



केव्हाही आणि कोणीही केले असले तरी तो गुन्हा असून अन्यायी आहेत,'' असे निवेदनात म्हटले आहे. या निंदनीय दहशतवादाच्या कृत्यासाठी हल्ला करणारे आरोपी, त्याचे प्रायोजक, आयोजक आणि आर्थिक रसद पुरविणारे यांना जबाबदार धरण्याची आणि त्यांना न्याय मिळवून देण्याची गरज अधोरेखित केली या समितीने व्यक्त केली.

या हत्याकांडात ज्यांचा हात आहे, त्यांना जबाबदार धरले पाहिजे आणि आंतरराष्ट्रीय कायदा आणि सुरक्षा समितीच्या ठरावानुसार या घटनेत सर्व देशांनी त्यांच्या पातळीवर सहकार्य करण्याचे आवाहन निवेदनात करण्यात आले आहे. हे निवेदन १५ देशांच्या वतीने समितीच्या अध्यक्षांनी प्रसिद्ध केले आहे.

'यूएन'मधील फ्रान्सचे कायमस्वरूपी प्रतिनिधी राजदूत जेरोम बोनाफोंट हे सुरक्षा समितीचे अध्यक्ष आहेत.

### युद्धाची शक्यता नाही

पोप फ्रान्सिस यांच्या अंत्यसंस्काराला उपस्थित राहण्यासाठी रोमला गेलेले गुटेरस न्यूयॉर्कमध्ये परतल्यानंतर भारत आणि पाकिस्तानच्या नेत्यांशी बोलणार आहेत का, योजना आखत आहेत का, या प्रश्नावर दुजारिक म्हणाले, की याबद्दल तुम्हाला मी काही सांगू शकेन, अशी मला आशा आहे. या दोन अण्वस्त्रधारी देशात युद्ध होण्याची शक्यता त्यांनी फेटाळून लावली. युद्धाची शक्यतेबद्दल मी सहमत नाही. भारत आणि पाकिस्तानमधील परिस्थितीवर आमचे बारीक लक्ष आहे,'' असे दुजारिक म्हणाले.

## भारत आणि पाकिस्तान तणाव दूर करतील- डोनाल्ड ट्रम्प

**वॉशिंग्टन : दि.२७ वृत्तसंस्था**



भारत आणि पाकिस्तान हे दोन्ही देश त्यांच्या परस्पर संबंधांतील तणाव दूर करतील अशी आशा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी व्यक्त केली आहे. भारत आणि पाकिस्तानमध्ये खूप तणाव आहे, परंतु दोन्ही देश कोणत्या ना कोणत्या मार्गाने त्यावर तोडगा काढतील, असे ट्रम्प यांनी एअर फोर्स वनमध्ये पत्रकारांना सांगितले. ट्रम्प म्हणाले की ते दोन्ही देशांच्या नेत्यांना ओळखतात. मात्र ते या नेत्यांशी संपर्क साधणार का, या प्रश्नावर उत्तर देण्याचे ट्रम्प यांनी टाळले.पोप फ्रान्सिस यांच्या अंत्यविधीला उपस्थित राहण्यासाठी रोम येथे जात असताना आपल्या विमानात पत्रकारांशी बोलताना ट्रम्प म्हणाले, काश्मीरमध्ये बऱ्याच काळापासून लढाई सुरू आहे आणि पहलगाममध्ये जे घडले ते खूप वाईट होते. सीमेवरील तणाव बऱ्याच काळापासून आहे, परंतु ते कोणत्या ना कोणत्या मार्गाने प्रश्न सोडवतील. मला खात्री आहे, मी दोन्ही नेत्यांना ओळखतो असे त्यांनी नमूद केले.दरम्यान, अमेरिकेतील तज्ज्ञांच्या म्हणण्यानुसार ट्रम्प यांची ही भूमिका हे स्पष्ट करत आहे की भारताने जर काही कारवाई आता केली तर अमेरिका त्यात हस्तक्षेप करण्याच्या भानगडीत पडणार नाही.

## मी भारताची सून, मला येथेच राहू द्या- सीमा हैदर

**नवी दिल्ली, दि.२७ वृत्तसंस्था**



काश्मीर येथील पहलगाम हल्ल्यानंतर पाकिस्तानी नागरिकांना त्यांच्या मायदेशी परत पाठवण्याच्या केंद्र सरकारच्या निर्णयानंतर प्रेमासाठी पाकमधून अवैधरीत्या भारतात आलेल्या सीमा हैदरचे काय होणार, हा प्रश्न उपस्थित होत आहे. यावर सीमाने पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्याकडे आपल्याला भारतात राहू देण्याची विनंती केली आहे. सीमाचा एक इंस्टाग्राम व्हिडीओ व्हायरल झाला आहे. यामध्ये सीमा तिला पाकिस्तानात परत जायचे नसल्याचे सांगत. मी पाकिस्तानची मुलगी होते. परंतु आता मी भारताची सून आहे.


## पाकिस्तानमधील मुजफ्फराबादमध्ये अचानक महापूर, आणीबाणी घोषित

**नवी दिल्ली, दि.२७ वृत्तसंस्था**

आता पाकिस्तानी माध्यमांमध्ये असा दावा करण्यात आला आहे की भारताने अचानक झेलम नदीत पाणी सोडले. यामुळे पुरस्थिती निर्माण झाली आहे.पाकिस्तानने मुझफ्फराबादमध्ये आणीबाणी जाहीर केली आहे.

जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमध्ये तणाव आहे. भारताकडून नद्यांचा पाण्याचा प्रवाह रोखण्याची घोषणा करण्यात आली. आता पाकिस्तानी माध्यमांमध्ये असा दावा करण्यात आला आहे की भारताने अचानक झेलम नदीत पाणी सोडले. यामुळे पुरस्थिती निर्माण झाली आहे. पाकिस्तानने मुझफ्फराबादमध्ये आणीबाणी जाहीर केली आहे. पाकिस्तानी मीडिया रिपोर्टनुसार पाकिस्तानी अधिकाऱ्यांना माहिती न देता अचानक झेलम नदीत पाणी सोडले.पाकिस्तानी माध्यमांच्या वृत्तानुसार, पाणी सोडल्यामुळे मुझफ्फराबादजवळ पाण्याच्या पातळीत मोठी वाढ नोंदवण्यात आली. स्थानिक प्रशासनाने हतीयन बाला येथे पाण्याची आणीबाणी लागू केली आहे. मशिदींमध्ये घोषणा देऊन स्थानिक लोकांना इशारा देण्यात आला. हे पाणी उत्तर काश्मीरमधील बारामुल्ला जिल्ह्यातून शिरले आणि पाकव्याप्त काश्मीरमधील चाकोठी भागातून वर आले. भारताने सिंधू पाणी करार स्थगित केला तेव्हा हे घडले. भारत सरकारने शनिवारी करार स्थगित करण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी औपचारिक अधिसूचना जारी

### भारताला धरले जबाबदार



केली आणि गुरुवारी ती पाकिस्तानला सोपवली अधिसूचनेत म्हटले आहे की सिंधू पाणी करार स्थगित ठेवण्यात येत आहे, ज्यामुळे सिंधू आयुक्तांमधील बैठका, डेटा शेअरिंग आणि नवीन प्रकल्पांची आगाऊ सूचना यासह सर्व करारांच्या जबाबदाऱ्या प्रभावीपणे निलंबित केल्या जात आहेत. हा करार आता स्थगित झाल्यामुळे, भारत पाकिस्तानच्या परवानगीशिवाय किंवा सल्लामसलतीशिवाय नदीवर धरणे बांधण्यास मोकळा आहे.पाकिस्तानी अधिकाऱ्यांना लिहिलेल्या पत्रात, भारताच्या जलसंपदा सचिव देबाश्री मुखर्जी यांनी म्हटले आहे की, जम्मू आणि काश्मीरला लक्ष्य करून पाकिस्तानकडून सुरू असलेला सीमेपलीकडून होणारा दहशतवाद सिंधू पाणी कराराअंतर्गत भारताच्या अधिकारांना बाधा आणतो. ''कराराचा सद्भावनेने आदर करणे हे कराराचे मूलभूत कर्तव्य आहे.

## पाणी बंद केल्यास युद्ध, १३० अण्वस्त्रे भारतासाठी तयार

**इस्लामाबाद: दि.२७ वृत्तसंस्था**

जम्मू-काश्मीरमधील पहलगाम दहशतवादी हल्ल्यात पाकिस्तानी कनेक्शन समोर आल्यानंतर शेजारील देश घाबरला आहे. दरम्यान, पाकिस्तानचे रेल्वे मंत्री हनीफ अब्बासी यांनी भारताला थेटधमकी दिली आहे. ही धमकी देताना त्यांनी, ''जर भारताने आमचे पाणी बंद केले तर युद्धासाठी तयार राहा. आम्ही गौरी, शाहीन, गझनवी आणि १३० अण्वस्त्रे फक्त भारतासाठी ठेवली आहेत. त्यांचे लक्ष भारताकडे आहे.'' असे म्हटले आहे.

पहलगाम हल्ल्यानंतर भारताने त्वरित कारवाई केली आणि सिंधू पाणी करार रद्द करण्याचा निर्णय घेतला. यामुळे पाकिस्तानकडे जाणारे पाणी थांबविण्यात आले आहे. याशिवाय, पाकिस्तानी उच्चायुक्त कार्यालयातील अनेक अधिकाऱ्यांना तेथून निघून जाण्याचे आदेश देण्यात आले आहेत. याला प्रत्युत्तर म्हणून पाकिस्ताननेही भारतासाठी

### पाक रेल्वेमंत्र्यांची थेट धमकी




आपले हवाई क्षेत्र बंद केले आहे आणि शिमला करार रद्द केला आहे.

२२ एप्रिल २०२५ रोजी जम्मू आणि काश्मीरच्या बैसरन खोऱ्यात झालेल्या भयानक दहशतवादी हल्ल्यानंतर, ज्यामध्ये २६ निष्पाप पर्यटकांचा मृत्यू झाला होता. या घटनेनंतर भारत आणि पाकिस्तानमधील तणाव शिगेला पोहोचला आहे. दरम्यान, पाकिस्तानने युद्धासारखी तयारी सुरू केली आहे, ज्यामुळे प्रादेशिक अस्थिरतेची भीती निर्माण झाली आहे. पाकिस्तानचे रेल्वे मंत्री हनीफ अब्बासी यांनी देशातील सर्व रेल्वे स्थानके पाकिस्तानी सशस्त्र दलांच्या नियंत्रणाखाली आणल्याची घोषणा केली आहे. या हालचालीचा उद्देश लष्करी उपकरणे आणि शस्त्रास्त्रांची जलद वाहतूक सुनिश्चित करणे आहे, जेणेकरून संभाव्य युद्धाच्या बाबतीत लष्करी तयारीत विलंब होणार नाही.

पाकिस्तान रेल्वे आता लष्कराच्या नियंत्रणाखाली पाकिस्तानचे रेल्वे मंत्री हनीफ अब्बासी यांच्या मते, सर्व रेल्वे स्थानकांवर लष्करी डेस्क उभारण्यात आले आहेत. संपूर्ण लॉजिस्टिक्स व्यवस्था आता सशस्त्र दलांच्या नियंत्रणाखाली आहे. गरजेनुसार आता रणगाडे, जड शस्त्रे आणि इतर लष्करी उपकरणे थेट रेल्वेमार्गे हलवता येतील. अब्बासी यांनी पुढे बोलताना, ''आमचे अधिकारी पूर्णपणे तयार आहेत आणि गरज पडल्यास ते सैन्याच्या सूचनांनुसार काम करतील.''असेहींची त्यांनी यावेळी म्हटले आहे.

## सरकारने विरोधकांची दिशाभूल केली-जयराम रमेश

**नवी दिल्ली, दि.२७ वृत्तसंस्था**



पहलगामच्या हल्ल्यासंबंधात झालेल्या सर्वपक्षीय बैठकीत मोदी सरकारने विरोधी पक्षांच्या नेत्यांची दिशाभूल केल्याचा आरोप आज काँग्रेसचे राष्ट्रीय सरचिटणीस जयराम रमेश यांनी केला. बैसरन पठार हे परवानगी न घेता किंवा सुरक्षा संस्थांना पूर्वसूचना न देता वेळेपूर्वी उघडल्या गेल्याच्या दाव्यावर या बैठकीत सरकारने भर दिला होता.

प्रत्यक्षात बैसरन पठार वर्षभर खुलेच असते, असे स्पष्ट करून स्थानिक टूर ऑपरेटर्सनी केंद्र सरकारचा दावा फेटाळून लावला आहे. बैसरन पठार जून महिन्यात अमरनाथ यात्रेकरूंसाठी खुले करण्यात येते. पण सुरक्षा दलांना पूर्वसूचना न देता हे स्थळ २० एप्रिल रोजी पर्यटकांसाठी खुले करण्यात आले होते, असे या अधिकाऱ्यांनी सर्वपक्षीय बैठकीत सांगितले होते.

संरक्षणमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत योग्य माहिती देण्यात आली नाही. प्रत्यक्षात दिशाभूल करणारी माहिती देण्यात आल्याचे दिसते,

## आम्ही भारतात घुसून दारुल उलूम देवबंदमध्ये नाश्ता करू

### रशीद महमूद सूमरोची भारताला धमकी

**इस्लामाबाद, दि.२७ वृत्तसंस्था**

जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमधील तणाव लक्षणीयरीत्या वाढला आहे. दहशतवादी हल्ल्यानंतर भारत सरकारने पाकिस्तानबाबत अनेक कठोर निर्णय घेतले आहेत. यामध्ये सिंधू पाणी करार स्थगित करणे, पाकिस्तानी नागरिकांना परत पाठवणे आणि पाकिस्तानी उच्चायुक्तालयातील कर्मचाऱ्यांची संख्या कमी करणे यासारख्या महत्त्वाच्या पावलांचा समावेश आहे. यानंतरही पाकिस्तान आपल्या कृतींपासून थांबत नाही. आता पाकिस्तान जमियत उलेमा-ए-इस्लामचे नेते मौलाना रशीद महमूद सूमरो यांनी भारताला धमकी दिली आहे.



पाकिस्तान जमियत उलेमा-ए-इस्लामचे नेते मौलाना रशीद महमूद सूमरो यांनी भारताला धमकी दिली आहे . त्यासाठी त्यांनी एक व्हिडीओ प्रसिद्ध केला आहे. यामध्ये त्यांनी,''मोदींनी हे समजून घ्यावे की पाकिस्तान एकटा नाही. गरज पडल्यास, आम्ही पाकिस्तानी सैन्यासोबत लढू आणि आमच्या पाकिस्तानचे रक्षण करण्यासाठी आमचे प्राणही देऊ. आम्ही फक्त आमच्या सीमांचे रक्षण करणार नाही तर भारतात प्रवेश घुसून दारुल उलूम देवबंद येथे चहा आणि नाश्ता देखील करू, असेही सूमरो म्हणाले.

## शेपूट वाकडेच ! पाककडून पुन्हा एकदा शस्त्रसंधीचे उल्लंघन

### भारतीय सैन्याने दिले चोख प्रत्युत्तर

**नवी दिल्ली, दि.२७ वृत्तसंस्था**

पाकिस्तानी सैन्याने जम्मू आणि काश्मीरमधील नियंत्रण रेषेवर शनिवारी रात्री पुन्हा एकदा शस्त्रसंधीचे उल्लंघन केले आहे. नियंत्रण रेषेच्या तुतमारी गली आणि रामपूर सेक्टरच्या समोर असलेल्या भारतीय चौक्यांवर पाकिस्तानवर गोळीबार केला. या गोळीबाराला भारतीय सैन्यानेही प्रत्युत्तर दिले. भारतीय सैन्याच्या म्हणण्यानुसार, या घटनेत कोणीही जखमी झाले नाही.

२२ एप्रिल रोजी पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ जणांचा मृत्यू झाला होता, तर अनेक जण जखमी झाले होते, अशा तणावपूर्ण परिस्थितीत ही गोळीबाराची घटना घडली आहे. या हल्ल्यासाठी पाकिस्तान समर्थित दहशतवाद्यांना जबाबदार धरण्यात आले आहे, तर पाकिस्तानने कोणताही सहभाग नाकारला आहे आणि स्वतंत्र चौकशीची



मागणी केली आहे. या हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानविरुद्ध अनेक कठोर निर्णय घेतले आहेत.

पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर भारतीय सैन्य सतत कारवाई करत आहे आणि शोध मोहीम राबवली जात आहे. अलिकडेच कुलगाम जिल्ह्यातील तंगमार्ग भागात सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये चकमक झाली. मात्र, दहशतवादी पळून जाण्यात यशस्वी झाले. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर, अधिकाऱ्यांनी काश्मीरमधील अतिरेकी आणि त्यांच्या सहानुभूतीदारांविरुद्ध मोठ्या प्रमाणात कारवाई सुरू केली आहे, त्यांची घरे पाडली आहेत, लपण्याच्या ठिकाणांवर छापे टाकले आहेत आणि शेकडो दहशतवादी मदतनीसांना चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे.

अधिकाऱ्यांनी पीटीआय वृत्तसंस्थेला सांगितले की, नऊ दहशतवाद्यांचे किंवा त्यांच्या साथीदारांचे घर पाडण्यात आले आहे. दहशतवादी कारवायांमध्ये सहभागी असलेल्या इतरांवरही अशीच कारवाई केली जाईल, असे त्यांनी सांगितले. पहलगामसारखा कोणताही हल्ला उधळून लावण्यासाठी सुरक्षा दल खोऱ्यातील ज्ञात अतिरेकी आणि त्यांच्या समर्थकांचा शोध घेत असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

# पाकच्या 'नो एंट्री'मुळे हवाई प्रवास लांबला

## भारतीय विमान कंपन्यांना मार्गदर्शक सूचना

**नवी दिल्ली , दि.२७ वृत्तसंस्था**

पाकिस्तानने भारतीय विमान कंपन्यांसाठी हवाई हद्द बंद केल्याच्या पार्श्वभूमीवर नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने (डीजीसीए) प्रवाशांना योग्य वाहतूक सेवा आणि विमान प्रवासादरम्यान अल्पोपहार सेवांसह आगमन प्रस्थानाच्या वाढीव कालावधीबाबत अद्ययावत माहिती पुरवण्याबाबत मार्गदर्शक सूचना केल्या.

पहलगाम हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानविरुद्ध कारवाईची तयारी सुरू केली असून सिंधू पाणीवाटप करार रद्द करणे, व्हिसा रद्द करणे यासारख्या उपाययोजनांचा समावेश आहे. तर पाकिस्ताननेही कांगावा करताना भारताविरुद्ध कारवाईचा दर्पोक्ती केली असून भारतीय विमान कंपन्यांसाठी हवाई क्षेत्र बंद केले आहे. यामुळे उत्तर भारतातून होणाऱ्या आंतरराष्ट्रीय उड्डाणांसाठी विमान कंपन्यांच्या वाहतुकीचा कालावधी वाढला आहे. यासंदर्भात 'डीजीसीए'ने मार्गदर्शक सूचना केल्या.



प्रवाशांची गैरसोय होणार नाही आणि त्यांना बदलाची पूर्वसूचना द्यावी, यावर भर देण्यात आला आहे. पाकिस्तानची हवाई हद्द बंद झाल्याने भारतीय विमान कंपन्यांच्या कामकाजावर परिणाम झाला असून आंतरराष्ट्रीय आणि प्रादेशिक उड्डाणांचे मार्ग बदलणे, नियोजित कालावधीच्या तुलनेत ब्लॉक टाइम (गंतव्य स्थानापर्यंतचा कालावधी) वाढण्याची त्याचप्रमाणे आणि विमान सेवा कार्यरत राखण्यासाठी तसेच इंधनाची गरज लक्षात घेऊन मार्गात तांत्रिक थांबे वाढण्याची शक्यता आहे.

भारतीय कंपन्यांसाठी पाकिस्तानचे हवाई क्षेत्र बंद करण्याच्या निर्णयामुळे देशांतर्गत विमान कंपन्यांना आखाती प्रदेश, युरोप, ब्रिटन आणि उत्तर अमेरिकेतील गंतव्यस्थानांसाठी लांब मार्गांचा वापर करावा लागणार आहे. परिणामी पश्चिम आशियातील काही ठिकाणांसाठी उड्डाण कालावधी २० मिनिटांपर्यंत आणि अमेरिकेतील काही ठिकाणी ९० मिनिटांपर्यंत वाढू शकतो, ज्यामुळे इंधनाचा वापर वाढू शकतो आणि विमान भाडे वाढण्याची शक्यता आहे.

## आयपीएल गुणतालिका

| Teams | M | W | L | T | NR | PTS | NRR |
|---|---|---|---|---|---|---|---|
| गुजरात | 8 | 6 | 2 | 0 | 0 | 12 | +1.104 |
| दिल्ली | 8 | 6 | 2 | 0 | 0 | 12 | +0.657 |
| बेंगलुरु | 9 | 6 | 3 | 0 | 0 | 12 | +0.482 |
| पंजाब | 9 | 5 | 3 | 0 | 1 | 11 | +0.177 |
| मुंबई | 9 | 5 | 4 | 0 | 0 | 10 | +0.673 |
| लखनौ | 9 | 5 | 4 | 0 | 0 | 10 | -0.054 |
| कोलकाता | 9 | 3 | 5 | 0 | 1 | 7 | +0.212 |
| हैदराबाद | 9 | 3 | 6 | 0 | 0 | 6 | -1.103 |
| राजस्थान | 9 | 2 | 7 | 0 | 0 | 4 | -0.625 |
| चेन्नई | 9 | 2 | 7 | 0 | 0 | 4 | -1.302 |

# कोलकाता-पंजाब सामन्यात पावसाने मारली बाजी

नवी दिल्ली : दि. २७ प्रतिनिधी




आयपीएल २०२५ मध्ये केकेआर आणि पंजाब किंग्ज यांच्यातील सामना कोणत्याही निकालाशिवाय रद्द करण्यात आला. कोलकाताच्या ईडन गार्डन्सवर खेळल्या गेलेल्या या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना पंजाबने यजमान नाईट कोलकात्यासमोर २०२ धावांचे लक्ष्य ठेवले होते. प्रत्युत्तरात केकेआरचा डाव सुरू होताच पावसाने व्यत्यय आणला आणि सुमारे दीड तास वाट पाहिल्यानंतर अखेर पंचांनी सामना रद्द करण्याचा निर्णय घेतला. ज्यामुळे दोन्ही संघांना प्रत्येकी एक-एक गुण देण्यात आला.

या हंगामात सामना रद्द होण्याची ही पहिलीच वेळ आहे. या निकालामुळे कोलकाताच्या अडचणी वाढल्या आहेत. ईडन गार्डन्स स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात पुन्हा एकदा चाहत्यांची कमतरता भासली आणि स्टेडियम पूर्णपणे भरले नाही. या हंगामातही हे दृश्य आधी दिसले होते. अशा परिस्थितीत, कोलकात्याला चाहत्यांकडून अपेक्षित असलेला पाठिंबा मिळाला नाही. प्रियांश आर्य आणि प्रभसिमरन सिंग या सलामी जोडीने आलेल्या प्रेक्षकांना शांत बसण्यास भाग पाडले. या हंगामात, या दोन युवा सलामीवीरांनी पंजाबला वेगवान सुरुवात दिली होती आणि पुन्हा एकदा तेच घडले.पहिल्याच हंगामात खेळणाऱ्या प्रियांश आर्यने (६९ धावा) पुन्हा एकदा स्फोटक फलंदाजी सुरू केली आणि संघाच्या धावसंख्येला गती दिली. त्याने प्रभसिमरनसोबत पॉवरप्लेमध्ये संघासाठी अर्धशतकी भागीदारी केली. यानंतर वेग थोडा मंदावला पण १० व्या षटकापासून दोघांनीही पुन्हा आक्रमक फलंदाजी करण्यास सुरुवात केली. प्रियांशने फक्त २७ चेंडूत अर्धशतक पूर्ण केले. या हंगामात त्याने दुसऱ्यांदा ५० धावांचा टप्पा ओलांडला. दुसरीकडे, प्रभसिमरन सिंगनेही शानदार अर्धशतक झळकावले. प्रियांश बाद झाला तेव्हा ११.५ षटकांत दोघांमध्ये १२० धावांची भागीदारी झाली. यानंतर प्रभसिमरनने आक्रमण करत ८३ धावांची शानदार खेळी खेळली.

ज्यामुळे पंजाबने २० षटकांत २०१ धावा केल्या.प्रत्युत्तरादाखल, कोलकाताच्या डावातील पहिले षटक नुकतेच संपले होते. तेव्हा अचानक पाऊस सुरू झाला. हा पाऊस एकदा सुरू झाला आणि नंतर थांबला नाही. अखेर रात्री ११ वाजता पंचांनी सामना रद्द करण्याचा निर्णय घेतला. म्हणजेच यामुळे दोन्ही संघांना गुण वाटून घ्यावे लागले

# सूर्यकुमारच्या धावांचा झंझावात

नवी दिल्ली : दि. २७ प्रतिनिधी

इंडियन प्रीमियर लीग २०२५ मध्ये आज वानखेडेवर मुंबई इंडियन्स () लखनौ सुपर जायंट्स () मध्ये सामना झाला. प्रथम फलंदाजी करताना मुंबई इंडियन्सने लखनौसमोर २१५ धावांचे आव्हान दिले आहे. मुंबईकडून सूर्यकुमार यादव आणि रायन रिक्लटन या दोघांनी अर्धशतकीय कामगिरी केली, तर अखेरच्या काही ओव्हर्समध्ये नमन धिरनेही ११ चेंडूत २५ धावांची छोटी पण महत्वाची खेळी केली. आजच्या खेळीच्या जोरावर सूर्यकुमार यादव ऑरेंज कॅपचा मानकरी ठरला आहे.नाणेफेक जिंकून लखनौने प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला होता.

प्रथथम फलंदाजीला उतरलेल्या मुंबई इंडियन्सची अतिशय खराब सुरुवात झाली. तिसऱ्याच षटकात मुंबईचा स्टार रोहित शर्माला लखनौच्या मयंक यादवने माघारी पाठवले. रोहितने ५ चेंडूत दोन षटकारांच्या मदतीने फक्त १२ धावा केल्या. रोहित बाद झाल्यानंतर रायन रिकल्टन आणि विल जॅक्सने दुसऱ्या विकेटसाठी ५५ धावांची भागीदारी केली. या भागीदारीदरम्यान, रिकेलटनने २५ चेंडूत आपले अर्धशतक पूर्ण केले. पण, पुढे फिरकी गोलंदाज दिग्वेश सिंग राठीच्या चेंडूवर रिकल्टन ३२ चेंडूत ५८ धावा करुन बाद झाला.रिकेल्टननंतर सूर्यकुमार आणि विल जॅक्समध्ये २८ धावांची भागीदारी झाली, मात्र लखनौच्या प्रिन्स यादवने विल जॅक्सला २९ धावांवर वाद केले. त्यानंतर तिलक वर्मादेखील फक्त ६ धावांवर फिरकी गोलंदाज रवी बिश्नोईच्या चेंडूवर वाद जाला. कर्णधार हार्दिक पांड्याने निराशा केली. मयंक यादवने अवघ्या ५ धावांवर पांड्याला माघारी पाठवले. एका बाजूने विकेट पडत होत्या, तर दुसऱ्या बाजूने सूर्यकुमार यादवने मुंबईला सावरले. सुर्याने २८ चेंडूत ५४ धावांची दमदार खेळी केली. पुढे आवेश खानच्या चेंडूवर सूर्या झेलबाद झाला. शेवटी नमन धीर (२५*) आणि डेब्यूटेंट कॉर्बिन बॉश (२०) च्या आक्रमक फलंदाजीच्या जोरावर मुंबईने लखनौसमोर २१६ धावांचे आव्हान उभे केले.




# प्रभसिमरन सिंग आयपीएलमध्ये विक्रम करणारा पहिला अनकॅप्ड खेळाडू

नवी दिल्ली : दि. २७ प्रतिनिधी

पंजाब किंग्ज आणि कोलकाता नाईट रायडर्स यांच्यात शनिवारी झालेल्या सामन्यात पंजाब किंग्जचा सलामीवीर प्रभसिमरन सिंगने चांगली फलंदाजी केली. त्याने अवघ्या ४९ चेंडूत ८३ धावांची खेळी केली. या कामगिरीसह प्रभसिमरन सिंगने खास विक्रमाला गवसणी घातली.

केकेआरविरुद्धच्या सामन्यात प्रभसिमरनने अवघ्या ४९ चेंडूत सहा षटकारांच्या मदतीने ८३ धावा केल्या. या कामगिरीसह तो आयपीएलमध्ये पंजाब किंग्जकडून १००० धावांचा टप्पा गाठणारा पहिला अनकॅप्ड खेळाडू ठरला. आयपीएलमध्ये आतापर्यंत कोणत्याही अनकॅप्ड खेळाडूला अशी कामगिरी करता आली नाही. प्रभसिमरन २०१९ पासून आयपीएलमध्ये खेळत आहे. त्याच्या पहिल्या हंगामात त्याची पंजाबसाठी निवड झाली. प्रभसिमरन २०१९ पासून आयपीएलमध्ये खेळत आहे, लिलावात पंजाबच्या संघाने त्याच्यावर बोली लावली. आतापर्यंत प्रभसिमरनने ४३ सामन्यांमध्ये १ हजार ४८ धावा केल्या आहेत, ज्यामध्ये एक शतक आणि ५ अर्धशतकांचा समावेश आहे.




# व्यायामशाळेसाठी आता मिळणार १४ लाख रुपयांचे अनुदान

वर्धा:: दि. २७ प्रतिनिधी



शहरी व ग्रामीण भागात चांगले खेळाडू निर्माण व्हावे, यासाठी राज्य शासनाचे क्रीडा धोरण अंमलात आणले आहे. शहरी व ग्रामीण भागात व्यायाम शाळा निर्माण करण्यासाठी यापूर्वी ७ लाख रूपयांचे अनुदान देण्यात येत होते. परंतु शासनाने आत यात भरघोस अशी वाढ केली असून आता १४ लाख रूपये अनुदान दिल्या जाणार आहे, अशी माहिती जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी दिली आहे.

राज्यात क्रीडा संस्कृतीचे संवर्धन, प्रसार व खेळाडूंना चालना मिळावी तसेच त्यांच्या आरोग्य यासाठी क्रीडा धोरण २०१२ अंमलात आले आहे. यापूर्वी व्यायाम शाळेसाठी दोन लक्ष रूपयांचे अनुदान दिले जात होते. मात्र सन २०१९ मध्ये राज्य शासनाने यात वाढ करून अनुदानाची रक्कम ७ लाख रूपये केली होती. परंतु व्यायाम शाळेत विविध साहित्यांची वाढती मागणी व दरामध्ये वाढ झाल्याने सदर अनुदान कमी पडत होते.तथापि, अनुदानामध्ये वाढ करण्याची मागणी सातत्याने करण्यात येत होती. याची दखल घेऊन राज्य सरकारने अनुदानाची रक्कम ७ लाख रुपयांवरून १४ लाख रूपये केली आहे. तसा शासन आदेश २३ एप्रिल २०२५ रोजी निर्गमित करण्यात आला आहे, अशी माहिती राज्याचे शालेय शिक्षण, गृह ग्रामीण, खनिकर्म, गृहनिर्माण, सहकार राज्यमंत्री व पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी दिली. खेळाडू व व्यायाम शाळांनी या योजनेचा लाभ घेऊन चांगल्या दर्जाच्या व्यायाम शाळा निर्माण कराव्या. तसेच खेळासाठी पोषक असे वातावरण निर्माण करावे, असे आवाहन पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी केले आहे.

## सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देणारी योजना, शेतकऱ्यांना प्रति हेक्टर ३१,५०० रुपयांची मदत!



शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यासाठी भारत सरकारकडून अनेक योजना राबवल्या जात आहेत. त्याचप्रमाणे, सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी भारत सरकारकडून पारंपारिक कृषी विकास योजना () चालवली जात आहे. ही योजना २०१५ मध्ये सुरू करण्यात आली. ही योजना राष्ट्रीय शाश्वत कृषी अभियान () अंतर्गत मृदा आरोग्य व्यवस्थापन () चा भाग आहे. पीकेव्हीवाय योजनेअंतर्गत सेंद्रिय शेती सुरू करण्यासाठी सरकार मदत करेल.सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी, सरकारकडून पारंपारिक कृषी विकास योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना नैसर्गिक संसाधनांचा जास्तीत जास्त वापर करण्यास प्रोत्साहित केले जाते. जेणेकरून शेतकरी रासायनिक खते आणि कीटकनाशकांचा वापर कमी करतील.या योजनेअंतर्गत, २० ते ५० एकर जमिनीवर ५० किंवा त्याहून अधिक शेतकऱ्यांच्या गटाद्वारे सेंद्रिय शेती केली जाते.पीकेव्हीवाय योजनेअंतर्गत, सहभागी हमी प्रणाली (पीजीएस-इंडिया) द्वारे सेंद्रिय प्रमाणन प्रोत्साहन दिले जाते. जे स्थानिक सहभाग तसेच विश्वासावर आधारित आहे.सेंद्रिय शेतीद्वारे मातीची सुपीकता क्षमता वाढवण्यासाठी सरकारकडून प्रयत्न केले जातात. याशिवाय, संसाधनांचे संवर्धन आणि हवामान बदलाचा मातीवर होणारा सकारात्मक परिणाम यावरही लक्ष केंद्रित केले जाते.पारंपारिक कृषी विकास योजनेअंतर्गत, शेतकऱ्यांना सेंद्रिय शेतीसाठी ३ वर्षांसाठी प्रति हेक्टर ३१,००० रुपयांपर्यंतची मदत दिली जाते.या योजनेचा मुख्य उद्देश सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देणे तसेच रसायनमुक्त निरोगी अन्न तयार करणे आहे.

# व्यापार बंदीचा झटका ; पाकिस्तान औषध टंचाईच्या उंबरठ्यावर

नवी दिल्ली : दि. २७ प्रतिनिधी

पहलगाम हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानशी व्यापार थांबवण्याचा निर्णय घेतल्यानंतर पाकिस्तानच्या आरोग्य अधिकाऱ्यांनी औषधांचा पुरवठा सुरळित करण्यासाठी ''आपत्कालीन तयारी'' सुरू केल्याचे वृत्त आहे.भारताने सिंधू जल करार थांबवल्यानंतर प्रतिक्रिया म्हणून पाकिस्तानने गुरुवारी भारतासोबतचा सर्व व्यापार स्थगित केला.

पण त्यामुळे पाकिस्तानने स्वतःच्याच पायावर दगड मारून घेतला आहे. पाकिस्तान औषध पुरवठ्यासाठी भारतावर अवलंबून आहे. आणि आता औषधांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी पाकिस्तानने काही तत्काळ उपाययोजना केल्या असून, तेथील आरोग्य यंत्रणांनी ''आपत्कालीन तयारी'' सुरू केली आहे.ड्रग रेग्युलेटरी अथॉरिटी ऑफ पाकिस्तान () च्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, जरी औषध क्षेत्रावर बंदीचा अधिकृत आदेश आलेला नसला तरी तयारीसाठी योजनेची अंमलबजावणी सुरू झाली आहे.

२०१९ च्या संकटानंतर आम्ही अशा आपत्कालीन परिस्थितींसाठी तयारी सुरू केली होती. आता आम्ही आमच्या औषध गरजा भागवण्यासाठी पर्यायी स्रोतांचा सक्रियपणे शोध घेत आहोत.''सध्या पाकिस्तान औषधांसाठी लागणारा ३० ते ४० टक्के कच्चामाल, ज्यामध्ये (ॲक्टिव्ह फार्मास्युटिकल इंग्रेडियंट्स) आणि इतर प्रगत उपचार उत्पादने यांचा समावेश आहे याबाबत भारतावर अवलंबून आहे.



या पुरवठा साखळीत व्यत्यय आल्याने आता चीन, रशिया आणि युरोपमधील इतर देशांकडून पर्यायी पुरवठ्याचा शोध घेत आहे.या योजनेचा उद्देश म्हणजे जिवावाचवणाऱ्या औषधांचा सातत्यपूर्ण पुरवठा सुनिश्चित करणे ज्यामध्ये हायड्रोफोबिक लसी, साप आणि कुत्र्यांच्या विषाविरोधातील औषधे, कर्करोगावरील उपचार, मोनोक्लोनल अँटीबॉडीज आणि इतर महत्त्वाची जैवतंत्रज्ञान उत्पादने यांचा समावेश आहे. ने तयारी सुरू केली असली तरी औषध उद्योगातील तज्ज्ञ जाणकारांनी मात्र पाकिस्तानने त्वरित पावलं उचलली नाहीत तर मोठ्या संकटाचा इशारा दिला आहे.पाकिस्तान काही तयार औषधंही भारतातून घेतो, विशेषतः कर्करोगावरची औषधं, लसी, विशेषतः रेबीज व सर्पदंशावरील औषधेदेखील पाकिस्तानात भारतातून मागवली जातात, अशी माहिती आहे.

तरीही आरोग्य मंत्रालयाला अद्याप औषध आयातबंदीबाबत कोणताही अधिकृत आदेश प्राप्त झालेला नाही. परिणामी औषध उद्योगाला पुरवठा साखळी खंडित होण्याची भीती वाटते आहे. पाकिस्तान फार्मास्युटिकल मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन () चे अध्यक्ष तौकीर-उल-हक यांच्या माहितीनुसार गुरुवारी औषध उद्योगातील प्रतिनिधींच्या एका शिष्टमंडळाने इस्लामाबाद गाठून व्यापार बंदीपासून औषध क्षेत्राला सूट देण्याची विनंती केली.

''आमची आणि वाणिज्य मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांसोबत चर्चा झाली. आम्ही त्यांना सांगितलं की, भारतातून येणाऱ्या अनेक जिवनावश्यक औषधांचा कच्चा माल केवळ तिथूनच मिळतो, त्यामुळे औषध क्षेत्राला या बंदीतून सूट मिळावी,'' असं ते म्हणाले.शिष्टमंडळाने स्पेशल इन्व्हेस्टमेंट फॅसिलिटेशन कौन्सिल () कडेही याचिकेसाठी धाव घेतली, कारण औषधं आणि आरोग्याशी संबंधित व्यापार बंदीतून वगळणं हे रुग्णांच्या जीवाचे रक्षण करण्यासाठी आवश्यक असल्याचं त्यांनी सांगितलं.

# हिंडाल्कोचा चाकणमध्ये ५०० कोटींच्या गुंतवणुकीतून नवीन प्रकल्प

नवी दिल्ली : दि. २७ प्रतिनिधी

हिंडाल्को इंडस्ट्रीजने शुक्रवारी पुण्यातील चाकण येथे विद्युत वाहनांसाठी (ईव्ही) पूरक घटकांच्या उत्पादन सुविधेचे अनावरण केले, जे हलक्या वजनाच्या, घात-रोधक बॅटरी उपाययोजनांच्या वाढत्या मागणीला पूर्ण करण्यासाठी विकसित केले गेले आहे.सुमारे ५०० कोटी रुपयांच्या भांडवली गुंतवणुकीसह आणि औद्योगिक वसाहतीतील ५ एकर जागेवर पसरलेल्या चाकण येथील नवीन सुविधेमुळे जवळपास १,००० नोकऱ्या निर्माण होणे अपेक्षित आहे आणि आयातीवरील अवलंबित्व कमी करण्याच्या सरकारच्या 'मेक इन इंडिया' दृष्टिकोनाशी ते पूर्णपणे सुसंगत आहे, असे कंपनीने म्हटले आहे. ही नवीन सुविधा म्हणजे देशातील ईव्ही परिसंस्थेचे आयातीवर अवलंबित्व कमी करण्यापासून उच्च-कार्यक्षमता असलेल्या, स्थानिकीकृत अ‍ॅल्युमिनियमवर आधारीत उपायांकडे वळविणारा धोरणात्मक बदल दर्शवते, असे हिंडाल्को इंडस्ट्रीज लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक सतीश पै म्हणाले.कंपनीने महिंद्र अ‍ॅण्ड महिंद्र लिमिटेडच्या विद्युत शक्तीवरील वाहनांना १०,००० अ‍ॅल्युमिनियम बॅटरी एन्क्लोजरचा पुरवठा केल्याची घोषणा देखील या निमित्ताने केली. महिंद्रासोबत सह-विकसित हे बॅटरी एन्क्लोजर पारंपारिक पोलाद धातूवर आधारीत घटकापेक्षा ४० टक्क्यांपर्यंत वजनाने कमी असून, वाहनाच्या चालन श्रेणीत यातून ८-१० टक्के सुधारणा, सुरक्षा वाढण्याबरोबरच, बॅटरी कूलिंगसाठी लक्षणीयरीत्या सुधारित तापमान व्यवस्थापन शक्य बनले आहे.

# रिलायन्स कंपनीचा जगातील टॉप २५ कंपन्यांमध्ये समावेश

नवी दिल्ली : दि. २७ प्रतिनिधी

रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड () ही भारतीय कंपनी निव्वळ संपत्तीच्या आधारे जगातील टॉप २५ सर्वात मूल्यवान कंपन्यांमध्ये सामिल झाली आहे. रिलायन्स कंपनीने आंतरराष्ट्रीय ऊर्जा कंपन्यांना मागे टाकत २१व्या स्थानावर झेप घेतली आहे.

आता रिलायन्सदेखील मायक्रोसॉफ्ट, अल्फाबेट आणि सौदी अरामकोसारख्या दिग्गज कंपन्यांच्या रांगेत उभा राहिला आहे.ब्लूमबर्गच्या डेटानुसार, २५ मध्ये रिलायन्सची निव्वळ संपत्ती ११८ अब्ज डॉलर (सुमारे १० लाख कोटी रूपये) इतकी आहे. -१८ च्या अहवालानुसार,




आंतरराष्ट्रीय कंपन्यांपैकी अलीबाबा, आणि यांच्याच्या अगदी मागे आहे.रिलायन्सचे बाजार भांडवल (मार्केट कॅप) जवळपास १४० अब्ज डॉलरपर्यंत पोहोचली आहे, ज्यामुळे आणि सारख्या ऊर्जा कंपन्यांना रिलायन्सने मागे टाकले आहे. चे बाजारमूल्य आज निफ्टी-५० तील १९ कंपन्यांच्या एकत्रित मूल्याइतके आहे.

किंवा ३५ सार्वजनिक कंपन्या व बँकांच्या एकत्रित मूल्याइतकी रिलायन्सची मार्केट कॅप आहे. २५० इंडेक्समध्ये सूचीबद्ध सर्व कंपन्यांचे मिळून जितके बाजारमुल्य आहे तितकी रिलायन्सची मार्केट कॅप झाली आहे.शुक्रवारी, रिलायन्सच्या संचालक मंडळाने २५,००० कोटी रूपयांचा निधी उभारण्यास मान्यता दिली. हा निधी एका किंवा अधिक टप्प्यांमध्ये बाँड्सद्वारे उभारला जाईल. यासोबतच कंपनीने प्रतिशेअर ५.५ रु. लाभांश देखील घोषित केला आहे. रिलायन्सचा शेअर वर १३००.४० या जवळपास स्थिर दराने बंद झाला. २०२५ मध्ये आतापर्यंत रिलायन्सचा शेअर सुमारे ७ टक्के वाढला असून, याच कालावधीत निफ्टी ५० निर्देशांक फक्त २ टक्क्यांहून कमी वाढला आहे.

गेल्या महिन्यात रिलायन्सच्या शेअर्समध्ये १० टक्के वाढ नोंदवली गेली होती. गेल्या तीन महिन्यांत २४ टक्के वाढ, आणि गेल्या वर्षभरात तब्बल ४० टक्के वाढ झाली आहे.




हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि **मुख्य संपादक तिक्ष्णगत सुगत वाघमारे** यांनी भास्कर प्रिंटिंग प्रेस एन.एच.६ बोरगाव मंजू येथे मुद्रित करून दै.अजिंक्य भारत, सुगत भवन,बारा ज्योतिर्लिंग मंदिराजवळ, रणपिसेनगर, अकोला येथे प्रकाशित केले.* **कार्यकारी संपादक-रूबेन डी.वाळके (*पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची)** आरएनआय-MAHMAR/2009/35271






अजिंक्य भारत

# आपलं अकोला

अकोला, सोमवार, दि. २८ एप्रिल २०२५











अकोला : भजन सम्राट अनुप जलोटा यांचे स्वागत डॉ. सुगत वाघमारे, नितीन खंडेलवाल, दर्शन खंडेलवाल व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. अनुप जलोटा यांच्या भजनाने मंत्रमुग्ध झालेले श्रोतेगण. (छाया. संजय ताथुरकर)

# अनुप जलोटा यांच्या 'ऐसी लागी लगन'ने श्रोते मंत्रमुग्ध

■भजन, गझल व सिने गीतांचा अद्भुत संगम! ■तीक्ष्णगत मल्टीपर्पज वेलफेअर सोसायटी व रॉक अँड रोल इव्हेंटचे आयोजन

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २७ :** काशी बदली, अयोध्या बदली.. अब मथुरा की बारी है... राम खडे है लिये धनुष्य.. अब बन्सी बजने वाली है या मुखड्याने भजन सम्राट, पद्मश्री अनुप जलोटा यांनी संगीतमय सोहळ्याची सुरुवात केली. हे स्वर कानी पडताच श्रोते मंत्रमुक्त झाले होते. भजन सम्राट, पद्मश्री अनुप जलोटा यांचा ''ऐसी लागी लगन'' लाईव्ह कॉन्सर्ट भजन संध्येचा कार्यक्रम रविवारी सायंकाळी राधादेवी गोयनका महिला महाविद्यालयाच्या प्रांगणात भव्य संगीतमय सोहळा पार पडला. या कार्यक्रमाला मान्यवरांसह संगीत प्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रसिद्ध उद्योजक, सामाजिक कार्यकर्ते डॉ. सुगत वाघमारे यांच्या नेतृत्वात गेल्या वीस वर्षांपासून महिला, बालक आणि उद्योग क्षेत्रात यशस्वीपणे कार्यरत असलेल्या तीक्ष्णगत मल्टीपर्पज वेलफेअर सोसायटी व रॉक अँड रोल इव्हेंट यांच्या संयुक्त विद्यमाने या भव्य संगीतमय सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. भजन सम्राट अनूप जलोटा यांचे स्वागत डॉ. सुगत वाघमारे, नितीन खंडेलवाल, दर्शन खंडेलवाल, गोविंद खंडेलवाल, कमल किशोर अग्रवाल, विजय अग्रवाल, दिलीपराज गोयंनका, नरेश अग्रवाल यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक नितीन खंडेलवाल तर गौरव संचालन रवी खंडेलवाल यांनी केले. या कार्यक्रमाला आ. रणधिर सावरकर, आ. साजिद खान पठाण, दैनिक अजिंक्य भारतचे मुख्य संपादक तीक्ष्णगत वाघमारे, डॉ. अनिता खंडेलवाल, डॉ. गोविंद खंडेलवाल, रमाकांत खेतान, मोतीसिंह मोहता, सिद्धार्थ रुहाटीया, एसडीपीओ सतीश कुलकर्णी, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अभय डोंगरे, माजी आ. बबनराव चौधरी यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. अमित चौबे, महेशराव व प्रकाश सुतार यांनी संगीताची साथसंगत केली. कार्यक्रमाचे संचालन नेहा फाफट व जया भारती यांनी केले. या कार्यक्रमाला चित्रपटसृष्टीतील अभिनेत्री लावण्या सिंग यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. कार्यक्रमाचे मुख्य अतिथी डॉ. सुगत वाघमारे यांचा यावेळी मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दर्शन खंडेलवाल, कमलकिशोर अग्रवाल, नितीन खंडेलवाल, सुरेश खंडेलवाल, विजय छावछरिया, कौशल भाटिया, विजय कलंत्री, संदीप अग्रवाल, रवी धानुका, डॉ मनोज अग्रवाल, नरेश अग्रवाल आदींनी परिश्रम घेतले.

**प्रसिद्ध उद्योजक आणि सामाजिक कार्यकर्ते डॉ. सुगत वाघमारे यांच्या कुशल नेतृत्वात उद्योग, महिला आणि बालकांच्या क्षेत्रात तसेच सामाजिक व सांस्कृतिक सेवा कार्यात गेल्या दोन दशकांपासून सक्रीय असणाऱ्या तीक्ष्णगत मल्टीपर्पज वेलफेअर सोसायटी व महानगरातील कलाकार दर्शन खंडेलवाल यांच्या रॉक अँड रोल इव्हेंट यांच्या संयुक्त विद्यमाने भजन सम्राट अनुप जलोटा यांचा ''ऐसी लागी लगन'' लाईव्ह कॉन्सर्ट भजन संध्येचा कार्यक्रम मोठ्या थाटात पार पडला. महानगरातील सेवाभावी मान्यवरांनी या कार्यक्रमाची जोरदार तयारी केली होती. संगीत प्रेमींनी भजनाचा भव्य संगीतमय सोहळा याची देही याची डोळा अनुभवला. अनुप जलोटा यांचे भजनांचे राष्ट्रभरात लाखो चाहते असून जलोटा यांनी भजन, कीर्तन व भक्तीगीतांच्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय विश्वात सन १९८० पासून मोठे नाव कमाविले आहे. अनुप जलोटा हे प्रथमच अकोल्यात येत असल्याने त्यांच्या संगीतमय भजन सोहळ्याचा आनंद घेताना अकोलेकर मंत्रमुग्ध झाले होते. या भव्य संगीतमय सोहळ्यात भजन, गझल व सिने गीतांचा अद्भुत संगम संगीतप्रेमींना अनुभवता आला.**

## अकोल्यातील २२ पाकिस्तानी नागरिकांना देश सोडण्याचे आदेश

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २७ :** काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या अतिरेकी हल्ल्यानंतर केंद्र सरकारने देशभरात सुरक्षा वाढवताना महत्वाचे पाऊल उचलले आहे. देशभरात वास्तव्य करणाऱ्या पाकिस्तानी नागरिकांना भारत सोडण्याचे आदेश केंद्र सरकारने दिले असून, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी सर्व राज्यांना यासंदर्भात स्पष्ट निर्देश दिले आहेत.

या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सरकारनेही कारवाई सुरू केली असून, अकोला जिल्ह्यात सध्या वास्तव्यास असलेल्या २२ पाकिस्तानी नागरिकांना उद्या, २८ एप्रिल रोजी भारत सोडण्याचे आदेश देण्यात आले आहेत. जिल्हा प्रशासनाकडून याबाबत अद्याप अधिकृत माहिती जाहीर करण्यात आलेली नसली तरी, अंतर्गत हालचालींना वेग आला आहे.

दरम्यान, महाराष्ट्रातील एकूण ४८ शहरांमध्ये तब्बल ५,०२३ पाकिस्तानी नागरिक वास्तव्य करत असल्याचा धक्कादायक खुलासा राज्याचे गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी केला आहे. यामध्ये सर्वाधिक २,४५८ पाकिस्तानी नागरिक नागपूर जिल्ह्यात असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. केंद्र सरकारच्या निर्देशानुसार प्रत्येक राज्यात स्थानिक पोलिस व गुप्तचर यंत्रणांनी पाकिस्तानी नागरिकांची यादी तयार केली आहे आणि त्यांच्यावर नजर ठेवली जात आहे. अकोल्यातील २२ पाकिस्तानी नागरिकांनाही तातडीने देश सोडण्याचे आदेश देण्यात आले असून, प्रशासन त्यांच्या हालचालींवर बारीक नजर ठेवून आहे. पहलगाम येथील हल्ल्यानंतर देशातील सुरक्षेच्या दृष्टीने हे पाऊल अत्यंत महत्त्वाचे मानले जात आहे. अकोल्यातील जनतेमध्ये या निर्णयामुळे दिलासा व्यक्त केला जात आहे.

## सरपंचपदाच्या आरक्षणाची ६ मे रोजी सोडत

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी




**अकोला, दि. २७ :** जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका लांबणीवर पडल्या असतानाच जिल्ह्यातील ५३१ ग्रामपंचायतींच्या सरपंच पदाचे आरक्षण निश्चित करण्यात आले आहे. या ग्रामपंचायतींच्या सरपंचांच्या आरक्षणाची सोडत मंगळवार (ता.सहा) मे रोजी सकाळी अकरा वाजता काढण्यात येणार आहे. यासंदर्भात ग्रामविकास विभागाने ४ मार्चला प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेनुसार २०२५ ते २०३० या पाच वर्षासाठी जिल्ह्यातील ५३१ ग्रा.पं.च्या सरपंचपदाचे प्रवर्गनिहाय आरक्षण निश्चित करण्यात आले आहे. जिल्ह्यात २६७ सरपंच पदे महिलांसाठी आरक्षित आहेत. यात सातही तालुक्यातील ग्रामपंचायतीचा समावेश आहे. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग, आणि खुला प्रवर्ग असे प्रवर्गनिहाय या सरपंच पदाचे आरक्षण निश्चित केले आहे.

### जिल्ह्यात आरक्षीत सरपंच पदे

जिल्ह्यात अनुसूचित जाती १२७, महिला ६६, अनुसूचीत जमाती ४६, महिला २४, इमाव ९२, महिला ४८, खुला २६६, महिला १२९ पदे आरक्षीत आहेत.

### या ठिकाणी सोडत

जिल्हा प्रशासनाने आरक्षण सोडतीची ठिकाणं जाहीर करण्यात आली आहेत. यामध्ये तेल्हारा-तहसील कार्यालय नवीन, इमारत अकोट-तहसील कार्यालय सभागृह, पोपटखेड रोड, मूर्तिजापूर- शासकीय धान्य गोदाम क्र. ५ अकोला- तहसील कार्यालय सभागृह, बार्शीटाकळी-नगरपरिषद सभागृह, बाळापूर-नगरपरिषद सभागृह पातूर-तहसील कार्यालय नवीन इमारत या ठिकाणी होणार आहे.

## गाडी ठेवण्याच्या वादातून भांडपुरा परिसरात दगडफेक

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २७ :** जुने शहर पोलीस स्टेशन हद्दीत येणाऱ्या भांडपुरा परिसरात शनिवारी रात्री गाडी ठेवण्याच्या कारणावरून दोन शेजाऱ्यांमध्ये वाद झाला. हा वाद चिघळत गेला आणि पाहता पाहता परिसरात दगडफेकीचा प्रकार घडल्याची माहिती समोर आली आहे.

सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, गाडी पार्किंगच्या किरकोळ कारणावरून दोन गटांमध्ये वाद निर्माण झाला. वादाचे पर्यवसान दगडफेक आणि गोंधळात झाले. विशेष म्हणजे, याच दरम्यान नशेत धुंद असलेला एक युवक हातात उघड्या तलवारीसह परिसरात फिरून दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करत असल्याचे निदर्शनास आले आहे. घटनेची माहिती मिळताच जुने शहर पोलिस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी, तसेच दंगल नियंत्रण पथक (आरसीपी) तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी तातडीने परिस्थितीवर नियंत्रण मिळवले असून, सध्या परिसरात शांतता आहे. यासंदर्भात नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवावा आणि पोलिस प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन अकोला पोलिस विभागाने केले आहे. तसेच, या प्रकरणात गुन्हे नोंदवण्याची प्रक्रिया सुरू असून, दोषींवर कडक कारवाई केली जाणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

## मुख्य अमावस्येनिमित्त अकोल्यात पोलिसांचे कोबींग ऑपरेशन : घातक शस्त्रांसह कारवाई, हजारोंचा दंड वसुल

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २७ :** मुख्य अमावस्येनिमित्त २६ एप्रिल २०२५ रोजी रात्री १० ते दि. २७ एप्रिल सकाळी ५ वाजेपर्यंत अकोला शहर पोलीसांनी व्यापक कोबींग ऑपरेशन राबवत घातक शस्त्रांसह गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींवर धडक कारवाई केली. या मोहीमेअंतर्गत शहरातील आठही पोलीस ठाण्यांनी विविध कलमान्वये एकूण ८ गुन्हे नोंदवून १० घातक शस्त्र जप्त केली आहेत.

याशिवाय, मपोका कलम १४२ अंतर्गत १ गुन्हा, कलम १२२ अंतर्गत ९ गुन्हे, कलम ३३ सह अन्चये अंतर्गत ६ गुन्हे आणि कलम ११०, ११७ अंतर्गत २८ गुन्हे दाखल करण्यात आले. तसेच मोटार वाहन कायद्यान्वये २६ प्रकरणांतून एकूण ११,२०० रुपये दंड वसूल करण्यात आला आहे.कारवाईदरम्यान २७ निगराणी यादीतील बदमाशांची तपासणी करण्यात आली, तसेच ६७ समन्स आणि १३ जामिनपात्र वॉरंटची अंमलबजावणी करण्यात आली. अकोला शहरातील ३० हॉटेल्स व लॉजेसची तपासणी करून संशयित हालचालींवर लक्ष ठेवण्यात आले. ही मोठी मोहीम पोलीस अधीक्षक बच्चन सिंह, अपर पोलीस अधीक्षक अभय डोंगरे व उपविभागीय पोलीस अधिकारी सतीष कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली अकोला शहरातील सर्व प्रभारी अधिकारी व डी.बी. पथकाच्या कर्मचाऱ्यांनी यशस्वीपणे पार पडली.

## हिरकणी कक्ष कुलूपबंदच!सुरू झाल्याचा फक्त देखावा

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २७ :** 'ज्यांच्यासाठी सुविधा उभारल्या, त्यांनाच त्या वापरता येत नाहीत', अशी विसंगती सध्या अकोल्यातील बस आगार क्रमांक १ मध्ये पहायला मिळते आहे. वाढत्या तापमानाने शहर होरपळत असताना, महिलांसाठी उभारलेला हिरकणी कक्ष अजूनही कुलूपबंदच आहे. प्रशासनाने फक्त उद्घाटनाचा देखावा केला, प्रत्यक्षात मात्र महिलांची अवस्था दयनीय झाली आहे.




राज्य परिवहन महामंडळाने महिला प्रवाशांच्या सोयीसाठी हिरकणी कक्ष सुरू करण्याचे आदेश दिले होते. लाखो रुपयांचा निधी खर्च करून बसस्थानकात उभारलेला हा कक्ष सध्या केवळ 'शोभेची वस्तू' बनून राहिला आहे. दुपारी तपमान ४५ अंश सेल्सियसच्या आसपास पोहोचत असताना महिला प्रवासी उन्हात भाजत उभ्या राहतात. कक्षाला कुलूप असल्याने त्यांच्या विश्रांतीचा प्रश्न अधिकच गंभीर झाला आहे. या कक्षाच्या उद्घाटनाच्या वेळी मोठ्या थाटात फोटोसेशन झाले. मात्र त्या फोटोंपलीकडे काहीही घडलेले नाही. स्वच्छतेचा अभाव, पाण्याची सोय नाही, सुरक्षा व्यवस्थाही नाही. परिणामी, प्रवासी महिलांना बस आगाराच्या कोपऱ्यात उन्हाच्या झळा सोसत वेळ काढावा लागत आहे.

या सगळ्या पार्श्वभूमीवर आगार प्रशासनाचा बेजबाबदारपणा चव्हाट्यावर आला आहे. महिलांच्या गरजांशी खेळत फक्त फलक लावण्यापेक्षा, त्यांच्या सोयीसाठी कक्ष प्रत्यक्षात सुरू करणे जास्त महत्त्वाचे आहे, हे तरी आता प्रशासनाला उमगेल का?की हिरकणी कक्षाचे कुलूप वाजवायला महिलांनाच आंदोलन करावे लागेल?

## अकोल्यात भाजपा कार्यकर्त्यांत नवचैतन्य; रवींद्र चव्हाण यांनी केला विजय अग्रवाल यांच्या कार्याचा गौरव

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २७ :** पराभवाने खचून न जाता, नव्या जोमाने जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी सक्रिय असलेल्या विजय अग्रवाल यांच्या कार्यशैलीचे भाजपा प्रदेश कार्यकारी अध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण यांनी अकोल्यात कौतुक केले. पक्ष सर्व कार्यकर्त्यांना सोबत घेऊन समाजहितासाठी काम करत आहे. सत्तेचा उपयोग जनतेच्या समस्यांवर उपाययोजना करण्यासाठी व्हावा, असे आवाहनही चव्हाण यांनी केले.

पश्चिम विदर्भातील भाजपाच्या संघटनात्मक आढावा बैठकीसाठी रवींद्र चव्हाण अकोल्यात राजराजेश्वर नगरीत आले असता, त्यांनी विजय अग्रवाल यांच्या निवासस्थानी कार्यकर्त्यांशी संवाद साधला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जयंत मसणे होते. प्रदेश सरचिटणीस आमदार रणधीर सावरकर, संघटन मंत्री डॉ. उपेंद्र कोटीकर, खासदार अनुप धोत्रे, किशोर



पाटील यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात सुनीता अग्रवाल व विजय अग्रवाल यांनी रवींद्र चव्हाण यांचे औपचारिक स्वागत करून केली.

यावेळी माधव मानकर, गिरीश जोशी, सागर शेगोकार, गोपाल मुळे, संतोष पांडे, अॅड. देव आशिषकाकड, डॉ. अभय जैन, दिलीप मिश्रा, संदीप गावंडे, अमोल गीते, पवन महल्ले, संजय गोटफोडे, अश्विन शुक्ला, प्रदीप झापर्डे, नितीन ताकवाले, राजू नेरकर, मनीष बुंदिले, विवेक भरणे, सिद्धार्थ शर्मा, विलास शेळके, विनोद मापारी, दीप मनवानी, नितीन राऊत, निलेश निनोरे, तुषार भिरड, पप्पू वानखडे, रमेश अल्लकरी, रंजीत खेडकर, गोपाल मुळे, अॅड. नितीन राऊत, शितल जैन, जस्मितसिंग ओबेरॉय, श्याम विंचनकर, हेमंत शर्मा, अमोल मोहकार, विपुल घोगरे, अमित कावरे, गणेश तायडे, किशोर कुचके, रमेश आप्पा खोबरे, जितेंद्र देशमुख, ध्रुव खुणे, केशव हेडा यांच्यासह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

बैठकीत संघटनेच्या बळकटीकरणावर व कार्यकर्त्यांनी थेट जनतेशी संपर्क साधण्यावर भर देण्यात आला. विजय अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली अकोल्यात भारतीय जनता पक्ष नव्या उमेदीने उभारणी करत असून, कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्याचे वातावरण निर्माण झाले आहे.

## मनपाच्या नाकावर टिच्चून पुन्हा थाटले जात आहे अतिक्रमण

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २७ :** मनपा अतिक्रमण निर्मूलन व वाहतूक पोलीस विभागाने संयुक्त कारवाई करून अशोक वाटिका ते सरकारी बगीचा या मार्गावरील अतिक्रमण हटवले होते. आता मात्र, पुन्हा या मार्गावर अतिक्रमण फोफावने सुरू झाले असून खाद्यपदार्थांच्या गाड्या येथे लागणे सुरू झाले आहे. यामुळे वाहतुकीत पुन्हा अडथळा निर्माण होणार असून या मार्गाच्या सौंदर्याची पुन्हा वाट लागणार आहे. तत्कालीन पालकमंत्री बच्चू कडू यांच्या निधीतून या मार्गाचे सुशोभीकरण करण्यात आले होते. काही दिवसांपूर्वी महापालिका अतिक्रमण निर्मूलन व वाहतूक नियंत्रण विभागाने संयुक्त कारवाई करून या मार्गावरील अतिक्रमण निकाली काढले होते. पुन्हा या मार्गावर अतिक्रमण होणार नाही याची काळजी घेतली जात होती.



परंतु शनिवारपासून या मार्गावर हळूहळू खाद्यपदार्थांच्या गाड्या फुटपाथवर लागणे सुरू झाले आहे. जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद तसेच सर्वोच्च रुग्णालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय या मार्गावर असल्याने तत्कालीन पालकमंत्री बच्चू कडू यांनी या मार्गाच्या सुशोभीकरणासाठी निधी दिला होता. या निधीतून या मार्गावर फुटपाथ तयार करण्यात आले. शोभिवंत वृक्ष लावून विविध आकर्षक लाईट व लक्ष वेधून घेणारे देखावे उभारण्यात आले. मात्र, काही दिवसातच अतिक्रमितांनी फुटपाथ वर खाद्यपदार्थांच्या गाड्या लावून सुशोभीकरणाची वाट लावली. महापालिका अतिक्रमण विभागाच्या मेहरबानीने अतिक्रमण चांगलेच फोफावले अन् एका रांगेत विविध खाद्यपदार्थांची दुकाने येथे लागली. यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण झाला. अतिक्रमण हटवण्याच्या एक दिवस पूर्वी शासकीय अधिकाऱ्यांच्या गाडीला वाहतूक कोंडीचा त्रास झाल्याने अधिकाऱ्यांनी तातडीने सदर अतिक्रमण हटवण्याचे आदेश दिले. त्यानंतर तडकाफडकी महापालिका व वाहतूक नियंत्रण शाखेने पुढाकार घेऊन संयुक्तपणे अतिक्रमण हटवण्याची कारवाई केली. आता हा मुद्दा थंड पडला असून अतिक्रमण हो फोफावने सुरू झाले आहे.

# थोडक्यात

## गोठ्याला आग: एका म्हशीसह साहित्य जळाले

**मानोरा :** तालुक्यातील हळदा येथील शेतकरी प्रविण मुंगसाजी गायकवाड ह्यांच्या शेतातील(गट नंबर २००) गोठ्याला दिनांक १९ एप्रिल रोजी आग लागली. त्यात एक म्हैस जळून मृत्युमुखी पडला तर शेतोपयोगी साहित्य ( किंमत २ लक्ष) जळून खाक झाले. या बाबत शेतकरी गायकवाड यांनी असेगाव पोलिस ठाण्यात तक्रार दिली. पोलिसांनी पंचनामा केला आहे.आगीत एक म्हैस,स्प्रिंकलर सेट,पाईप, नौजल, स्प्रे पंप, ताडपत्री आदी शेतीपयोगी साहित्य एकूण किंमत २ लक्ष रुपयाचे नुकसान झाले. संबंधित शेतकरी यांनी नुकसान भरपाई ची मागणी केली आहे.

## पायी चालणाऱ्या युवकास अज्ञात वाहनाची धडक: युवकाचा मृत्यू

**कारंजा लाड :** मूर्तिजापूर रोडवर खेर्डा फाट्याजवळ रोहित खाडे नावाचा युवक पेट्रोल पंप कडे पायदळ जात असताना अज्ञात वाहनाने जबरदस्त धडक दिली. या धडकेत युवक गंभीर रित्या जखमी झाला. त्याच्या पायाला व डोक्याला जबर मार लागला आहे. ही घटना २७ एप्रिल रोजी सकाळी घडली. अपघाताची माहिती श्री गुरु मंदिर रुग्णवाहिकेचे रुग्णसेवक रमेश देशमुख यांनी १०८ लोकेशन कामरगाव चालक नंदकिशोर आरेकर व डॉक्टर राहुल इंगळे यांना देताच ते तात्काळ घटनास्थळी रवाना होऊन जखमी झालेल्या रुग्णाला कारंजा उपजिल्हा रुग्णालय येथे आणले. जखमी रुग्णाचे नाव रोहित विजय खाडे (२२) रा. खेर्डा असे असून हॉस्पिटल येथे वैद्यकीय अधिकाऱ्याने तपासून त्याला मृत घोषित केले. पुढील तपास कारंजा ग्रामीण पोलीस स्टेशन करीत आहे.दिनेश अरुण खाडे(४१) रा. खेर्डा यांच्या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात आरोपी विरुद्ध कारंजा ग्रामीण पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल केला आहे.

## सुट्टीवर आलेल्या सैनिकाचा अपघाती मृत्यू

**शेलुबाजार :** भारतीय सैन्याच्या सीमा सुरक्षा दलात



कार्यरत असलेले शेंदुर्जना मोरे येथील सैनिक वासुदेव संभाजी शेळके (वय ३८) यांचा २५ एप्रिल रोजी झालेल्या कार अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला. त्यांच्या आकस्मिक निधनाने परिसरात शोककळा पसरली आहे. त्यांच्यावर शनिवारी शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. प्राप्त माहितीनुसार वासुदेव शेळके हे काही दिवसांपूर्वी सुट्टीवर आले होते ते सुट्टी संपवून १८ एप्रिल रोजी ड्युटीवर गुवाहाटीला जाणार होते परंतु काही वैयक्तिक कारणामुळे ते २९ एप्रिल रोजी जाणार होते यादरम्यान लग्न समारंभाच्या निमित्ताने बाहेरगावी गेलेल्या शेळके यांचा दि.२५ एप्रिल रोजी मानोरा ते तळप रोडवर कार अपघात झाला. उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. ते सहा महिन्यानंतर सैन्यातून निवृत्त होणार होते. त्यामुळे ड्युटीवर असताना त्यांची ही अखेरची सुट्टी होती. निवृत्त होणार असल्याने त्यांनी कागदपत्राची जुळवाजुळव व पुढील कार्यक्रमाची रूपरेषा ठरवून त्या दृष्टीने तयारी सुद्धा केली होती परंतु घडलेल्या या आकस्मिक अपघाताने त्यांच्या परिवारातील आनंद हिरावला गेला. शनिवारी त्यांच्या निधनाची बातमी माहीत झाल्यानंतर संपूर्ण शेंदुर्जना गावावर शोककळा पसरली होती. त्यांचे पार्थिव दुपारी शेंदुर्जना मोरे येथे आणण्यात आले. यावेळी पुलगाव येथून आलेल्या बटालियन कडून बंदुकीच्या फेऱ्याझाडत शोकाकुल वातावरणात त्यांच्या शनिवारी रात्री उशिरा अंत्यसंस्कार करण्यात आले.

## संत गोरोबा काका पुण्यतिथी निमित्त महाप्रसादाचे आयोजन



**शेलुबाजार :** येथून जवळच असलेले चिखली येथील संत शिरोमणी गोरोबा यांच्या मंदिरात पुण्यतिथी निमित्त सर्व कुंभार समाज तसेच गावातील असंख्य नागरिक महिला पुरुष आणि बालगोपाल यांच्या उपस्थित संत गोरोबा काका यांच्या मूर्तीची दूध अभिषेक सह सामूहिक पूजन करण्यात आले. लगेच उपस्थित भक्तांनी महाप्रसाद घेतला. संत शिरोमणी गोरोबा काका यांच्या पुण्यतिथी निमित्त दरवर्षी प्रमाणे याही वर्षी सुद्धा महापूजा करून सर्व कुंभार समाज व ग्रामस्थ यांच्या उपस्थितीमध्ये संत गोरोबा काका यांच्या मूर्तीचे पूजन केले. त्यांचे विचार आत्मसात करण्याची अत्यंत गरज असून त्यांच्या जीवनावर प्रकाश टाकत त्यांचे कार्य गतिमान होते. उपस्थित भाविकांनी दर्शन घेऊन विनम्र अभिवादन केले.

## निधन वार्ता

### शांताबाई इंगोले



**उंबर्डा बाजार:** येथील नामे शांताबाई उत्तमराव इंगोले यांचे दीर्घ आजाराने वयाच्या १०२ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या मागे तीन भाऊ, पाच बहिणी, नातवंड असा मोठा आप्त परीवार आहे.

# पाणीटंचाईचा कहर: टँकर दरवाढीचा चटका!

## नागरिक त्रस्त: एकबुर्जी प्रकल्पात १४ टक्के पाणीसाठा

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशिम, दि. २७ :** एप्रिल महिन्याच्या सुरुवातीपासूनच राज्यभरात उन्हाच्या झळा प्रचंड वाढल्या. ऐन उन्हाळ्यात अनेक शहरांसह गावांमध्ये पाण्याची कमतरता भासत आहे. त्यामुळे पाण्याच्या टँकरची मागणी मोठ्या प्रमाणात वाढत आहे. टँकरची मागणी वाढत असतानाच खासगी टँकरच्या दरामध्ये अतोनात वाढ झाली आहे. त्यामुळे नागरिकांना वाढत्या उन्हात दरवाढीचा चटका बसत असल्याचे दिसत आहे.



शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या एकबुर्जी धरणात १३ ते १४ टक्केच जलसाठा शिल्लक असून, मोटारपंप गाळात फसणे, जलवाहिनी फुटणे अशा तांत्रिक अडचणींची त्यात भर पडल्याने पाणीपुरवठा ठप्प झाला आहे. दुसरीकडे घरातील बोअरवेल्स, शेतातील विहिरी आणि धरणांची पातळी खोलवर गेली असून, पैसे मोजून देखील टैंकर मिळेनासे झाले आहे. ही स्थिती शहरासह ग्रामीण भागांमध्ये भयावह रूप धारण करू लागली आहे.

जिल्ह्याचे तापमान सध्या ४३ अंश सेल्सिअसवर पोहोचले असताना पाणीटंचाईचा प्रश्नही गंभीर झाला आहे. पाणीपुरवठा करणाऱ्या प्रमुख प्रकल्पांमधील पाणीसाठ्यात झपाट्याने घट झाली आहे. अनेक भागांतील बोअरवेल्स कोरड्या पडल्यामुळे नागरिक विकत मिळणाऱ्या १,००० आणि ५,००० लीटर टँकरच्या आशेवर आहेत. मात्र, मागणी वाढल्याने टैंकर उपलब्ध होणे कठीण झाले आहे. काही ठिकाणी टँकरभर पाणी मिळवण्यासाठी तीन-चार दिवस वाट बघावी लागत असल्याने नागरिक हैराण झाले आहेत.

गेल्या काही वर्षात भूगर्भातील पाण्याची पातळी मोठ्या प्रमाणात घटली आहे. यंदाच्या उन्हाळ्यात अनेक भागातील पारंपरिक विहीरी, हातपंप, कुपनलिका पूर्णतः कोरड्या पडल्या आहेत. त्यामुळे घरगुती वापरासाठी लागणारे पाणीही विकत घेण्याची वेळ नागरिकांवर ओढवली आहे.

जिल्ह्यातील एकबुर्जी, मोतसावंगा, चिरकुटा, अडाण, चाकातिर्थ व आडोळ हे जलप्रकल्प शहर व परिसराला पाणीपुरवठा करतात. मात्र, वाढत्या तापमानामुळे या धरणांमधील पाणीसाठा झपाट्याने कमी झाला आहे. ही बाब भीषण पाणीटंचाई उद्भवण्यास प्रामुख्याने कारणीभूत ठरली आहे.

# अतिक्रमित मोहम्मद शहापूर ते जामणी रस्ता मोकळा करा

## दापुरा येथील शेतकऱ्यांची महसूल प्रशासनाकडे मागणी

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मानोरा, दि. २७ :** तालुक्यातील दापूर या गावातील काही शेतकऱ्यांनी मानोरा तहसील प्रशासनाला लेखी निवेदन दिले. मोहम्मद शहापूर ते जामनी हा रस्ता काही शेतकऱ्यांनी अनेक वर्षांपासून बेकायदेशीररित्या ताब्यात घेऊन अतिक्रमण केले. त्यामुळे दापुरा व इतर गावातील शेतकऱ्यांना आपल्या शेतशिवारात ये जा करण्यासाठी अडचणी येत आहेत. हा अतिक्रमित रस्ता मोकळा करण्याची मागणीचे निवेदन प्रशासनाकडे केले आहे.

शेतकऱ्यांचे खरीप अपूर्व मशागतीचे कामे अंतिम टप्प्यात असून आगामी खरीप हंगामासाठी शेतशिवारात खते, बी - बियाणे, कृषी अवजारे नेण्यासाठी रस्ता उपलब्ध नसल्याने जामणी व धानोरा शिवरात्री शेतकऱ्यांसमोर मोठे बिकट परिस्थिती निर्माण होणार असल्याचे नियोजनामध्ये नमूद करण्यात आले आहे.

मोहम्मद शहापूर ते जामने हा रस्ता मोकळा करण्यात यावा या मागणीचे निवेदन या महिन्याच्या प्रारंभी सदरील शेतकऱ्यांद्वारे तालुका प्रशासनाकडे करण्यात आले होते मात्र ज्याकडे तालुका महसुल प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचा आरोप निवेदन करताना कडून करण्यात आला आहे.

आगामी आठ ते दहा दिवसात मोहम्मद शहापूर ते जामने हा अतिक्रमित रस्ता मोकळा करून न देण्यात आल्यास रस्ता बाधित शेतकऱ्यांकडून लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येण्याचा इशाराही प्रशासनाला देण्यात आला आहे.

# अंगणवाडी मदतनीसाची मुलगी बनली सरकारी अधिकारी!

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**साखरडोह, दि. २७ :** येथील कु. अश्विनी महादेव शेगोकार हिची जलसंधारण अधिकारी स्थापत्य गट ब या पदावर नियुक्ती झाली त्याप्रसंगी तिचा साखरडोह येथील तिच्या राहत्या घरी छोटेखानी सन्मानाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाला तिचे आजोबा पांडुरंग इंगळे, सुखदेव पाचंगे, संतोष वाघमारे, पत्रकार बळवंत भगत, दीपक इंगळे, सतीश इंगळे यांची उपस्थिती होती. आश्विनी शेगोकार हिच्या घरची परिस्थिती बेताचीच. १५ वर्ष पूर्वी वडिलांचे छत्र हरपले. तिची आई बेबीबाई ही अंगणवाडीच्या मदतनिस म्हणून काम पाहते अश्विनीला एक लहान बहिण असून घरच्या या बिकट



परिस्थितीवर तिने मात करून यापूर्वी तिने तंत्र निकेतन मधून शिक्षण घेतले. साखरडोह त्यानंतर बी इ मधे शिक्षण पूर्ण केले. एवढ्यावरच न थांबता सरकारी अधिकारी बनण्याची इच्छा होती. त्याकरिता तिने आठ ते दहा तास अभ्यास केला. घरच्या परिस्थितीवर मात करत तिने आपले लक्ष गाठले. तिने जास्तीत जास्त परिश्रम घेऊन जलसंधारण अधिकारी या पदावर विराजमान होण्याचे स्वप्न तिने सत्यात उतरवले. तिने आपल्या यशाचे श्रेय आई, बहीण,तसेच दोनही मामा मामी यांना दिले आहे.

# ग्रामीण विद्यार्थ्यांना मिळली तांत्रिक शिक्षणाची नवी दिशा

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**रिसोड, दि. २७ :** ग्रामीण भागातील युवकांना कौशल्याधारित शिक्षणाच्या माध्यमातून सक्षम बनवण्याचे कार्य औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आय.टी.आय.) रिसोडचे प्राचार्य जि.पी. मसराम अत्यंत जबाबदारीने आणि प्रेरणादायी पद्धतीने पार पाडत आहेत. त्यांनी पदभार स्वीकारल्यानंतर संस्थेच्या सर्वांगीण विकासासाठी नवनवीन उपक्रम राबवत विद्यार्थ्यांमध्ये तांत्रिक शिक्षणाबद्दल उत्सुकता निर्माण केली आहे.

प्राचार्य मसराम हे स्वतः अत्यंत दूरदृष्टीचे आणि विद्यार्थीहितैषी व्यक्तिमत्त्व आहेत. त्यांनी विद्यार्थ्यांना



केवळ शैक्षणिक ज्ञान देण्यापुरतेच आपले कार्य मर्यादित ठेवले नाही, तर त्यांना रोजगारक्षम बनवण्यासाठी व्यावसायिक आणि प्रत्यक्ष कौशल्य आधारित प्रशिक्षणावर भर दिला आहे. त्यांनी अनेक नवे अभ्यासक्रम सुरु करून उद्योगविश्वात आवश्यक असलेल्या कौशल्यांची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवली. संस्थेत माहिती तंत्रज्ञान, वीजतंत्र, यांत्रिकी, फिटर अशा विविध शाखांमध्ये प्रशिक्षण देण्यात येते.

यासोबतच नवउद्यमींसाठी मार्गदर्शन शिबिरे, करिअर कौन्सेलिंग, रोजगार मेळावे आणि उद्योग संपर्क कार्यक्रमही त्यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आले. त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी मिळाल्या आहेत. मसराम यांनी त्यांच्या सहकाऱ्यांना बरोबर घेऊन संघभावनेने कार्य करत संस्थेचा शैक्षणिक व प्रशासनिक दर्जा उंचावला आहे. शिक्षकांच्या कार्यक्षमतेत वाढ होईल यासाठी त्यांनी नियमित प्रशिक्षण सत्रे आणि कार्यशाळांचे आयोजन केले. त्यांच्या नेतृत्वामुळे आय. टी.आय. रिसोडची ओळख एक आधुनिक, प्रगत आणि गुणवत्तापूर्ण प्रशिक्षण संस्था म्हणून झाली आहे. संस्थेतील शिस्त, स्वच्छता, डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर, तसेच विद्यार्थ्यांच्या समस्या ऐकून त्यावर तत्काळ उपाययोजना करणे या गोष्टींमुळे संस्थेची लोकांमध्ये विश्वासार्हता वाढली आहे. त्यांच्या प्रयत्नांमुळे अनेक विद्यार्थी आज यशस्वीपणे सरकारी तसेच खाजगी क्षेत्रात काम करत आहेत. जि.पी. मसराम यांचे हे योगदान केवळ संस्थेसाठी नव्हे, तर संपूर्ण तालुक्याच्या शैक्षणिक व सामाजिक विकासात मोलाचे ठरत आहे. अशा कार्यकर्तृत्वशील प्राचार्यांचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून, ते इतर शैक्षणिक संस्थांसाठीही प्रेरणास्थान ठरत आहेत.

# पहलगाम हल्ल्याचा बार असोसिएशनकडून निषेध

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मानोरा, दि. २७ :** जम्मू काश्मीर येथील पहलगाम येथे पाकधर्जिन्या अतिरेक्यांनी पर्यटकावर केलेल्या गोळीबार हल्ल्यामध्ये निष्पाप पर्यटकांचा मृत्यू झाला . अतिरेक्यांनी पर्यटकावर केलेल्या भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ दि. २४ एप्रिल रोजी वकील बार असोशिएशन संघटनेच्या वतीने तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात नमूद केले आहे की, जम्मू काश्मीर मधील पहलगाम येथे २२ एप्रिल रोजी झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्यात भारतीय नागरिकांची झालेली हत्या ही अतिशय दुःखद घटना आहे. झालेल्या घटनेचा बदला घेऊन अतिरेकी दहशतवादीना कठोर शिक्षा करावी. निवेदन देतेवेळी विधीज्ञ मंडळाचे अध्यक्ष ॲड जी. आर. राठोड, उपाध्यक्ष ॲड एस एन पखाले, सचिव ॲड इंगोले, सहसचिव ॲड अग्रवाल, सदस्य ॲड आर डी ठाकरे, ॲड एन पि चौधरी, ॲड रेखाते, ॲड चव्हाण, ॲड पटेल, ॲड मनवर, ॲड पाटील, ॲड कांबळे आदी उपस्थित होते.

# शिरपूर मधील वादग्रस्त अतिक्रमणांवर उद्या बुलडोझर

## विकासाच्या दृष्टीने हि कारवाई ठरणार निर्णायक

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**शिरपूर, दि. २७ :** गेल्या अनेक वर्षांपासून शिरपूर गावात चालू असलेल्या अतिक्रमणाच्या प्रश्नावर आता निर्णायक कारवाई होणार आहे. दि. २९ मार्च मंगळवार रोजी अतिक्रमण काढण्याची अंतिम मोहिम राबविण्यात येणार असून, त्यासाठी ग्रामपंचायतीने तयारी पूर्ण केली आहे. या अंतर्गत राजमाता जिजाऊ चौक रिसोड फाटा ते जगदंबा देवी संस्थान पर्यंत रस्त्यालगतच्या सर्व अतिक्रमणावर हातोडा चालविण्यात येणार आहे.

ग्रामपंचायतीच्या वतीने दिलेल्या माहितीनुसार, २८ मार्चपर्यंत सर्व




लघु व्यवसायिकांच्या टपऱ्या, सिमेंट कॉंक्रीटचे पक्के बांधकाम आणि अन्य अतिक्रमण काढून टाकण्यात येणार आहे. यासाठी संबंधितांना नोटीस बजावण्यात आल्या असून, वेळेत अतिक्रमण न काढल्यास थेट कारवाई केली जाईल, असा इशारा ग्रामपंचायतीने दिला आहे.

या कारवाईचा आधार म्हणजे माजी जि. प सदस्य मोहम्मद इमदाद यांनी दाखल केलेली जनहित याचिका. गावातील अतिक्रमण हटवून विकास आराखडा (मास्टर प्लॅन) तयार करण्याची मागणी त्यांनी उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात २०१८ साली केली होती. त्यानंतर न्यायालयाच्या आदेशानुसार काही अतिक्रमण हटविण्यात आले. मात्र, सार्वजनिक बांधकाम विभाग व नगररचना विभाग यांच्यातील समन्वयाअभावी मास्टर प्लॅन तयार होऊ शकला नाही.

या पार्श्वभूमीवर २०२२ साली इमदाद यांनी पुन्हा एकदा नागपूर खंडपीठात नवीन जनहित याचिका दाखल केली. फेब्रुवारी २०२३ रोजी न्यायालयाने यावर अंतरिम आदेश देत दोन्ही विभागांनी एकमेकांवर जबाबदारी झटकून हा मुद्दा दुर्लक्षित केल्याची तीव्र टीका केली. परिणामी जिल्हाधिकाऱ्यांना नोडल अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले.

शेवटी, १४ फेब्रुवारी २०२४ रोजी न्यायालयाने स्पष्ट आदेश देत शिरपूर येथील अतिक्रमण तत्काळ हटविण्याचे आदेश दिले. वाशीम जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी वेळ मागून न्यायालयात अतिक्रमण हटाव मोहिम राबविण्याचे आश्वासन दिले.

आता २९ मार्च रोजी 'गजराज' अर्थात जेसीबी चालणार आणि प्रशासकीय यंत्रणा कारवाईसाठी सज्ज असणार आहेत. या दिवशी नक्की कुणाचे अतिक्रमण हटवले जाणार, याकडे सर्व गावकऱ्यांचे लक्ष लागले आहे. गावाच्या विकासाच्या दृष्टीने ही कारवाई निर्णायक ठरणार आहे.

# कंपोस्ट खड्डा भरा, आपलं गाव स्वच्छ ठेवा अभियान

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशिम, दि. २७ :** जिल्ह्यातील ग्रामीण भागात स्वच्छतेची चळवळ अधिक प्रभावी करण्यासाठी जिल्हा परिषद कटीबध्द आहे. येत्या १ मे २०२५ पासून जिल्ह्यात कंपोस्ट खड्डा भरू, आपलं गाव स्वच्छ ठेवू हे विशेष स्वच्छता अभियान राबविण्यात येणार आहे. या अभियानात ओल्या कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करून त्यापासून खत बनविण्यावर भर दिला जाणार आहे. जि. प. चे मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे यांनी नागरिकांना या अभियानात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा २अंतर्गत जि. प. चे मुख्य कार्यकारी अधिकारी वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखली घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाचे काम जिल्ह्यात सुरू आहे. जिल्ह्यातील



६८० पैकी ४४६ गावात घनकचरा व सांडपाणी व्यस्थापनाची कामे पूर्ण झाली आहेत. सांडपाणी व्यवस्थापना अंतर्गत सार्वजनिक शोषखड्डे, रूट झोन, रीड बेड, टायगर बायो फिल्टर, इत्यादी तर घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत गांडूळ खत प्रकल्प, प्लास्टिक कचरा संकलन केंद्र इत्यादी उपाययोजना केल्या जात आहेत. पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने दिलेल्या निर्देशानुसार, गावात तयार केलेल्या नाडेपच्या माध्यमातून ओल्या कचऱ्याचे व्यवस्थापन करून खतनिर्मितीवर लक्ष केंद्रित केले जाणार आहे. हे अभियान १ मे ते ३० सप्टेंबर या कालावधीत राबवण्यात येणार आहे. अभियानाच्या पूर्वतयारी साठी दिनांक २७ ते ३० एप्रिल दरम्यान घरोघरी कचऱ्याचे वर्गीकरण केले जाणार आहे. घरगुती व सार्वजनिकस्तरावर वर्गीकरण केलेल्या ओल्या कचऱ्याचे २७ ते ३० एप्रिल या कालावधीमध्ये संकलन करण्यात येईल. २९ ते ३० एप्रिल दरम्यान या मोहिमेची विविध माध्यमांचा वापर करीत प्रचार प्रसिध्दी करण्यात येईल. तसेच यशोगाथा प्रकाशित करून इतर गावांना प्रेरित करण्यात येणार आहे. अभियानाकरीता स्थानिक लोकप्रतिनिधी, संस्था, बचतगट महिला व शेतकरी गटांचा सहभाग घेऊन गावपातळीवर श्रमदान उपक्रम राबवून जनसहभाग घेतला जाणार आहे. महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून ०१ मे रोजी या मोहिमेचा शुभारंभ होईल. यावेळी स्थानिकस्तरावर लोकप्रतिनिधी, अधिकारी, कर्मचारी यांची उपस्थिती राहिल. १ते १० मे या कालावधीत गावातून संकलीत केलेला ओला कचरा नाडेपमध्ये कचरा भरण्यात येईल. त्यापासून खत निर्मितीनंतर

> कंपोस्ट खड्डा भरू आपलं गाव स्वच्छ ठेवू!'' या अभियानात जिल्ह्यातील प्रत्येक गावाने सक्रिय सहभाग घ्यावा. प्रत्येक कुटुंबाने घरामध्ये ओला व सुका कचरा असे वर्गीकरण करावे. ओल्या कचऱ्यापासून कंपोस्ट खत किंवा गांडूळ खत निर्मिती करावी तर प्लास्टिक किंवा इतर न कुजणारा सुका कचरा पुनर्प्रक्रियेसाठी देण्यात यावा. आपले गाव स्वच्छ व सुंदर बनविण्यासाठी प्रत्येक ग्रामस्थाने योगदान द्यावे.
>
> **-श्रीराम कुळकर्णी,**
> उप मुख्य कार्यकारी अधिकारी,
> जि. प. वाशिम

१५ सप्टेंबर २०२५ पर्यंत नाडेप तयार झालेला खत उपसण्याची प्रक्रिया होईल. तालुक्याच्या सर्व गटविकास अधिकारी यांनी पंचायत स्तरावर ग्राम पंचायत अधिकारी यांची कार्यशाळा, बैठक आयोजित करावी. ग्रामपंचायत अधिकारी यांनी बैठक घेऊन सर्व ग्रामस्थांना माहिती द्यावी, तसेच गावात दवंडी द्यावी. ग्रामपंचायत कार्यालय, शाळा, अंगणवाडी, सर्व कार्यालयाच्या सूचना फलकावर माहिती प्रसारित करण्यात याव्यात अशा सूचना सर्व ग्रामपंचायतीना देण्यात आल्या आहेत. ''कंपोस्ट खड्डा भरू, आपलं गाव स्वच्छ ठेवू !'' या मोहिमेची पडताळणी तालुका स्तरावरून गटविकास अधिकरी, विस्तार अधिकारी, जिल्हा सल्लागार, तालुकास्तरावरील समन्वयक व गट समन्वयक ओल्या कऱ्यापासून भरलेल्या नाडेप खड्ड्याची पडताळणी करतील. अशी माहिती पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्रीराम कुळकर्णी यांनी दिली.

# थोडक्यात

## कवठा बु येथे संत गोरोबा काका पुण्यतिथी साजरी



**कवठा बु. :** अकोट तालुक्यातील कवठा बु.येथे शनिवार दि.२६ एप्रिल रोजी कुंभार समाजाच्या वतीने संत शिरोमणी गोरोबा काका कुंभार पुण्यतिथीचे औचित्य साधुन कार्यक्रमाचे आयोजन करण्यातआले होते. यावेळी संत गोरोबा काका यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहारअर्पण करण्यात आला. उपस्थित कुंभार समाज बांधवांच्या वतीने प्रतिमेचे पुजन करून भक्तीभावाने विनम्र अभिवादन करण्यातआले . यावेळी शंकरराव साविकार, एकनाथ साविकार,पत्रकार राजेश साविकार,लक्ष्मणराव कळसकर (सावरा) शालीकराम तळोकार (सोनाळा ) श्रेयस साविकार,गजानन चांदुरकर कू. मोनाली राजेश साविकार,कू.कोमल गोपाल साविकार,कू.अंजली खाडे तसेच समस्त कुंभार समाज यावेळी प्रामुख्याने उपस्थित होता. कार्यक्रमाचे आयोजन राजेश साविकार यांनी केले होते.

## जिद्द व चिकाटीने आशिषने केली परिस्थितीवर मात



**अकोलखेड :** आशिष ची नुकतीच लिपिक पदी निवड झाल्या बद्दल आकोलखेड वासियानी त्याच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला अकोलखेड चे माजी सरपंच श्री केशव लांडे व त्यांचे सहकारी बाळासाहेब गुजर,शिवदास मुरहेकर,बाबाराव ताडे यांनी आशिष यांचा त्याचे घरी जावून आई वडिलांसह शाल ,श्रीफळ,पेढा भरून हार घालून सत्कार केला. आशिष ने आपल्या नाजूक परिस्तिथी वर मात करून हे यश मिळविले त्यामुळे पूर्ण गावामध्ये आनंदाचे वातावरण असून सर्व स्तरातून आशिष चे कौतुक करण्यात येत आहे. आशिष ची निवड झाल्याची बातमी समजताच मित्र मंडळी कडून फटाके फोडून जल्लोष करण्यात आला.

## विधान परिषद सभापती राम शिंदे यांचे मूर्तीजापुर नगरीत स्वागत



**मूर्तिजापूर :** विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांचे मूर्तिजापूर भाजपच्या वतीने जंगी स्वागत करण्यात आले आहे. जिल्ह्यातील मुर्तिजापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार हरिष पिंपळे यांच्या संपर्क कार्यालयाला सभापती राम शिंदे यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी भूषण कोकाटे, रितेश सबाजकर, नंदकिशोर राऊत, हर्षद साबडे, कमलाकर गावंडे, सतीश शर्मा, पप्पू मुळे, दिग्विजय गाडेकर, बबलू ढोक, नितीन भटकर, अमोल, अंकुश अग्रवाल, सुनील लचुवानी, श्री. आखरे, हेमंत किशोर ठाकूर यांच्यासह भाजप मुर्तिजापूर शहर व ग्रामीण कार्यकारिणीच्या वतीने सभापती राम शिंदे यांचा सत्कार करण्यात आला करण्यात. यावेळी भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी संवाद साधून मुर्तिजापूर विधानसभा मतदारसंघातील विविध सामाजिक विषयांवर चर्चा करण्यात आली.

## निधन वार्ता

### शिलाबाई इंगळे



**अंदुरा :** अंदुरा येथील भारतीय बौद्ध महासभा बाळापुर तालुका अध्यक्ष राहुल इंगळे यांच्या मातोश्री शिलाबाई सुधाकर इंगळे यांचे दीर्घ आजाराने दिनांक २५ एप्रिल ला अंदुरा येथे निधन झाले त्यांच्यामागे चार मुले सुना नातवंड असा बराच मोठा आप्तपरिवार आहे.

### पद्मा भारसाकडे



**जानोरी मेळ :** सागद येथील वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते शैलेश मुकिंदा भारसाकडे यांच्या मातोश्री पद्मा मुकिंदा भारसाकडे यांचे दुर्धर आजाराने दिनांक २६ एप्रिल २०२५ ला निधन झाले त्यांच्यामागे पत्नी मुलगा सून पती असा बराच मोठा आप्तपरिवार आहे.

# शासकीय गोदामात सर्वत्र घाणीचे साम्राज्य

## पडक्या भिंती आणि चौकीदाराविना सुरक्षा वाऱ्यावर





### स्वच्छतेसाठी पत्र दिले

मी शासकीय धान्य गोदाम अकोटला नव्याने रुजू झालो आहे. गोदाम परिसरातील अस्वच्छता पाहता संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांना स्वच्छता व इतर समस्यासंदर्भात पत्र दिले आहे. वरिष्ठांच्या आदेशानुसार किंवा सूचनेनुसार समस्यांचे निराकरण केल्या जाईल.

**- अतुल गोहाड,**
व्यवस्थापक, शासकीय गोदाम अकोट

। विशाल आग्रे ।

**अकोट, दि. २७ :** शहरातील खानापूर वेस भागामध्ये असलेल्या शासकीय धान्य गोदामाची दयनीय अवस्था झाल्याचे चित्र दिसून येत आहे. अकोट तालुक्यातील सव्वाशेच्या वर गावांमध्ये येथूनच धान्य वितरित केल्या जाते. मात्र धान्य गोदाम परिसरामध्ये घाणीचे साम्राज्य सर्वत्र पसरलेले आहे. आवार भिंती पडल्या आहेत. गोदामाला मुख्य गेट सुद्धा उपलब्ध नाही. या ठिकाणावरून धान्य चोरीच्या घटना सर्रास घडत आहेत. गोदामातील कर्मचारी, हमाल कामगारांना पिण्याच्या पाण्याचे पाणी, अग्ननीरोधक यंत्र, शौचालय अशा मुलभूत सुविधा अकोट तहसीलच्या पुरवठा विभागाने उपलब्ध केल्या नसल्याने शासकीय गोदाम अनेक समस्यांनी ग्रासले असून या सर्व प्रकाराकडे संबंधित अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होताना दिसत आहे.

गोदाम परिसरामध्ये चौकीदार सुद्धा नसल्याने चोरीच्या घटना होतील असे नाकारता येत नाही.

गोदामातील कर्मचारी तसेच हमाल कामगारांना शौचालय, पिण्याचे पाणी,कार्यालय, गोदाम परिसरातील अस्वच्छता घाणीचे साम्राज्य पसरल्यामुळे रोगराईचे थैमान पसरवले जाऊ शकते. या प्रकारामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात येण्याची दाट चिन्हे निर्माण झाली आहेत. अकोट तहसीलच्या पुरवठा विभागाने नागरिकांच्या आरोग्याशी खेळण्याचा डाव मांडला आहे. या सर्व प्रकाराबाबत माननीय जिल्हाधिकारी अकोला तसेच जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी विशेष लक्ष देण्याची गरज आहे. नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कायदेशीर कारवाई व्हावी असे नागरिकांच्या वतीने बोलल्या जात आहे.

गोदाम परिसरात घाणीचे साम्राज्य

तालुक्यातील गावांमध्ये शासकीय धान्य गोदाम मधून धान्य वितरण केल्या जाते. नागरिकांच्या जीवाशी तहसील प्रशासन खेळत आहे. गोदाम परिसरामध्ये सर्वत्र घाणीचे साम्राज्य पसरलेले आहे. दयनीय अवस्था असलेल्या शासकीय गोदामामध्ये संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष लक्ष देऊन समस्यांच्या विळख्यात अडकलेल्या गोडाऊनला व नागरिकांच्या आरोग्याला जपावे. अकोला जिल्ह्यामध्ये द्वारपोच धान्य वितरण करण्यासाठी कंत्राटदाराला कंत्राट दिले आहे. मात्र, सदर कंत्राटदार स्व मालकीची खासगी वाहने थेट द्वारपोच न नेता शासकीय धान्य गोदामाचा वापर केल्या जात आहे. ही अतिशय गंभीर बाब आहे. या सर्व प्रकारावर पुरवठा विभाग मात्र, चुप्पी साधून कां बसला आहे. या कंत्राटदाराची चौकशी करून कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

## अकोट येथे मारहाणप्रकरणी नऊ जणांविरूद्ध गुन्हा दाखल

### एकाचा हात फॅक्चर; एकाविरूध्द अॅट्रॉसिटी

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोट, दि. २७ :** शहरातील हिवरखेड मार्गावरील बजाज फायनान्स कार्यालयाच्या बाजूला एकमेकांना मारहाण झाल्याची घटना २६ एप्रिलच्या दुपारी २ वाजेच्या सुमारास घडली. या घटनेत एकाचा हात फॅक्चर झाला असून परस्परविरोधी तक्रारीवरून शहर पोलिसांनी नऊ जणांविरूद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. यापैकी एका विरूध्द जातीवाचक शिवीगाळ केल्याप्रकरणी अॅट्रासिटीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सुनील मनोहर वानखडे रा. जेतवन नगर याने दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, मी वैष्णवी टी सेंटर येथे चहा पित असताना तेथे रविराज मोरे आला व त्याने मला जातीवाचक शिवीगाळ केली. ही घटना मी माझे मित्र राजेश सोळंके यांना मोबाइलवरून सांगितली. त्यानंतर मी बजाज फायनान्स समोर गेलो असता मला राजेश सोळंके यांनी बोलाविले. मी त्यांच्याकडे जात असताना रविराज मोरे हा सुध्दा माझ्या मागे मोटारसायकलने आला. त्याठिकाणी राजेश सोळंके व मनीष कराळे हजर असताना त्यावेळी सुध्दा मोरे याने यांच्यासमोर मला जातीवाचक शिवीगाळ करून मला मारहाण केली. सोळंके व कराळे भांडण सोडण्याकरिता आले असता रविराज मोरे याने राजेश सोळंके यांच्या हातावर पाइप मारून फॅक्चर केले तर मनीष कराळे यांनाही लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. या तक्रारीवरून पोलिसांनी रविराज युवराज मोरे रा. गीतानगर अकोट याच्या विरूध्द अॅट्रासिटीसह विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला. तर पत्रकार रविराज मोरे यांनी दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, मी वैष्णवी टी सेंटर येथे चहा पित असताना त्याठिकाणी राजेश सोळंके, महादेव भगत यांनी म्हटले की, तू पेपरमध्ये वरलीच्या बातम्या का छापतो, यापुढे छापू नको. वाद वाढू नये म्हणून एका अनोळखी इसमाने मला त्याच्या मोटारसायकलवर घेऊन बजाज फायनान्स कार्यालयासमोर सोडले. यावेळी कॉम्प्युटर सेंटरमध्ये मेल करण्यासाठी गेलो असता तेथे मनीष कराळे, राजेश सोळंके, महादेव भगत, सागर कराळे व आणखी काही अनोळखी इसम आले. मनीष कराळे व राजेश सोळंके यांनी शिवीगाळ केली आणि या दोघांनी माझ्या डोक्यावर खुर्चा मारल्या. तू जर यापुढे वरलीच्या बातम्या छापल्या तर तुला जीवे मारून टाकू, अशी धमकी दिली. या तक्रारीवरून पोलिसांनी ८ जणांविरूध्द विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

## पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ पातुरमध्ये कँडल मार्च व श्रद्धांजली कार्यक्रम

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी




**पातुर, दि. २७ :** काश्मीरमधील पहलगाम येथील बैसरण व्हॅलीमध्ये नुकत्याच घडलेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ जणांचा मृत्यू झाला असून २० पेक्षा अधिक जण जखमी झाले आहेत. मृतांमध्ये २४ भारतीय नागरिक, एक नेपाळी पर्यटक आणि जम्मू-काश्मीरमधील एक स्थानिक रहिवासी यांचा समावेश आहे. महाराष्ट्रातील सहा नागरिकांसह गुजरात, कर्नाटक, पश्चिम बंगाल, उत्तराखंड, उत्तर प्रदेश, बिहार, पंजाब, केरळ, ओडिशा, आंध्र प्रदेश, मध्य प्रदेश आणि अरुणाचल प्रदेश या राज्यांतील नागरिकही या भीषण हल्ल्यात बळी पडले आहेत.

या भ्याड दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ व हुतात्म्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी पातुर शहरात सर्वधर्मीय, सर्वपक्षीय नेते, कार्यकर्ते आणि सामाजिक कार्यकर्त्यांच्या वतीने एकात्मतेचे प्रतीक म्हणून भव्य कँडल मार्च काढण्यात आला. कँडल मार्चची सुरुवात संभाजी चौकातून झाली. त्यानंतर मिलिंद चौक व पोलिस स्टेशन चौक मार्गे हुतात्मा स्मारकावर पोहोचून पुष्पांजली अर्पण करण्यात आली. पोलिस स्टेशनसमोर उपस्थितांनी काही क्षण मौन पाळून दहशतवादी हल्ल्यात हुतात्मा झालेल्या नागरिकांना आदरांजली वाहिली. या कँडल मार्चमध्ये विविध सामाजिक संस्था, सर्वधर्मीय समाजबांधव, सर्वपक्षीय नेते व कार्यकर्ते, नागरिक, युवक तसेच विविध संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. भारत माता की जय, हुतात्म्यांना सलाम, आतंकवादाचा निषेध असो अशा घोषणा देत परिसर भारावून गेला होता. कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी उपस्थितांनी दहशतवादविरोधी लढ्याला पाठिंबा देण्याची आणि राष्ट्रीय एकतेसाठी सदैव कटिबद्ध राहण्याची प्रतिज्ञा घेतली. नागरिकांनी हल्ल्यात बळी पडलेल्यांच्या कुटुंबीयांसोबत सहानुभूती व्यक्त केली आणि अशा हल्ल्यांचा कठोर शब्दांत निषेध केला.


## सागद येथील रस्ता मोकळा करा: ग्रामस्थांची मागणी

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**जानोरी मेळ, दि. २७ :** येथून पाच किलोमीटरवर अंतरावर असलेले सागद हे गाव खूप मोठे असून या गावांमधून हाता ते सागद सागद ते नागद हा रस्ता शेतीमधून चालू असून गावामधून सदर शेत रस्ता बंद करण्यात आला आहे व त्यावर काही नागरिकांनी अतिक्रमण केलेले आहे तरी त्या रस्त्याची विशेष रेकॉर्ड चेक करून तो रस्ता मोकळा करून देण्याबाबत सागद येथील नागरिक माननीय तहसीलदार साहेब यांच्याकडे दिनांक ८ ऑगस्ट २०२४ रोजी याबाबत अर्ज दिलेला आहे त्या अर्जावर माननीय तहसीलदार साहेब यांनी संबंधित ग्रामपंचायतीला सदर रस्ता मोकळा करून देणेबाबत आदेश सुद्धा दिला आहे परंतु संबंधित ग्रामपंचायत कार्यालयाने अद्याप पर्यंत सदर रस्ता मोकळा करून दिलेला नाही .आम्ही त्यांना विचारले असता त्यांनी सांगितले त्यांनी सदर अहवाल माननीय तहसीलदार साहेब बाळापुर यांच्याकडे पाठवलाय आला. परंतु त्याची प्रत आम्हाला दिलेली नाही असे ग्रामपंचायतीचे म्हणणे आहे.

## श्री संत भास्कर महाराज बालसंस्कार शिबिर १ मे पासून

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोट, दि. २७ :** श्री संत वासुदेव महाराज यांचे चरणस्पर्शाने पावन झालेल्या व प्रेरणेने स्थापित श्री संत वासुदेव महाराज वैष्णव ज्ञान मंदिर वडाळी (सटवाई) तालुका अकोट येथे यावर्षीही १ मे ते २५ मे दरम्यान श्री संत भास्कर महाराज बालसुसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. आद्यजनक श्री संत वासुदेव महाराज असून नवीन पिढीला सुसंस्कारित करण्याकरिता श्री संत भास्कर महाराज संस्थान आडगाव (बु) येथे पहिली मुहूर्तमेढ रोवली असून त्याच उज्वल अशा परंपरेनुसार महाराजांचे आज्ञेने श्री संत भास्कर महाराज संस्थानचे विलीनीकरणानंतरही शिबिराची अखंडता तेवत ठेवण्याकरिता श्री संत भास्कर महाराज ट्रस्ट, र.नं.ई ५२९ श्री क्षेत्र अकोली (जहाँगीर) द्वारा आयोजित हे शिबिर या वर्षी ८७ व्या वर्षात पदार्पण करीत असून महाराजांचे कार्यात सतत सेवेत असणारे संस्थापक अध्यक्ष ह.भ.प. अशोक महाराज जायले यांचे मार्गदर्शनाखाली संपन्न होणार आहे. या शिबिरामध्ये शेकडो विद्यार्थी विद्यार्थिनी सहभागी होत आहेत . शिबिरामध्ये प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्यांना विनामूल्य गुरुकुल पद्धतीने निवासी स्वरूपाचे शिक्षण दिल्या जाते त्यामध्ये श्रीमद्भगवद्गीता व श्रीमद् भागवत निवडक श्लोक, गोपीगीत वगैरे संस्कृत सुभाषिते तथा अष्टके, ग्रंथराज ज्ञानेश्वरी मधील निवडक ओव्या, गाथामधील निवडक अभंग, हरिपाठ, पंचांगाची तोंडओळख, सुलभ घरगुती औषधोपचार, करपल्लवी, वक्तृत्वकला, संत तथा थोरांची चरित्रे, प्रबोधनात्मक विषय, गायन, वादन, पावल्या, भारुड, योगासने, श्रमदान वगैरे विषय पात्रतेनुसार शिकविल्या जातील शिबिरामध्ये सर्व ह.भ.प.मोहन महाराज रेळे, अवधूत महाराज थोरवे, मंगेश महाराज ठाकरे,. सुदाम महाराज आगरकर,.कृणाल महाराज वाघमारे, नागपूर, सौरभ महाराज बोर्डे, आळंदी, .सुरेश महाराज मानकर, प्रफुल महाराज वानखडे,.शिवा महाराज रेचे, हरिभाऊ महाराज साबळे,.योगेश महाराज नागरगोजे,शिवा महाराज बायस्कार, प्रमोद महाराज वानखडे, प्रसाद महाराज रेळे, पप्पू महाराज ढोक,धनंजय महाराज जायले, मुरलीधर महाराज राऊत . गोपाल महाराज फोकमारे, व इतर महाराज मंडळी शिक्षक म्हणून लाभणार आहेत. संस्कार प्रेमी पालकांनी उपरोक्त शिबिरामध्ये आपल्या मुला मुलींना पाठवून भारतीय संस्कृती रक्षणाकरिता तन-मन-धनाने सहकार्य करून महाराजांचे या कार्याला सहकार्य करावे. असे आवाहन संस्थेचे विश्वस्त मंडळींनी केले असल्याचे संस्थेचे विश्वस्त ह.भ.प. प्रमोद पाटील रेळे यांनी कळविले आहे.

## कुरणखेड येथे तीन महिन्यांपासून चोरींचे सत्र सुरुच

### चोरांच्या मुसक्या आवळण्यात बोरगाव मंजू पोलिसांना अपयश

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी




> प्रत्येक चोरीच्या घटने मधिल सीसीटीव्ही फुटेज मध्ये चोर कैद झाले आहे तरीसुद्धा बोरगाव मंजू पोलिसांना यामध्ये अपयश आहे तीन महिन्यात एवढ्या चोरीच्या घटना होऊन सुद्धा चोरीचा साधा शंसंशयित म्हणून सुद्धा पुरावा यांच्याकडे न लागल्यामुळे नागरिकांमध्ये रोष व्यक्त केला जात आहे..बोरगाव मंजू परिसरात चोरीच्या घटनांमध्ये वाढ होत असताना या परिसरातील नागरिक भयभीत झाली आहे. येथील पोलीस निरीक्षक हे गेल्या काही दिवसांपासून रजेवर गेल्यामुळे परिसरातील नागरिकांच्या मनात रोश व्यक्त होत आहे.या संदर्भात तपास सुरू आहे संबंधित अधिकारी अमलदार यांच्यासोबत यासंदर्भात बोलणं करून घेऊ
>
> **-अमोल मित्तल,**
> प्रभारी उपविभागीय पोलीस अधिकारी मुर्तीजापुर

**कुरणखेड, दि. २७ :** परिसरात गेल्या तीन महिन्यांपासून चोरीच्या घटनांचे सत्र सुरूच आहे. मात्र बोरगाव मंजू पोलीसांना चोरांच्या मुसक्या आवळण्यात अपयश येत आहे. काल मध्यरात्री चोरट्यानी आपला मोर्चा आता श्री चंडिका देवी संस्थान कडे वळविलेला दिसला. चंडिका देवी संस्थानमध्येही चोरी झाल्यामुळे पोलिसांसह नागरिकांमध्ये खळबळ उडाली आहे.

बोरगाव मंजू पोलीस स्टेशनच्या हद्दीत हाकेच्या अंतरावर असलेल्या महामार्गावरील कुरणखेड या गावात गेल्या तीन महिन्यापासून चोरीचे सत्र वाढले आहे. यामध्ये पोलिसांना चोरांना शोधण्यासाठी आतापर्यन्त अपयश येत आहे. कुरणखेड येथे २५ डिसेंबरला मध्यरात्री तीन ठिकाणी चोरी झाली होती, त्याचबरोबर तिन एप्रिलला सुद्धा मध्यरात्री सात ठिकाणी चोरी झाली होती, महामार्गावरील एका वाहन चालकाला अडवून पैसे लुटून त्याला मारहाण सुद्धा झाल्याचा प्रकार समोर आला होता मात्र एवढ्या गंभीर घटना घडवून सुद्धा पोलीस अपयशी ठरत आहेत.प्रत्येक घटनेचा व्हिडिओ सीसीटीव्हीमध्ये कैद झालेला आहे मात्र याकडे बोरगाव मंजू पोलिसांचे अक्षम्यदुर्लक्ष पाहायला मिळत आहे. एवढ्या चोरीच्या घटना घडल्या असूनही पोलिसांनी गस्त वाढवली नाही..तर पोलीस निरीक्षक यांनी गावात चक्कर ही मारली नाही.काल मध्यरात्री कुरणखेड येथील जागृत देवस्थान असलेल्या श्री चंडिका देवी संस्थान मध्येही दीड ते साडेतीनच्या दरम्यान तीन अज्ञात चोरांनी मंदिराच्या मुख्य गाभाऱ्यातील व गाभाऱ्यासमोरील दोन भल्या मोठ्या लोखंडी पेट्या मंदिरामधून उचलून मंदिराच्या खालील भोजन हॉलमध्ये नेऊन फोडून त्यामधील अंदाजे ७० ते ८० हजार रोख रक्कम चोरांनी लंपास केली आहे. ही घटना आज सकाळी उघडकीस येताच संपूर्ण परिसरात खडबड उडाली आहे.परिसरात चोरांची दहशत पसरली आहे आणि पोलिसांना अक्षम्य अपयश आल्याचे दिसून येत आहे संस्थान विश्वस्त हे बोरगाव मंजू पोलीस स्टेशन यांच्याकडे तक्रार दाखल करत होते याकडे आता किती गांभीर्याने लक्ष दिले जाते? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे, आणि कुरणखेड येथे पोलीस चौकीची मागणी जोर धरु लागली आहे.

## थोडक्यात

### राष्ट्रसंत सेना महाराज यांची जयंती उत्साहात साजरी



**देऊळगाव राजा :** राष्ट्रीय नाभिक संघटना द्वारे शुक्रवारी राष्ट्रसंत सेनाजी महाराज यांची जयंती सिंदखेड राजा शहरात साजरी करण्यात आली. यावेळी शिख धर्माच्या (गुरु ग्रंथसाहिबा) ग्रंथात संत सेना महाराजांचा अभंगांचा समावेश आहे. सेनाजी परिवर्तनवादी, विज्ञानवादी संघर्ष व महान वारकरी संत असल्यामुळे घरात पुस्तकांचे ग्रंथालय होते. स्वाभिमानी समाजभिमानी व सर्जनशीलता यावर मान्यवरांनी प्रकाश टाकला. प्रारंभी सेना महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी राष्ट्रीय नाभिक संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष हरिदास जाधव, जिल्हा मुख्य सचिव डॉ. प्रकाश सवडतकर, तालुका अध्यक्ष विलास चित्रे,शहर अध्यक्ष प्रदीप जाधव,गजानन राऊत शिवानंद वैद्य विष्णू वैद्य राम राऊत यांच्यासह नाभिक समाज बांधव उपस्थित होते.

### श्री.स्वामी समर्थ रायपुर केंद्रात सप्ताह संपन्न



**रायपुर :** येथे प्रतिवर्षानुसार श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी निमित्त परमपूज्य गुरुमाऊलींच्या आशीर्वादाने व आदेशानुसार अखंड नाम जप, यज्ञ सप्ताहाचे आयोजन करण्यात आले. येथील श्री स्वामी समर्थ सेवा, अध्यात्मिक विकास व बालसंस्कार केंद्र (दिंडोरी प्रणित), भाग्यनगर रायपुर येथे १९ एप्रिल ते २६ एप्रिल दरम्यान सदर आयोजित करण्यात आले होते. या सप्ताह कालावधीत पाचवा वेद म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्री गुरुचरित्र या प्रासादिक ग्रंथाचे पारायण, अखंड प्रहरे यामध्ये सकाळी ८ ते रात्री ८ यावेळेत महिला, व रात्री ८ ते सकाळी ८ यावेळेत पुरुष प्रहरे राहतील तसेच श्री स्वामी समर्थ गुरुपीठ त्र्यंबकेश्वर येथून आलेल्या नियोजनानुसार १९ एप्रिल रोजी ग्रामदेवता स ग्रामदेवता सन्मान मंडल मांडणी, २० रोजी मंडल स्थापना, अग्निस्थापन, स्थापित देवता हवन, नित्य स्वाहाकार, २१ रोजी नित्य स्वाहाकार, गणेशा याग, मनोबोध याग, दि २२ नित्या स्वाहाकार, चंडी याग, गीतेचा १५ वा अध्याय, तुकारामाचा अभंग, पसायदान, मनाचे श्लोक, सांस्कृतिक कार्यक्रम, ग्रामाभियान प्रशिक्षण असे भरगच्च कार्यक्रम या संपन्न झाले होते आज .दिं. २६ एप्रिल शनिवार रोजी श्री सत्यदत्त पूजन होऊन सकाळी १०:३० वाजता सप्ताह सांगता तसेच महाआरती झाली नंतर मांदियाळी स्वरुपात महाप्रसाद वाटप करण्यात आले. या सर्व सेवेत रायपुर तसेच पंचक्रुषीतील पळसखेड भट, पांगरी, मातला आदि गावातील भाविक भक्त, सेवेकऱ्यांनी, सहभागी होऊन गुरुचरीत्र वाचन तसेच प्रहर सेवा स्वामींच्या चरणी सेवा रुजु करुण घेतली.

# महाराष्ट्रातून पाकिस्तानी नागरिक ताबडतोब चालते व्हा !

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा निर्वाणीचा इशारा

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
बुलडाणा , दि.२७

**पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी पाकिस्तानी नागरिकांना देश सोडून जाण्याचा आदेश दिला आहे. महाराष्ट्रात पाकिस्तानी नागरिक जिथे असतील तिथून पाकिस्तानात ताबडतोब चालते व्हा, अन्यथा पोलीस तुम्हाला जागेवरच ठोकतील, असा निवर्णीचा इशारा शिवसेनेचे नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज दिला. बुलडाणा येथे आयोजित आभार सभेत ते बोलत होते.**



यावेळी व्यासपीठावर केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव, मंत्री गुलाबराव पाटील, मंत्री संजय राठोड, माजी आमदार संजय रायमूलकर, आनंदराव अडसूळ, शिवसेना प्रवक्त्या डॉ. ज्योती वाघमारे आणि बुलडाणा जिल्ह्यातील शिवसेना पदाधिकारी उपस्थित होते.

ते पुढे म्हणाले, केंद्र सरकार काम करतंय, दहशतवाद्यांचे अड्डे उद्ध्वस्त करायला सुरुवात झालीय. महाराष्ट्रातील पाकिस्तानी नागरिकांनो तात्काळ पाकिस्तानात जा, देशाच्या सुरक्षेसाठी आमचा शिवसैनिक देशाच्या जवानासारखा लढल्याशिवाय राहणार नाही. हा शेवटचा हल्ला असेल यापुढे हल्ला करण्याचे धाडस त्यांच्यात उरणार नाही, असा विश्वास उपमुख्यमंत्री शिंदे यांनी व्यक्त केला. ही आरपारची लढाई आहे, हा घरात घुसुन हल्ला करणारा भारत आहे, व्होट बँक आणि मतांच्या लाचारीसाठी शेपूट घालणारा भारत नाही, असे ते म्हणाले.

बुलढाणावासीयांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे विचार ऐकण्यासाठी गर्दी केली होती. उपमुख्यमंत्री शिंदे या गर्दीला खास धन्यवाद दिले आणि निवडणुकीत सहकार्य केल्याबद्दल आभार मानले.

ते पुढे म्हणाले की, जेव्हा आपत्ती येते तेव्हा शिवसैनिक म्हणून सगळी टीम घेऊन तेथे मदतीसाठी धावून जातो. त्यामुळेच मी अस्वस्थ मनाने श्रीनगर गाठले. पर्यटकांना महाराष्ट्रात परतण्यासाठी व्यवस्था केली. यातून ४५० पर्यटकांना परत आणले तर बुलडाण्यातील ५१ पर्यटक सुखरुप घरी पोहोचले, असे उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले. तत्पूर्वी आभार सभेचे आयोजक आमदार संजय गायकवाड म्हणाले की, मुख्यमंत्री असताना एकनाथ शिंदे यांनी बुलडाणा जिल्ह्याला जे दिले ते मागील ७० वर्षांत मिळाले नव्हते. अडीच वर्षात सिंचनाबाबत घेतलेल्या निर्णयांमुळे जिल्ह्यातील सिंचनाचे क्षेत्र १०३ हेक्टरवरुन ६५० हेक्टरपर्यंत वाढले आहे. त्याचबरोबर भविष्यात बुलडाणा जिल्ह्यातील १०० टक्के क्षेत्र सिंचनाखाली येईल, असा विश्वास आमदार गायकवाड यांनी व्यक्त केला.

## सवडीचा नव्हे तर आवडीचा परमात्मा केला पाहिजे–ह.भ.प.डॉ.अनिरुध्द क्षीरसागर

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
शेंदुर्जन दि.२७

येथे श्री संत शिरोमणी गोरोबा काका व श्री स्वामी समर्थ यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्रिदिन महोत्सवाच्या निमित्ताने तिसऱ्या दिवशीच्या कीर्तनामध्ये ह. भ. प. श्री वेदांत केसरी डॉ. अनिरुद्ध महाराज क्षिरसागर यांनी तिसऱ्या दिवशी किर्तन झाले.

भक्ताना भक्तीचा महिमा सांगताना डॉ.अनिरुद्ध महाराज म्हणाले सवडीचा परमार्थ म्हणजे आपल्याला वेळ भेटेल त्यावेळेस करणे.असा परमार्थ टिकत नाही. आपल्या शेजारचा दररोज नित्यानेम वेळात भगवंताच्या दर्शनाला जातो व पंढरपूरच्या वारीला जातो. आपली सर्व कामे झाल्यावर वेळ भेटेल त्यावेळेस परमार्थ करणे याला सवडीचा परमार्थ म्हणावे लागेल. हा टिकाऊ परमार्थ नाही तसेच



आपण भगवंताला सुखरूपी संसारा करता काही मागणी करतो त्यावेळेस आपण भगवंताजवळ आपली उंची कमी करत असतो उदाहरणार्थ देवा माझा मुलगा नोकरीवर लागू दे, मला भरभरून संपत्ती दे त्याला भक्ती म्हणता येत नाही. जो कोणी परमार्थाकरिता मागणी करत असेल मला भागवत, कीर्तन, प्रवचन व तुझी भक्ती करण्याची शक्ती दे, असे मागणी केल्यास भगवंता जवळ त्याची उंची ही मोठी असते तसेच संत तुकोबारायांनी फक्त तुझ्या नामास्मरणामध्ये अंतर पडू देऊ नको अशी मागणी होती. संत तुकोबारायांच्या भक्तीला भगवंत प्रसन्न होऊन म्हणाले तुला काय पाहिजे, ते मग त्यावेळेस तुकोबा राया म्हणाले मला काही नको परंतु भगवंत म्हणाले माझ्या डोक्यावरचा भार कमी करण्याकरिता काहीतरी मागणी कर, त्यावेळेस तुकोबाराया म्हणाले मला एकच दान द्या, ते म्हणजे तुमच्या भक्तीचा विसर माझ्याकडून कधीही कमी पडता कामा नये. भगवंताच्या डोक्यावरील भार कमी न होता, आणि अधिकचा भार वाढला गेला म्हणून संतांच्या संगतीने नक्कीच तुमचा उद्धार होईल आणि सवडीचा परमार्थ न करता आवडीचा परमार्थ करा. परमार्थ करण्याकरता जात पात जात कोणतीही असेल तेथे संत आहे.

## संत गोरोबा काकांचा आदर्शवाद आत्मसात करुन, समाज उत्कर्षासाठी संघटीत व्हा- मा.आ. सानंदा

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
खामगाव दि.२७

दि.२६ एप्रिल २०२५ रोजी गोरोबा महाराज यांच्या ७०८ व्या पुण्यतिथीनिमित्त घाटपुरी येथील संत शिरोमणी गोरोबा काका भवन येथे विविध कार्यक्रम पार पडले. सकाळी १० वाजता ह.भ.प.ज्योतीताई काळे यांचे काल्याचे कीर्तन पार पडले. तद्नंतर महाप्रसादाचा कार्यक्रम पार पडला.संत गोरोबा काका यांच्या पुण्यतिथी निमित्त माजी आ. दिलीपकुमार सानंदा यांनी गोरोबा महाराजमंदिरामध्ये जावुन संत शिरोमणी गोरोबा काका यांच्या पुतळयाला माल्यार्पण करुन दर्शन घेतले.यावेळी त्यांच्यासोबत खामगाव तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष मनोज वानखडे,माजी जि.प.सदस्य गजानन वाकुडकर,



घाटपुरी ग्राम पंचायतचे सरपंच विष्णु कुळसुंदर,माजी सरपंच प्रकाश शेळके,संजय लाहुडकार आदींची उपस्थिती होती.यावेळी संत गोरोबा संस्थानच्या वतीने अध्यक्ष रामभाऊ बेंडोकार यांनी माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांचा शाल व पुष्पगुच्छ देवुन सत्कार केला.

या कार्यक्रमाला श्री संत शिरोमणी गोरोबा काका मंदिर समितीचे अध्यक्ष राजाराम बेंडोकर, कुंभार समाजाचे तालुकाध्यक्ष विनोद लाहुडकर, निनाजी बावस्कर,निनाजी मांडवेकर,दिनकर नावकार, अंबादास धोटे, गजानन सोनोने, हरिदास नावकार, संजय लाहुडकार, नारायण मुंडोकार, श्रावण मोरे, मयुर लाहुडकार, बळीराम मोरे, संदिप बावस्कर, संजय बनकर,संतोष पिंगळे, जानराव वसे, देवमन तायडे, सौ.सिमाताई संजय लाहुडकार यांच्यासह कुंभार समाज बांधव-भगिणी मोठया संख्येने उपस्थित होते.

## अंढेरा येथे जागृत श्री औन्ढेश्वर महाराज यांचा भव्य यात्रा महोत्सव

अजिंक्य भारत/ ज्ञानेश्वर मस्के
अंढेरा दि.२७

अंढेरा येथे श्रीऔन्ढेश्वरभगवान यांच्या यत्रेनिमीत्त दरवर्षी प्रमाणे याही वर्षी दि.२० एप्रील २०२५ पासुन अखंड हरिनाम व भागवत सप्ताहांचे भव्य आयोजन करण्यात आले होते. रविवारी भव्य महाप्रसादाचे वितरण करण्यात आले.बुधवार दि.२८ एप्रिल पासुन दोन दिवसीययात्रामहोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.सप्ताहभरापासुन अखंड हरिनाम व भागवत सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. दिवसभर भरगच्च कार्यक्रम होत आहे.

श्री औन्ढेश्वर भगवान अंढेरा गावाचे आराध्य दैवत असुन जागृत देवस्थान म्हणून जिल्हाभर प्रसिद्ध आहे. येथे औन्ढेश्वरभव्य मंदिर असुन श्री औन्ढेश्वरसर्वात मोठी पिंड पाहावयास मिळते. यात्रेनिमीत्त संपूर्ण मंदीराला रंगरंगोटी करण्यात येते तसेच संपूर्ण मंदिरावर विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. चैत्र अमावास्याला येथे यात्रा भरते. यात्रेला सर्व लेकीबाळी तसेच शहरात नोकरी तसेच कामानिमित्ताने बाहेर असणारे सर्वच महिला पुरुष गावी येतात. गावात भक्तीमय व आनंदाचे वातावरण असते. यात्रेच्या दिवशी श्री औन्ढेश्वराची महाआरती होते.सप्ताहाची सांगता भव्य महाप्रसादाच्या वाटपाने होते. रात्रीला महादेव पार्वतीचे तर सकाळी अंबाबाई आईचे सोंग काढण्यात येते.

**अंढेरा गावाचे आराध्य दैवत श्रीऔन्ढेश्वर**

अंढेरा येथे श्री औन्ढेश्वर भगवान यांचे भव्य असे जुने मंदिर असुन येथील महादेवाची पिंड रामकालीन आहे. त्रेता युगात महादेवाच्या पिंडीची स्थापना राम-सिता-लक्ष्मण यांच्या हस्ते झाल्याची आख्यायिका आहे. येथील महादेवाची पिंड ही हिंगोली जिल्ह्यातील बारा ज्योतिर्लिंग असलेल्या औंढा नागनाथ येथुन तयार करुन आणलेली आहे. म्हणुनच त्यांचे नाव औन्ढेश्वरपडले आहे. तर गावाचे नाव आडविहीर होते.परंतु औन्ढेश्वरनावावरुन गावाचे नाव अंढेरा पडले आहे. यल्होजी बाबा हे सिद्ध पुरुष होते. त्यांना रिधी-सिधी प्राप्त असल्यामुळे अंढेरा गावाला तलाव बनवण्यासाठी नदी पात्र अडवण्यासाठी त्यांनी पाळु टाकुन नदी आडवण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे संपूर्ण महादेवाची पिंड पाण्यात



जाणार होती. म्हणुन महादेवाची पिंड ही बारा ज्योतिर्लिंग असणारे औंढा नागनाथ येथुन तयार करून आणलेली आहे. सुरुवातीला येल्होजी बाबा यांनी ओट्यांचे बांधकाम केले. स्व.सखाराम ताठे महाराजांनी अखंड हरिनाम व भागवत सप्ताहाचे आयोजन करण्यास सुरुवात केली. यंदायात्रामहोत्सवाचे ४३ वे वर्ष आहे. वै.कुंठवासी सखाराम ताठे महाराज यांनी गावकऱ्यांच्या सहकार्याने गावात भव्य असे मंदिर उभे केले. श्री.औन्ढेवर गावाचे आराध्य दैवत असुन जागृत देवस्थान आहे.येथे जिल्हायातील सर्वात मोठी पिंड पहावयास मिळते. येथे दरवर्षी महाशिवरात्रीला अखंड हरिनाम व भागवत सप्ताहाचे आयोजन करण्यात येते.असे हे जागृत देवस्थान श्री औन्ढेश्वर भगवान.

## पहेलगाम जम्मू कश्मीर इथे झालेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ जानेफळ कडकडीत बंद

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
जानेफळ दि.२७

पहेलगाम जम्मू कश्मीर येथे दहशतवाद्यांनी निष्पाप हिंदू नागरीकांवर घातक हल्ला केल्याच्या निषेधार्थ आज रविवार दि. २७ एप्रिल २०२५ रोजी जानेफळ बाजारपेठ ही सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत बंद करण्यात आली होती. याबाबत कालच अशा प्रकारचे निवेदन जानेफळ येतील सर्वपक्षीय नेत्यांनी दिले होते. यामध्ये स्थानिक जानेफळ येथील सर्वपक्षीय नेते यांनी निवेदन दिले आहे की, जम्मू कश्मीर येथील पहेलगाम येथे पर्यटकांनवर भ्याड हल्ला करून २६ हिंदू नागरिकांना दहशतवाद्यांनी मारले असून या आतंक वादी हल्ल्याच्या निषेधार्थ हे बंद असल्याचे निवेदनकर्त्यांनी म्हटले आहे. अशा आशयाची निवेदन ठाणेदार आजिनाथ मोरे जानेफळ यांना दिले होते. या पाकिस्तानी अतिरेक्यांच्या या भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ हे गाव बंद आंदोलन असल्याचे निवेदनात म्हटले आहे. यावेळी व्यापरी, नागरिकांनी संर्स्फुतीने कडकडीत बंद पाळला.

या निवेदनावर विश्वासराव किसनराव सवडतकर, ॲड बबन निंबाजी वानखेडे, संतोष बोरबळे, उमेश सदावर्ते, गजानन वडणकर, दिनेश वर्मा, सय्यद मेहबूब भाई, जुगल राठी, गजानन उंबरकर, डॉ.सतीश कुलकर्णी, राम शेळके, शंकर सपकाळ, अशोक बोरकर, मोहन धोटे, सचिन राजूरकर, शिवाजी मुरडकर, गोपाल गट्टानी, संतोष तोंडे, विशाल फितवे, सुशील रेदासनी, सुभाष अक्कर, शफिक भाई सौदागर ,गणेश गौतम सोडतकर, बालू पाखरे व अमोल सुरजुसे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत. यावेळी जानेफळ गावकऱ्यांनी कडकडीत बंद पाळला.

## सिंदखेडराजा तालुक्यातील ४० ग्राम पंचायती महिलांसाठी राखीव

### अ.जाती करीता ९ , मागास प्रवर्ग साठी ११ तर सर्वसाधारण साठी २०

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
सिंदखेडराजा दि.२७

सिंदखेडराजा तालुक्यातील ८० ग्राम पंचायतीचे आरक्षण १६ एप्रिल रोजी तहसील कार्यालयात काढण्यात आले होते. महिला आरक्षण सोडत आज जिल्हाधिकारी कार्यालयात काढण्यात आले असता अनुसूचित जाती महिलांसाठी करीता ९, मागास प्रवर्ग महिलांसाठी ११, तर सर्वसाधारण महिलांसाठी २० ग्राम पंचायतीचे आरक्षण जाहीर करण्यात आले आहे.

सिंदखेडराजा तालुक्यातील अनुसूचित जाती महिलांसाठी आडगाव राजा, रताळी, तांदुळवाडी , गोरेगाव , उमनगाव, नाईकनगर, जळगाव, दत्तापूर,



धांदरवाडी ह्या ग्राम पंचायतीची महिलांसाठी राखीव आहेत. मागास प्रवर्ग महिलांसाठी २० पैकी ११ ग्रामपंचायत राखीव असून त्यात वर्दडी बु., शिंदी, सावरगाव माळ, सवडद, नसिराबाद, पोफळशिवणी,सोनोशी, पिंपळगाव लेंडी , हिवरागडलिंग, डावरगाव, हनवतखेड (महारखेड) सर्वसाधारण ग्राम पंचायती ४० असून त्यापैकी २० ग्राम पंचायती महिलासांठी राखीव आहेत. त्यात उमरद, झोटींगा, धानोरा, हिवरखेडपुर्णा, वाघाळा, देवखेड, दरेगाव, पांग्रीउगले, पिंपरखेड बु., किनगाव राजा, शेंदुर्जन, साखरखेर्डा, ढोरव्ही, भंडारी, आंबेवाडी, खामगाव, कुंभेफळ, पळसखेड चक्का, भोसा, सुलजगाव या ग्राम पंचायतीचा समावेश आहे. महिलांसाठी राखीव ग्राम पंचायतीचे आरक्षण जाहीर झाल्यानंतर सरपंच पदासाठी कोण याचा शोध घेणे सुरु झाले आहे .

## कडकत्या उन्हा सोबतच पाणी टंचाईच्या झळा

### मानवासोबतच प्राण्यांचीही वणवण

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
बुलडाणा दि.२७

एप्रिल महिन्याच्या मध्यावरच सूर्यदेव आग ओकत असल्याने तालुक्यातील अनेक तलाव, धरणातील जलसाठा कमी झाला आहे. नदी-नाले तर कधीच कोरडे झाले आहेत. याचा परिणाम तालुक्यातील जनतेच्या पाणीपुरवठा, तसेच गुरेढोरे व वन्यजीवनावर होताना दिसत आहे. तापमानाचा पारा सातत्याने वाढत असल्याने विहिरी आणि बोअरवेल यांनी तळ गाठला आहे. यामुळे पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई जाणवत असून, मानवाबरोबरच वन्यप्राण्यांनाही पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे.

सिंदखेडराजा तालुक्यात एक नगरपालिका व ८० ग्रामपंचायती असून एकूण गावांची संख्या १०५ तर लोकसंख्या २.५ लाखांच्या घरात आहे. तालुक्यात ग्रामीण भागातील १०३ खाजगी विहीर अधिग्रहण करण्यात आल्या आहेत. ३२ गावांना टँकरद्वारे पाणीपुरवठा प्रस्थावित आहे. तर किनगावराजा, सावरगाव माळ व पांग्री उगले येथे तातडीने टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरु करण्यात आलेला आहे. ग्रामीण भागात ६६९ एवढी एकूण हातपंपांची संख्या आहे. तर विंधन विहिरींवरील १०३ हातपंप सुरु आहेत. तर विंधन विहिरींसाठी आणखी ७७ प्रस्तावित हातपंपांना मंजुरी मिळाली आहे. काही दिवसांपासून तालुक्यात उष्णतेची तीव्र लाट आढळून येत आहे. दिवसा सूर्य आग ओकत असल्याने सर्वसाधारण तापमान ४० अंश सेल्सिअसच्याही पुढे आहे. याचा फटका ग्रामीण भागाला बसत आहे. अनेक गावांमध्ये पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरी आणि बोअरवेल मधील पाणीसाठा झपाट्याने कमी झाला आहे. काही ठिकाणी तर जलस्त्रोतांनी तळ गाठल्याने नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे. महिलांना दूरवर जाऊन डोक्यावर हंडे घेऊन पाणी आणावे लागत आहे. तर काही ठिकाणी खासगी टँकरवर अवलंबून राहावे लागत आहे. तालुक्यातील डोंगर आणि वनक्षेत्रात पाण्याची उपलब्धता कमी झाल्याने वन्यप्राण्यांची अवस्था अधिक बिकट झाली आहे.

तहानलेल्या वन्यजीवांना पाण्यासाठी मानवी वस्तीकडे धाव घ्यावी लागत आहे. अनेक ठिकाणी हरीण, वानर, रानडुक्कर यांसारखे प्राणी पाण्याच्या शोधात भटकताना दिसत आहेत. यामुळे मानवी वस्ती आणि वन्यजीव यांच्यात संघर्ष वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. ज्या गावांमध्ये पाण्याची तीव्र टंचाई आहे, तेथे प्रशासनाने तातडीने टँकरने पाणीपुरवठा करण्याची मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. या गंभीर परिस्थितीवर तातडीने उपाययोजना करणे गरजेचे आहे. प्रशासनाने पाणीटंचाईग्रस्त गावांची पाहणी करून तात्काळ उपाययोजना आखाव्यात.

तसेच, वनविभागाने वन्यप्राण्यांसाठी वनक्षेत्रात पुरेसे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी उपाययोजना करावी, जेणेकरून त्यांना पाण्यासाठी भटकंती करावी लागणार नाही आणि मानवी वस्तीत त्याांचा प्रवेश टळेल. उन्हाळ्याच्या तडाख्यात नागरिकांनीही सतर्क राहून पाण्याचा जपून वापर करणे आवश्यक आहे. अनावश्यक पाण्याचा वापर टाळणे आणि उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन करणे ही काळाची गरज आहे.

**पाणवठे नियमित भरण्याची गरज**

वनविभागाकडून वन्यप्राण्यांसाठी काही ठिकाणी कृत्रिम पाणवठे तयार करण्यात आले असले तरी, वाढत्या उष्णतेमुळे ते लवकरच कोरडे पडत आहेत. त्यामुळे हे पाणवठे नियमितपणे भरण्याची गरज आहे.

**उपाययोजना आवश्यक**

उन्हाळ्याचा वाढता प्रकोप त्यातून निर्माण झालेली पाणीटंचाई एक गंभीर समस्या बनली आहे. यावर तातडीने आणि प्रभावी उपाययोजना करणे अत्यंत आवश्यक आहे, अन्यथा मानवी जीवन आणि वन्यजीवनावर याचे गंभीर परिणाम होऊ शकतात.

अजिंक्य भारत
आपलं अमरावती
सोमवार, दि. २८ एप्रिल २०२५

## थोडक्यात

### शिवाजी उच्च माध्यमिक शाळेत विविध साहसी खेळाबरोबर घोडास्वारीचे प्रशिक्षण



**मोर्शी :** शिवाजी उच्च माध्यमिक शाळा मोर्शी,तालुका क्रीडा कार्यालय मोर्शी तसेच शिवाजी बहुउद्देशीय मंडळ मोर्शी यांचे संयुक्त विद्यमाने दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा १० दिवसीय ग्रीष्मकालीन कला व क्रीडा शिबिराचे आयोजन शिवाजी उच्च माध्यमिक शाळा मोर्शी येथे करण्यात आले आहे.या शिबिराअंतर्गत विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या खेळाबरोबर घोडेस्वारीचे प्रशिक्षण सुद्धा दिले जात आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या भावी जीवनात आलेल्या कोणत्याही परिस्थितीचा सामना करावा तसेच विद्यार्थ्यांना सर्व प्रकारची जाणीव निर्माण व्हावी.यासाठी उन्हाळी शिबिराचे आयोजन करण्यात येते. या शिबिराचे मार्गदर्शक अजय हिवसे, विजय तारापुरे, अतुल वैद्य, अनिल जावळे हे शिबिरार्थींना विविध खेळांचे प्रशिक्षण देत आहे. तसेच कला शिबिरार्थींना सचिन चोपडे व शिवशंकर बाजारे प्रशिक्षण देत आहे.विद्यालयाचे मुख्याध्यापक श्रीकांत देशमुख, उपमुख्याध्यापक मिलिंद ढाकुलकर, पर्यवेक्षक उद्धव गीद यांनी उन्हाळी कला क्रीडा या शिबिरात भाग घेणाऱ्या सर्व शिबिरार्थींना शुभेच्छा देऊन त्यांचे अभिनंदन केले.

### अवैध गौण खनिज वाहतूक करणारा ट्रॅक्टर पकडला



**धामणगावरेल्वे :** शुक्रवारी रात्री ११:५० वाजता मा. तहसिलदार यांचे गौण खनिज पथक अवैध रेती वाहतुकीवर आळा घालण्यासाठी गस्तीवर असतांना मौजा चिंचोली ते पुलगाव रोडवर अवैध गौण खनिज वाहतूक करतांना ट्रॅक्टर क्रमांक २७ १७७४ (लाल रंगाचा व विना नंबर प्लेट असलेली हिरव्या रंगाची ट्रॉली) आढळून आला. सदर ट्रॅक्टर थांबवला असता ट्रॅक्टर चालक अमन गजानन इंगळे, वय- २२ वर्ष, रा. नायगाव, ता. धामणगाव रे., यास अवैध रेती वाहतुकीचा परवाना विचारला असता त्याच्याकडे कुठलाही परवाना आढळून आला नाही. अवैध गौण खनिज वाहतूक करणारा ट्रॅक्टर हा आदेश अरूनराव लकडे , रा. तळणी, ता. धामणगाव रे. यांच्या मालकीचा असून, सदर ट्रॅक्टर मध्ये अंदाजे १ ब्रास रेती चिंचोली येथील वर्धा नदी पात्रातून अवैधरीत्या उत्खनन करून विनापरवाना सदर रेती हि चिंचोली येथे घेऊन जात असल्याचे ट्रॅक्टर चालक यांनी सांगितले. सदर ट्रॅक्टर चा व रेतीचा पंचा समक्ष पंचनामा करण्यात आलेला असून दंडात्मक कारवाई करिता ट्रॅक्टर तहसील कार्यालय येथे जमा करण्यात आलेला आहे. सदर गौण खनिज पथकाच्या कारवाई मध्ये मा. तहसीलदार अभय घोरपडे सर , ग्राम महसूल अधिकारी दिनेश ठाकरे,आकाश चव्हाण हजर होते.

### महालक्ष्मी नगरात चोरी



**चांदूर रेल्वे :** स्थानिक महालक्ष्मी चांदूर रेल्वे येथील रहिवासी रवींद्र साबळे यांच्या राहत्या घरी काल दिनांक २६ /४/२०२५ रोजी मध्यरात्री २:०० ते ३ :००वाजता दरम्यान चोरट्यांनी घरात शिरून ,बेडरूम मध्ये असलेल्या गोदरेज च्या कपाटातील १० लाख किमतीचे ७० ते ८० ग्राम सोन्याचे दागिने व ५ ते १० चांदीचे नाने व १० ते १५ हजाराची रोकड असा किंमती ऐवज कपाटाचे चे लॉक तोडून चोरट्याने लंपास कले. घटनेच्या दिवशी रवींद्र साबळे हे बाहेरगावी गेले असता ,,घरामध्ये फक्त पत्नी अपर्णा साबळे व त्यांची लहान मुलगी हेच घरी होते. घरात दोघी एकट्या असल्याने बेडरूम मध्ये न झोपता दोघेही हॉलमध्ये झोपल्या.मध्यरात्री २ वाजता दरम्यान कंपाउंड वाल वरून चोरट्यांनी प्रवेश करून बेड रूम चे लॉक तोडून बेडररूम मध्ये प्रवेश केला व उर्वरित रूम आतून कडीने बंद केल्या. सकाळी साधारण ७:३० वाजता जेव्हा अपर्णा साबळे झोपेतून जागी झाल्या तेव्हा हॉल च्या दाराची कडी बाहेरून बंद केल्याचे लक्षात आले.काहीतरी विपरीत घडल्यामुळे त्यांनी शेजार्यांना आवाज दिला ,त्या नंतर शेजाऱ्यांनी घरात येऊन हॉल ला बाहेरून लावलेली कडी उघडली ,बोळीतुन बेडरूम मध्ये प्रवेश करताच चोरी झाल्याचे निष्पन्न झाले.पोलिसांना घटनेची माहिती मिळताच घटनास्थळ गाठले व प्राथमिक तपासकार्य केले आणि डॉग स्कॉड आणून पुढील तपास करण्याचे आश्वासित केले. महालक्ष्मी नगर,संताबाई यादव नगर,महारुद्र नगर ह्या भागात चोऱ्यांचे प्रमाण वाढत आहे तेव्हा पोलिसांनी रात्रीची गस्त वाढवून पोलिसांनी स्थानिक नागरिकांना संरक्षण देण्याची मागणी स्थानिक नागरिक करीत आहे.

# हंगामापूर्वीच खतदरवाढीचा फटका

## खताच्या बॅगमध्ये २५५ रुपयांची दरवाढ, डीएपीही महागणार

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**अमरावती, दि. २७ :** खरीब हंगामाला जून पासून सुरूवात होत असलेली तरी त्यापूर्वी शेतकऱ्यांना रासायनिक खताच्या दरवाढीचा फटका शासनाने दिला आहे. डीएपीम ध्ये वाढ प्रस्तावित होत असताना १०-२६-२६ खताचे दर २५५ ते २७५ रुपयांपर्यंत वाढविण्यात आले आहे. बीटी बियाण्यांची ३७ रुपयांनी दरवाढ झालेली आहे. तर आता किटकनाशकाचेही दर १० टक्क्यांनी वाढण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. दरवर्षी शेती पिकाचा उत्पादनखर्च वाढत असताना त्या तुलनेत उत्पन्न होत नसल्याने शेतीचे मिमकरण बिघडले आहे. खरिपापूर्वी रासयनिक दरवाढीला सुरुवात झाली आहे. यंदा खरिपापूर्वीच खताचे भाव वाढल्याने शेतकऱ्यांना मोठा फटका सहन करावा लागणार आहे. खताची रॅक लागल्यावर यावेळस खताचा भाव काय राहिल हे निश्चित होत आहे. यावर्षी डीएपीची दरवाढ होणार असल्याची चर्चाही होत आहे. सध्या डीएपी १३५० रुपये बॅग आहेत. यामध्ये १५० रुपयांची दरवाढ होण्याची शक्यता आहे.

या खतावरील अनुदान बंद करून दरवाढीचा घाट रचला जात आहे. महिन्याभरापासून १०-२६-२६ या खताचे दर १४७० रुपयांवरून १७२५ ते १७५० रुपयांवर पोहचले आहेत. २०-२०-०-१३ चे खत पूर्वी १२०० होते. ते आता १४०० रुपयांवर जाऊन पोहचले आहे. कपाशी सोयाबीनसह या खताचा वापर शेतकरी माठ्यया प्रमाणात करतात. त्यातच खताची दर वाढल्याने उत्पादन खर्चात वाढ होत आहेत. खरीप मागणीसाठी यूरिया ३५ हजार ४०५ मॅट्रीकटन, डीएपी २१२४४ मे.टन, एमओपी ४ हजार ५२०, एनपीके ४४ हजार ६०० एसएसपी ३७ हजार ९०० अशी मागणी कृषी विभागाने केली आहे.

### किटकनाशकाची दरवाढ

केंद्र शासनाने बीटी बियाण्याची प्रतीबॅग ३७ रुपयांनी वाढ केल्याने जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चात साडेपाच कोटीनी वाढ झाली आहे. ही वाढ किटकनाशकाच्या दरात पाच ते १० टक्क्यांनी वाढ होण्याची शक्यता कृषी विक्रेत्यांनी दर्शविली आहे. रासायनिक खतासोबतच कंपन्यांद्वारे दुय्यम खताची लिंगिंकचा प्रकार वर्षभरापासून सुरू आहे. याबाबत विक्रेत्याद्वारे तक्रार होत नसल्याने कृषी विभागाकडून कारवाई करण्यात येत नाही. परंतु हे दुय्यम दर्जाचे खत शेवटी शेतकऱ्यांना विकण्यात येते.

### पोलिस स्टेशन समोरून दुचाकी चोरी

**अमरावती :** गाडगेनगर पोलिस ठाण्याच्या बाहेरील कडेला फिर्यादीने दुचाकी लावून ठेवली होती व ते अचलपूर येथे गेले. त्यांना त्यांची दुचाकी दिसून आली नाही, ही घटना २४ एप्रिलला घडली. फिर्यादी अमोल दिगांबरराव सायसीकमल, ४५, रा. भाजीबाजार अमरावती हे अचलपूर येथे कोर्टात नोकरीवर आहे. त्यांनी त्यांची दुचाकी एमएच २७ सी डीएन ४३२१ए गाडगेनगर पोलिस ठाण्याच्या बाहेर उभी करून ठेवली होती व अचलपूरला निघून गेले. त्यांना त्यांची दुचाकी दिसली नाही. ती दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेली. फिर्यादी यांनी दुचाकीचा शोध घेतला असता ती मिळून आली नाही. याबाबत गाडगेनगर पोलिस ठाण्यात तक्रार दिली असून पोलिसांनी अज्ञात चाट्ययाविरुध्द गुन्हा नोंदविला आहे. पोलिस त्या चोरट्ययाचा शोध घेत आहेत.

# जिल्हयातील पहिला 'ओडीएफ प्लस मॉडेल'तालुका नांदगांव खंडेश्वर

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**नांदगांव खंडेश्वर, दि. २७ :** स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) हा केंद्र शासनाचा महत्वाकांक्षी उपक्रम असून, गावे हागणदारीमुक्त झाल्या नंतर त्या गावांमध्ये सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प पुर्ण करुन त्याची यशस्वी अंमलबजावणी केल्या नंतर संबधीत गावाला केंद्र शासना कडून प्लस घोषीत करण्यात येते. ही बाब त्या गावासाठी भूषणावह असते. अमरावती जिल्हयातील नांदगांव खंडेश्वर तालुका हा जिल्हयातून सर्वात प्रथम प्लस तालुका ठरला आहे. या तालुक्यातील सर्व १२३ गावे प्लस म्हणून केंद्र शासनाने घोषीत केले आहेत. अमरावती जिल्हयात एकुण १४ तालुके असून, १५८८ गावे आहेत. जिल्हयातील १४ तालुक्यांमधुन तालुक्यातील सर्वच १२३ गावानां प्लस दर्जा प्राप्त झालेला असून, हा मान मिळवणारा जिल्हयातील हा पहिला तालुका ठरला आहे. अमरावती जिल्हा सन २०१८ मध्ये हागणदारी मुक्त झाला होता. त्या पुढील टप्पा म्हणजे प्लस गावातील सर्व लोक शौचालये वापरू लागले आता उघडयावर कोणीही जात नाही.

परंतु गावात सार्वजनिक कचरा, सार्वजनिक सांडपाणी, घराघरातून दैनिक कचरा संकलन हया बाबींवर या प्लस मध्ये लक्ष केंद्रीत करुन अभियान राबविण्यात आले. या मध्ये सार्वजनिक कचरा व्यवस्थापना करिता प्रत्येक गावात २ किंवा त्यापेक्षा जास्त नॅडेप (कंम्पोस्ट पिट) बांधण्यात आले



आहेत. प्रत्येक घरातील कचरा ओला सुका व न कुजनारा वेगळा अश्या स्वरुपात गोळा करण्यासाठी प्रत्येक गावात घंटागाडी ची सोय करण्यात आली आहे. प्लास्टीक कचरा वेगळा गोळा करण्याकरिता प्रत्येक गावात प्लास्टीक संकलन केंद्र बांधण्यात आले आहे. तसेच सांडपाण्याच्या व्यवस्थापना करिता प्रत्येक गावात मोठे-मोठे सार्वजनिक सोक पिट बांधण्यात आले आहे. या सोक पिट मुळे गावातील भूगर्भातील पाण्याच्या पातळीत सुध्दा वाढ झालेली आढळून येत आहे.

हागणदारीमुक्त गाव व सोबतच सार्वजनिक सांडपाणी व घनकचऱ्याचे सुयोग्य व्यवस्थापना मुळे तालुक्यातील गावे स्वच्छ व प्लास्टीक मुक्त दिसायला लागली असून, काही ग्रामपंचायतीने सार्वजनिक कंम्पोस्ट पीट मध्ये कचरा टाकून त्या पासून सेंद्रीय खत निर्मीतीला सुरुवात केली असून, ते खत गावात वृक्षलागवड, फळबाग लागवडीला देण्यात येते.

सदरचा प्रकल्प प्रत्येक ग्रामपंचायतीने गावातील बचत गट किंवा इतर संस्थेस चालविणेस देणे बाबतची कार्यवाही सुरु. केली असून, सदर प्रकल्पा पासून संबधीत बचत गट गांडूळखत, सेंद्रीय खत निर्मीती करुन नफा मिळवू शकते या दृष्टीने तालुक्यातील ग्रामपंचायतीना तालुक्याच्या गट विकास अधिकारी स्नेहल शेलार, सहा.

गट विकास अधिकारी संजय झंजाड, विस्तार अधिकारी निलेश ठाकरे , विठठल जाधव व सुर्यकांत बनकर प्रयन्तशिल आहेत. संपुर्ण तालुका प्लस करण्यामध्ये तालुक्यातील सर्व सरपंच, ग्रामपंचायत अधिकारी पंचायत समिती मधील सर्व अधिकारी यांनी गट विकास अधिकारी स्नेहल शेलार यांच्या मार्गदर्शनात मोलाचे योगदान दिले आहे. राज्यस्तरावर पंचायत समिती नांदगाव खंडेश्वर अव्वल ठरली आहे.

# ३० अनुकंप धारकांना नोकरी

## मुख्य कार्यपालन अधिकाऱ्याच्या हस्ते आदेश वाटप

अजिंक्य भारत । प्रतिनिधी




**अमरावती, दि. २७ :** कर्तव्या-वर असताना आकस्मित निधन झालेल्या कर्मचाऱ्यांच्या तीस वारसदारांना जिल्हा परिषदेने अनुकंपावर नोकरी दिली आहे. शुक्रवारी या उमेदवारांना नियुक्ती पत्राचे वाटप मुख्य कार्यपालन अधिकारी संगीता महापात्रा यांनी केले. आपल्या नजीकच्या ना-तेवाईकांच्या निधनानंतर दुःख सा-वरत शुक्रवारी त्यांच्या चेहऱ्यावर हास्य म्हटले होते.

जिल्हा परिषद कार्य कर्मचाऱ्यांच्या आकस्मित निधनानंतर त्यांच्या वारसांना अनुकंपा अंतर्गत नोकरी दिली जाते. यामध्ये जिल्हा परिषद प्रशासन अव्वल असून आतापर्यंत आई-वडिलांच्या कर्तव्या-वर असताना निधन झाल्यानं-तर अनेकांना संधी दिली आहे. जानेवारी २०२४ ते फेब्रुवारी २०२५ या दरम्यान कर्मचाऱ्यांच्या निधनानंतर तीस वारसदारांची नोंद घेत त्यांच्या यादीमध्ये समावेश केला होता. मागील वर्षी तब्बल ९९ उमेदवारांना नोकरी देण्यात आली आहे. तीस वारसदारांना नोकरी देऊन त्यांना शुक्रवारी शिव संगीता महापात्र यांनी नियुक्तीपत्र दिले आहे. याप्रसंगी सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब, कनिष्ठ प्रशासन अधिकारी पंकज गुल्हाने श्रीकांत मेश्राम सतीश पवार जीवन नारे निशांत तायडे उपस्थित होते. उमेदवारामध्ये चेतन रामचंद्र माळोदे ब्रिजेश दिनेश बावणे गणेश कृष्णकुमार दाभाडे शुभम सुभाष भगवे, प्रथम बाळकृष्ण राणे सौथ अली साजिद अली, क्रांती किशोर कांडलकर सूर्भी अजय वानखडे यश हर्षद अढाऊ अपूर्वा देवेंद्र जिसकार रेणुका रवींद्र केते वैदवी चेतन रा-ठोड प्रतीक जनार्दन रामटेके पूजा प्रवीण युनाते युगल बाळकृष्ण रामटेके शेखर बबन कांबळे तु-षार देवी किसन राठोड ओम राज रामचंद्र देशमुख सुषमा दिनकर दंडगे कौशल संजय सुने आस्था संजय पोटे अंश अजय खोसे पार्थ प्रमोद यावलकर पवन श्याम कुमार पटोरकर आदित्य दीपक वैद्य अक्षय संजय फटके हर्ष संजय येरवडे हर्षल बबन धानोरकर उदय प्रशांत सावंत वेदांत नरेंद्र लहाने यांचा समावेश आहे.

### कर्जबाजारीपणाला कंटाळून शेतकऱ्याने उचलले टोकाचे पाऊल

#### राहत्या घरी गळफास लावून संपविले जीवन

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**नांदगाव पेठ, दि. २७ :** येथील गजानन सिताराम कापडे (वय ४२) या शेतकऱ्याने शनिवारी (दि. २६ एप्रिल) सायंकाळी आपल्या राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. त्यांच्याकडे केवळ अडीच एकर शेती होती आणि शेतीतून होणाऱ्या अल्प उत्पन्नावरच त्यांचा उदरनिर्वाह सुरू होता. मात्र, सलग काही वर्षे अस्मानी संकटे कोसळल्याने शेतीचे उत्पादन ठप्प झाले होते. यामुळे गजानन कापडे यांनी स्थानिक बँका आणि बचत गटांकडून कर्ज घेतले होते.

मात्र पीक नुकसान व उत्पन्नात घट झाल्याने ते कर्जाची परतफेड करण्यास असमर्थ ठरले. कर्जाच्या वाढत्या ओझ्यामुळे ते मानसिक तणावाखाली होते. अखेर, या विवंचनेतून त्यांनी शनिवारी दुपारी अंदाजे पाच वाजता राहत्या घरी गळफास घेऊन जीवनयात्रा संपवली. गजानन कापडे यांच्या पश्चात वृद्ध आई, पत्नी आणि दोन मुले असा परिवार आहे. त्यांच्या मृत्यूमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. प्रशासनाने या घटनेची तातडीने दखल घ्यावी आणि कापडे कुटुंबीयांना तातडीने आर्थिक मदत व आधार द्यावा.

# दर्यापूर अर्बन एक अंतर्गत वृक्षांच्या फांद्या छाटनी

## धोका लक्षात घेता देखभाल कामांना भर उन्हात सुरुवात

अजिंक्य भारत । विनोद शिंगणे

**दर्यापूर, दि. २७ :** अर्बन एक अंतर्गत. दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा पावसाळ्याच्या अगोदर मोठ्या विद्युत वाहिनीला स्पर्श करणाऱ्या .फांद्यांची कटाई करणे सुरू झाली आहे. दर्यापूर अर्बन एक नेहमीच संभाव्य धोका लक्षात घेता .मेंटनन्स करीत असते .दर्यापूर मध्ये सर्वत्र विद्युत वाहिन्यांचे जाळे पसरले गेले आहेत .तर मोठ्या विद्युत वाहिनीवर जे वृक्ष स्पर्श करीत आहेत. त्यामुळे शहरातील वीजपुरवठा खंडित होत असतो .यासाठी शहरातील विविध



भागात पूर्व सूचना देऊन. विद्युत तारां-चे मेंटेनन्स व इतर किरकोळ कामे युद्ध स्तरावर सुरू आहेत. भर उन्हाच्या दिवसात विद्युत वाहिन्यांचे मेंटनन्स होत असल्याने .ग्राहकांना अधिक त्रास सहन करावा लागत आहे हे तितकेच खरे. आणखी काही दिवस ही मोहीम सुरू राहणार असल्याचे. संबंधित अधिकाऱ्यांनी व्यक्त केले .भर उन्हात महावितरण कर्मचारी हे जीव धोक्यात घालून काम करीत आहेत. त्यासा-ठी ग्राहकांचे सहकार्य सुद्धा तितकेच महत्त्वाचे असल्याचे. विद्युत वितरण कर्मचाऱ्यांनी व्यक्त केले.



## थोडक्यात

### सहसंचालक प्रदीप घुले यांना प्रशासकीय गतिमानता पुरस्कार



**अमरावती :** व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण सहसंचालक प्रदीप घुले यांना राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता पुरस्कार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. त्यांना उत्कृष्ट आयटीआय, रोजगार मेळावे, संवाद फोरम उपक्रमासाठी १० लाख रुपयांचे प्रथम पारितोषिक देण्यात आले. राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान आणि स्पर्धा २०२४-२५ या वर्षातील राज्यस्तरीय पारितोषिकांमध्ये विभागीय स्तरावरील निवड समित्यांकडून प्राप्त प्रस्तावामधून व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, क्षेत्रीय कार्यालयाच्या उपक्रमांची प्रथम पारितोषिकासाठी निवड करण्यात आली. कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाचे मंत्री मंगलप्रभात लोढा, मुख्य सचिव सुजाता सौनिक यांच्या उपस्थितीत पुरस्कार प्रदान करण्यात आला. पारितोषिक विजेत्यांना मिळालेली रकम कार्यालयाची सुधारणा किंवा स्पर्धेत पाठवलेल्या प्रस्तावाच्या अंमलबजावणीसाठी करावी लागणार आहे.

### सोमवारी सेवा हक्क दिन कार्यक्रम

**अमरावती :** जिल्हा प्रशासनातर्फे सोमवार, दि. २८ एप्रिल रोजी सेवा हक्क दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्र लोकसेवा अधिनियम २०१५च्या अंमलबजावणीस दहा वर्षे पूर्ण होत आहे. दशकपूर्तीनिमित्त जिल्हा आणि ग्रामपातळीवर विशेष उपक्रम राबविण्यात येत आहे. सोमवारी दुपारी १२ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनात सेवा हक्क दिन आयोजित करण्यात आला आहे, यावेळी नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर यांनी केले आहे.



**अमरावती :** मस्जिद इब्राहिम उस्मान नगरमध्ये पहलगाम हल्ल्याचा विरोध करून हिंदू-मुस्लिम एकात्मतेचा परिसरातील मुस्लिम बांधवांनी संदेश दिला.

### श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी व अखंड नामजप सप्ताह



**अमरावती :** श्री स्वामी समर्थ महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र दिंडोरी प्रणित आरोग्य सेवा कॉलनी रहाटगाव येथे सुरू असलेल्या अखंड नामजप यज्ञात पुरुष महिला विद्यार्थी मुले मुली बसलेले आहेत. अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने सुरू असलेल्या या सप्ताहात सकाळी औदुंबर प्रदक्षिणा,यज्ञ मंडपातील रोजचे कर्म, भूपाळी आरती ,श्री स्वामी महाराजांच्या मूर्तीचे षोडशोपचारे पूजन व अभिषेक, नैवेद्य आरती (मंत्र पुष्पांजली सह) दुर्गा सप्तशती व स्वामी सारामृताचे पारायण, प्रश्नोत्तरे, हस्तरेषा, जन्मकुंडली पाहणे, प्रश्न सोडवणे, वास्तुशास्त्रावर मार्गदर्शन, सांस्कृतिक कार्यक्रम ,गीताई मनाचे श्लोक वाचन ,सायंकाळी औदुंबर प्रदक्षिणा, आरती, मार्गदर्शन, सायंकाळची नित्यसेवा, गीतेचा पंधरावा अध्याय विष्णु सहस्रनाम वाचन सुरू आहे. या कार्यक्रमात शहरातील तसेच ग्रामीण भागातील महिलां मोठ्या प्रमाणात सहभागी झाल्या आहेत.

# कंपोस्ट खड्डा भरु, आपलं गाव स्वच्छ ठेवू अभियान

## महाराष्ट्र दिनापासून प्रारंभ; सहभागी होण्याचे जिल्हावासीयांना आवाहन

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावती, दि. २७ :** स्वच्छते ची चळवळ अधिक प्रभावी करण्यासाठी जिल्हा परिषदेने कंबर कसली आहे. राज्य सरकार महाराष्ट्र दिनापासून दि. (१ मे) जिल्ह्यात कंपोस्ट खड्डा भरू, आपलं गाव स्वच्छ ठेवू ! हे विशेष स्वच्छता अभियान राबवित आहे. या अभियानात ओल्या कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करून त्यापासून खत बनवण्यावर भर दिला जाणार आहे. नागरिकांनी या अभियानात सहभागी व्हावे, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांनी केले आहे.

स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा २ अंतर्गत घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाचे जिल्ह्यात प्रभावीपणे काम सुरू आहे. जिल्ह्यातील १५८८ गावांपैकी १४५१ गावात घनकचरा व सांडपाणी व्यस्थापनाची कामे पूर्ण झाली आहेत. सांडपाणी व्यवस्थापनातर्गत सार्वजनिक शोषखड्डे, डिव्याटस इत्यादी तर घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत गांडूळ खत प्रकल्प, प्लास्टिक कचरा संकलन केंद्र इत्यादी उपाययोजना केल्या जात आहेत. पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने दिलेल्या निर्देशानुसार गावात तयार केलेल्या नाडेपच्या माध्यमातून ओल्या कचऱ्याचे व्यवस्थापन करून खत निर्मितीवर लक्ष केंद्रित केले जाणार आहे. हे अभियान १ मे ते ३० सप्टेंबर या कालावधीत राबवण्यात येणार आहे. अभियानाच्या पूर्वतयारीसाठी दि. २७ ते ३० एप्रिल दरम्यान घरोघरी कचऱ्याचे वर्गीकरण केले जाणार आहे. घरगुती व सार्वजनिक स्तरावर वर्गीकरण केलेल्या ओल्या



कचऱ्याचे २७ ते ३० एप्रिल या कालावधीमध्ये संकलन करण्यात येईल. २९ ते ३० एप्रिल दरम्यान या मोहिमेची विविध माध्यमांचा वापर करुन जनजागृती करण्यात येणार आहे. यशोगाथा प्रकाशित करून इतर गावांना प्रेरित करण्यात येणार आहे. अभियानासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी, संस्था, बचतगट, महिला व शेतकरी गटांचा सहभाग घेऊन गावपातळीवर श्रमदान उपक्रम राबवून जनसहभाग घेतला जाणार आहे. महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून या मोहिमेचा शुभारंभ होणार आहे. दि. १ ते १० मे या कालावधीत गावातून संकलित केलेला ओला कचरा नाडेपमध्ये भरण्यात येईल. त्यापासून खत निर्मितीनंतर १५ सप्टेंबरपर्यंत नाडेपमध्ये तयार झालेले खत उपसण्याची प्रक्रिया होईल.

> कंपोस्ट खड्डा भरू, आपलं गाव स्वच्छ ठेवू! या अभियानात जिल्ह्यातील प्रत्येक गावाने सक्रिय सहभाग घ्यावा. प्रत्येक कुटुंबाने घरामध्ये ओला व सुका कचरा असे वर्गीकरण करावे. ओल्या कचऱ्यापासून कंपोस्ट खत किंवा गांडूळ खत निर्मिती करावी. प्लास्टिक किंवा इतर न कुजणारा सुका कचरा पुनर्प्रक्रियेसाठी देण्यात यावा. आपले गाव स्वच्छ व सुंदर बनविण्यासाठी प्रत्येक नागरिकांनी या अभियानात सहभागी व्हावे.
>
> 
>
> **संजिता महापात्र,**
> मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अमरावती.

ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी बैठक घेऊन ग्रामस्थांना याबाबत माहिती द्यावी. गावात दवंडी देण्याबरोबरच ग्रामपंचायत कार्यालय, शाळा, अंगणवाडी, सर्व कार्यालयाच्या सूचना फलकावर माहिती प्रसारित करावी, अशा सूचना सर्व गट विकास अधिकारी यांना देण्यात आल्या आहेत. कंपोस्ट खड्डा भरू, आपलं गाव स्वच्छ ठेवू ! या मोहिमेची पडताळणी तालुका स्तरावरून गटविकास अधिकारी, विस्तार अधिकारी, जिल्हा सल्लागार, तालुकास्तरावरील समन्वयक व गट समन्वयक ओल्या कचऱ्यापासून भरलेल्या नाले, खड्ड्याची पडताळणी करतील, अशी माहिती पाणी व स्वच्छता विभागाच्या वतीने देण्यात आली.

## भिक्खू संघाचा जिल्हा कचेरीवर महामोर्चा

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**पूर्णानगर, दि. २७ :** भारतातील बिहार राज्यामध्ये असलेले बुद्धगया येथील महाबोधी महाविहार हे बौद्धाचे जागतिक स्तरावरील प्राचीन पवित्र स्थान असून यावर प्रस्थापितांचा कब्जा आहे. त्यांच्यापासून मुक्त करण्यासाठी तसेच बौधगया टेम्पल ऍक्ट १९४९ रद्द करण्याकरिता अखिल भारतीय भिक्कूसंघ अमरावती शाखेच्या वतीने दिनांक ३० एप्रिल २०२५ ला जिल्हाधिकारी कार्यालयावर महामोर्च्याचे आयोजन करण्यात आले. स्थानिक अमरावती शाखेच्या वतीने मराठी पत्रकार संघाच्या सभागृहात पत्रकार परिषद घेऊन ही घोषणा करण्यात आली. याबाबत सर्व जिल्ह्यात प्रचार व प्रसार सुरु असून या



महामोर्च्यात सर्व जनतेनी जास्तीतजास्त संख्येने सहभागी होण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.सन २०१० पासून महाबोधी महाविहारात जाणीवपूर्वक देविदेवतांची प्रतिकृती स्थापन करून मूळ बुद्ध मूर्तिचे विद्ररुपीकरण करण्यात येत असल्याचाही आरोप करण्यात आला आहे. म्हणून बी. टी. एम. सी. ऍक्ट १९४९ रद्द करून महाबोधी महाविहार बौद्धाच्या स्वाधीन करण्यात यावे या मागणीसाठी हा महामोर्चा अमरावती येथील डॉ. बाबासाहेबआंबेडकर चक ते जिल्हा धिकारी कार्यालयापर्यंत काढण्यात येणार आहे. पत्रकार परिषदेला अखिल भारतीय भिकखू संघांचे भदंत निर्मल पुत्त आनंद महाथेरो, भन्ते बुद्धघोष महाथेरो , भदंत चंद्रमनी थेरो, भन्ते अमोलबोधी थेरो, भदंत आर्या सारिपूत्त थेरो, भन्ते श्रीपाद थेरो, भन्ते बुधप्रिय, भन्ते शीलवंसलंकार इत्यादी उपस्थित होते.

## विज्ञान व गणित संस्कार शिबिर

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**दर्यापूर, दि. २७ :** शैक्षणिक क्षेत्रात सदैव अग्रेसर असणाऱ्या येथील नामांकित प्रबोधन विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयामध्ये विज्ञान व गणित संस्कार शिबिराचे मोठ्या उत्साहात उद्घाटन करण्यात आले. या उद्घाटनाला रवींद्र गणोरकर कार्यकारणी अध्यक्ष विदर्भ प्रबोधन मंडळ शिवम विसापुरे ठाणेदार दर्यापूर प्रतिभाताई संत प्राचार्या ,माधुरीताई डेहेडकर (समन्वयक) आशिष जैन पुरातत्त्व शास्त्रज्ञ) परिमल नळकांडे (मुख्याध्यापक धामोडी), मनोज देशमुख (मुख्याध्यापक येवदा), दर्यापूर तालुक्यातील सर्व सन्माननीय पत्रकार इतर मान्यवर उपस्थित होते.या शिबिरामध्येतालुक्यातील विविध शाळेतील विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात व उत्साहाने सहभाग नोंदविला. भविष्यातील शास्त्रज्ञ याच वैज्ञानिक दृष्टिकोनातून घडतील असा विश्वास कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री रविंद्रजी गणोरकर यांनी यावेळी व्यक्त केला तर विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, नवोपक्रमशीलता इ.गुण निर्माण होण्यास सदर शिबिराचा प्रभावी उपयोग होईल असे प्रतिपादन शिबिराच्या समन्वयिका मा. माधुरीताई डेहेडकर यांनी केले या शिबिरामध्ये विविध शास्त्रज्ञ भेटी देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतील त्यामुळे सर्वांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन विद्यालयाच्या प्राचार्या प्रतिभाताई संत यांनी याप्रसंगी केले. शिबिरामध्ये विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव,प्रयोग,प्रात्यक्षिक विद्यालयामध्येरसायनशास्त्र,भौतिकशास्त्र, जीवशास्त्र वनस्पतीशास्त्र, गणिती प्रयोगशाळा या सर्वांची प्रभावी उभारणी विद्यालयातील विज्ञान व गणित शिक्षकांनी अल्पावधीतच मोठ्या कष्टाने केली. याप्रसंगी दर्यापूर तालुक्यातील पत्रकार बंधूं चा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. शिबिर यशस्वी होण्यासाठी कार्यालयीन प्रमुख, शिक्षकवृंद व सर्व कर्मचारी वर्ग कष्ट घेत आहे. हे शिबिर यशस्वी होण्यासाठी विदर्भ प्रबोधन मंडळाचे चेअरमन श्री श्रीधर पंत वैद्य, विश्वस्त श्री बापूसाहेब कोरपे, ॲड. श्री प्रसाद महाजन, ॲड. श्री आनंद जोशी, श्री प्रशांत वैद्य आणि श्री अभिजीत इटकीकर या सर्व विश्वस्तांनी शुभेच्छा दिल्यात त्याप्रसंगी शाळा सुरक्षा समिती चे सर्व सदस्य गोपाल अर्बट, प्रदीप मालिये, सुधीर पवार, विनोद पवार, अतुल सगणे, गोपाल काठोले, भानुदास काठोले, सचिन कोरडे, तुषार चौधरी, सौ, अश्विनी अर्बट, शुभदा गणोरकर हे सर्व कार्यक्रमाला हजर होते.

## गौरवशाली महाराष्ट्र महोत्सव २०२५

### राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी महाराष्ट्र प्रदेशचे आयोजन

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावती, दि. २७ :** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित दादा पवार व महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष सुनीलजी तटकरे साहेब यांच्या संकल्पनेतून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी महाराष्ट्र प्रदेश द्वारा गौरवशाली महाराष्ट्र महोत्सव २०२५ या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. संयुक्त महाराष्ट्र चळवळीमध्ये शहीद झालेल्या वीरांची माहिती व महाराष्ट्राच्या संस्कृतीचे दर्शन नवीन पिढीला होण्याकरिता सदर महोत्सवाचे आयोजन करण्यात आलेले आहे. या महोत्सवामध्ये महाराष्ट्रातील विविध भागातील धार्मिक संस्कृती, विविध विभागातील कला, लोकसंस्कृती तथा खाद्य संस्कृती इत्यादी कार्यक्रमाचे सादरीकरण चार दिवस मुंबई येथे होणार आहे. या गौरवशाली महाराष्ट्र महोत्सवा करिता संपूर्ण महाराष्ट्रातून रथयात्रा काढण्यात येणार आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक विभागातील धार्मिक स्थळे, पुरातन गडकिल्ले, थोर पुरुषांचे जन्मस्थळ व कार्यस्थळ येथून पवित्र माती व महाराष्ट्रातील नद्यांचे जल कलशामध्ये संग्रहित करून त्याचे पूजन या महोत्सवामध्ये करण्यात येणार आहे. याकरिता अमरावती विभागातील सुरुवात दि. २८/०४/२०२५ ला गाविलगड किल्ला चिखलदरा येथून होणार आहे. त्यानंतर जैन धर्मियांचे श्रद्धास्थान मुक्तागिरी, श्री संत गुलाबराव महाराजांचे जन्मगाव माधान, महानुभाव पंथीयांची काशी रिद्धपूर, श्री संत गाडगे महाराजांचे निर्वाण स्थळ वलगाव व विदर्भ कन्या रुक्मिणीची माहेर कौंडण्यपूर येथून पवित्र माती एकत्रित करण्यात येणार आहे. शहानुर, तापी व वर्धा नदीचे जल सुद्धा कलशामध्ये संग्रहित येणार आहे. याकरिता राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अमरावती जिल्हा ग्रामीणचे वतीने आयोजन करण्यात आलेले आहे. दिनांक २९/०४/२०२५ ला सकाळी नऊ वाजता राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे गुरुकुंज मोझरी येथून यात्रेस शुभारंभ होणार आहे. त्यानंतर संत गाडगे महाराज समाधी स्थळ गाडगे नगर येथे दर्शन घेऊन भारताचे माजी कृषिमंत्री तथा शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव देशमुख यांचे जन्मगावी पापड वाढोणा येथून सदर कलश घेऊन रथयात्रा पुढील मार्गक्रमण करणार आहे.

## छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**पापळ, दि. २७ :** तहसील कार्यालय नांदगाव खंडेश्वर च्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज महाराजास्व समाधान शिबिर अभियान नुकतेच एडिटोरियम हॉल पापळ येथे आयोजित करण्यात आले होते. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रभारी तहसीलदार संजय भास्करवार नायब तहसीलदार गुलाब मुजमुले पुरवठा निरीक्षक कु शितल राठोड उपस्थित होते तर प्रमुख पाहुणे म्हणून पापड येथील सरपंच उज्वला इंगळे माजी उपसरपंच वाल्मीक इंगळे पोलीस पाटील स्वाती ओंबासे ग्राप सदस्य विजय अजबले, देविदास खिराडे उपस्थित होते. या प्रसंगी सर्वप्रथम शिक्षण महर्षी डॉ पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या प्रतिमेचे पूजन व हारारपण करून तसेच मान्यवराचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करून या कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. अभियान यशस्वी करण्याकरता पापळ मंडळ अधिकारी नंदा साबळे, ग्राम महसूल अधिकारी सचिन कलोरे, सचिन वाघ, संदीप सुरजुसे, सुभाष थोरात स्वाती अंभोरे महसूल सेवक पंकज काळे ओंकार मनोहर प्रदीप बरडे आशिष ढोमणे तसेच आरोग्य सेवक परिसरातील महिला पुरुष मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे संचालन नंदा साबळे यांनी केले तर आभार सचिन कलोरे यांनी मानले.


## सातत्य, सकारात्मक विचार, प्रसन्नता हीच त्रिसुत्री आ. रवी भाऊंच्या यशाचे गमक




पहलगाम येथे मृत्युमुखी पडलेल्यांना श्रद्धांजली व स्मरणार्थ निःशुल्क महाआरोग्य रोगनिदान शिबिर व सर्व श्रेष्ठ दान रक्तदान शिबिर आयोजित करून आ. रवी राणा यांचा दि.२८/०४/२५ रोजी वाढदिवसा निमित्ताने... ना हार ना पुष्प गुच्छ देशधर्म प्रति कर्तव्याचे भान... सामाजिक दायित्वाची जाण ठेवणारे आमदार रवि राणा हे देशधर्म रक्षणासाठी सदैव तत्पर असतात अश्यासाठी त्यांची प्राथमिकता असते त्यांचे सुचणेवरून युवा स्वाभिमान पार्टीचे व भाजप यांच्या संयुक्त आयोजित पहलगाम येथे दहशतवादयांचें भ्याड हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांना राजापेठ चौकात या पूर्वीच श्रद्धांजली वाहिली यावेळी आ.रवी राणा यांच्या पत्नी नवनीत राणा व भाजपा व युवा स्वाभिमान पक्षाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उद्या ही दि.२८/०४/२५ रोजी संत ज्ञानेश्वर संस्कृतीत भवन मोर्शी रोड अमरावती येथे आयोजित सामाजिक दायित्वाची जाण ठेवणारे आमदार रवी हे प्रथमतः श्रद्धांजली अर्पण करून तसेच जखमी नागरिक लवकर बरे होण्यासाठी ईश्वर चरणी प्रार्थना करणार आहेत.तसेच सर्व श्रेष्ठ दान रक्तदान सामूहिक रक्तदान शिबिर घेऊन त्या रक्ताचा उपयोग तातडीने गरजू रूग्ण रक्षणासाठी दानरक्त बॉटल हॉस्पिटल मध्ये उपलब्ध करून देणार आहेतः तसेच निःशुल्क महाआरोग्य रोगनिदान शिबिर आयोजित केले आहे.असे त्यांचे वाढदिवसाचे नियोजन आहेः विशेषता या दिवशी फुल गुच्छ स्वीकारनार नाहीं.असा हा त्यांचा वाढदिवस सामाजिक दायित्वाची जाण ठेवणारा. देश धर्म सर्वात अगोदर असा विचार घेऊन असणार.

आमदार रवी राणा यांच्या कडे कधीही पेन, डायरी कधीचं नसते त्यांचें नियोजन म्हणजे अलिखितच'' मात्र त्यांचे लोक सेवाभक्ती कार्य चोवीस बाय सात असेच आहेः (२४/७) त्यांची तल्लख बुद्धी मुळे कोणतीही जुनी गोष्ट त्यांना आठवते. त्यांचे दिमतीला त्यांचे कुटुंबीय सदस्य तेवढ्याच प्रेमाने त्यांना साथ देऊन आलेल्या लोकांची आस्थेने विचारपूस करत असतात.सोबत च युवा स्वाभिमान पार्टी पदाधिकारी. कार्यालयीन स्टॉप आहेच.

आ.रवी राणा यांचे अलिखीत नियोजन म्हणजे आधुनिक काळातील चमत्कारिक राजकीय गणितच. कोनत्या ठिकाणीं किती वावं आहे.या बाबतचे तर्कज्ञानाचे जाणकार.आ. रवी राणा आहेतः ते अजब रसायन आहे त्यांना कोनत्या गोष्टी कुठे सूरू करायची व कुठे संपवांयची त्या पासुन काय प्राप्त होईल हे त्यांचे त्यांना चं माहिती असते.''मन करा रे प्रसन्न सर्व सिद्धीचे कारण'' या उक्ती प्रमाणे आ. रवी राणा हे नेहमीचं प्रसन्न असतात. ते त्यांच्या कडे येणाऱ्या लोकांना मध्ये मिसळून आपलेसे करतात असे वाटते की त्यांच्या कुटुंबातील सदस्य त्यांच्याशी प्रसन्ननतेने त्यांचे दुःख कमी करण्याचा त्यांचे समस्या सोडविणेबाबत प्रयत्न करत आहेत. अगदी आनंदाने, आस्थेने विचारपूस केली जाते त्याचे अडचणी सोडविण्यासाठी राज्याच्या आदरणीय मुख्यमंत्री यांचे पासून ते मंत्री, सनदी अधिकारी मंत्रालयीन सचिव ते जिल्हाधिकारी यांच्या पासून ते अगदी खालचे कर्मचारी घटक यांच्या सोबत संपर्क साधून आ.राणा प्रशासकिय काम करत असतात मात्र प्रसन्नता तीच कुठेच कुणाचा अनादर नाहीं. ज्या द्वारे आलेल्या लोकांचे काम होऊन त्यांचे चेहऱ्यावरील प्रसन्नता पाहून आमदार त्यांना दिलेल्या मतदानाची सेवा पावती समजतात. हाच सेवा नियम त्यांचे कडे काम घेऊन आलेल्या कष्टकरी, शेतकरी. शेतमजूर, व्यापारी वर्ग, अधिकारी, विद्यार्थी. म्हातारे यांनाही तशीच वागणूक देऊन त्यांची भिती कमी करून त्यांचेत सकारात्मकता निर्माण करून प्रोत्साहन देण्याचे काम राणा करतात त्या साठी दैनदीन कामात ते व्यस्त असतात. पाहू, ठेऊ.बघू, उद्या बघू.करावे लागेल असे वेळ मारून नेणारे शब्द त्यांचे डायरीत नाहीत.लोकांचे सेवा कार्य करण्यात त्यांचे समाधान् आनंदात आ.राणा देव पाहतात. सुखाचे, आनंदाचे माप मोजणे प्रत्येक व्यक्तीचे विचारसरणीवर अवलंबून आहे कोण कोणत्या नजरेने त्यांच्याकडे बघतो तो तो त्यांचा विचार आहे. मात्र ते सर्व सामान्याचे चाहते आहेत. लोकांनसाठी, विकासकार्यासाठी एवढं स्वतःला झोकून द्यावं की स्वतःच्या प्रकृतीकडे ही लक्ष देऊ नये अशी त्यांची ख्याती एकचित्त होऊन दैनंदिन लोकाभिमुख कामे करीत असतात. त्यामध्ये त्यांच्या प्रकृतीवर विपरीत परिणाम होतच असते त्र ते कधी जाहीर करीत नाही.''विधीमंडळ अध्यक्ष आश्वासन समितीच्या द्वारे''राज्यातील, मंत्रालयीन, अधिकारी वर्ग, सर्व सामान्य जनता यांना न्याय देण्याचे पवित्र विधायक कार्य आ. राणा आता करणार आहेत.

राजकीय क्षेत्रात कार्यरत असुनही ना धर्म ना पंथ, ना प्रांत सर्वांना सन्मानाची वागणूक. सर्वसामान्य लोकांचे लोकाभिमुख विषय असो ज्यांची कोणतीही ओळख नाही, वशिला नाही, अशा लोकांची विषय, मुद्दे ला विधानसभा सभागृहात, शासनाकडे बैठकी लावून पत्र लिहून वाचा फोडण्याचे काम आ. राणा हे सातत्याने करतात. आता त्यांना वरील समितीचे माध्यमातून अधिकार मिळाले आहेत.कोशिश करणे वालो की हार नहीं होती! पंख होणे से कुछ नहीं होता! होसलो से उडान होती है!

असा आमदार रवी राणा यांची काम करण्याची अलग शैली आहे. सर्व व्यासंगी विकासाचे महामेरू आमदार रवी राणा यांचा दिनांक २८ एप्रिल २०२५रोजी वाढदिवस आहे.वाढदिवस म्हणजे एक नवी सुरवात.आपल्या जिवलगांना एकमेकांशी घट्ट बांधणारा हा दिवस. आयुष्यातील आजवर मिळवलेले यश. आपले कर्तृत्व आणि बुद्धीमतेच्या बळावर समाजकार्य घडावे आणि राष्ट्र हितासाठी आपले भरीव योगदान लाभावे. आपली साथ माझ्यासाठी नेहमीच माझ्यासाठी व आपल्यावर स्नेह.प्रेम करणारे इतरांसाठी आवश्यक आहे.आपला पुढील काळही यशस्वी, आनंदित जावो.या वाढदिवस निमित्ताने मी उमेश ढोणे महासचिव, ३३- अण्यायग्रस्त जमाती, म. कृ. समिती, महाराष्ट्र राज्य, मी त्यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा देतो.त्यांची प्रकृती सुदृढ राहो. त्यांच्याकडून लोकांचे अधिका अधिक लोकाभिमुख कामे होवो देवाचे चरणी प्रार्थना करतो.



**उमेश म. ढोणे,**
महासचिव-म. कृती समिती महाराष्ट्र राज्य.

## घटना-घडामोडी



### जय विजय गणेशोत्सव मंडळातर्फे निशुल्क उन्हाळी शिबिर

**यवतमाळ :** येथील जय विजय गणेशोत्सव मंडळ व श्री सिद्धिविनायक गणपती मंदिरातर्फे ५ ते १४ वयोगटातील मुलांसाठी निशुल्क उन्हाळी शिबिराचे (२५ एप्रिल ते ५ मे) आयोजन करण्यात आले आहे. दररोज सायंकाळी ६ ते ८ या वेळेत हे शिबिर होईल. गेल्या १० वर्षांपासून हा उपक्रम सुरू आहे. मुलांच्या बौद्धिक, सर्जनशील, सामाजिक क्षमता विकासासाठी यात प्रश्नमंजुषा, चित्रकला, नृत्य (मार्गदर्शक: विजय बांडे), वादविवाद, 'छावा' चित्रपट प्रदर्शन आदी उपक्रम होतील. शिबिरार्थींना शालेय साहित्यही दिले जाईल. यशस्वीतेसाठी मंडळाचे अध्यक्ष सुजित राय, संजय सांबजवार, ह्रितीक पाटील (अ इ ऊ डान्स ग्रुप), सागर कुमरे, रोहन यादव, रोशनी राय, सौरभ बानोरे, आशिष पाचकवडे आदी कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत.




### पांढरकवड्यात पहलगाम हल्ल्याचा निषेध

**पांढरकवडा :** जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ युवा टायगर फोर्स व सर्वपक्षीय संघटनांनी शनिवारी (दि. २६) पुकारलेल्या पांढरकवडा बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी निषेध मोर्चाही काढण्यात आला. शहरातील सर्व व्यवहार बंद होते. डॉ. आंबेडकर चौकातून निघालेला निषेध मोर्चा तहसील कार्यालयावर धडकला, तेथे सभेत रुपांतर झाले. आमदार राजू तोडसाम, मदन जिट्टेवार, शंकर बडे, साजिद शरीफ यांनी हल्ल्याचा निषेध केला. हल्लेखोरांवर कठोर कारवाईच्या मागणीचे निवेदन नायब तहसीलदारांना देण्यात आले. आंबेडकर चौकात मृतांना श्रद्धांजली वाहिली. अंकित नैताम यांनी संचालन, रितेश परचाके यांनी प्रास्ताविक केले.



### संत गोरोबा काका यांची पुण्यतिथी

**महागाव :** येथील ग्रामपंचायतमध्ये संत शिरोमणी गोरोबा काका यांची ७०८ वी पुण्यतिथी शनिवारी (दि. २६) उत्साहात साजरी करण्यात आली. संत शिरोमणी चौकात त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी माजी सरपंच डॉ. वसंतराव जामकर यांनी संत गोरोबा काकांचे वारकरी संप्रदायातील महत्व व कार्यावर विचार मांडले. कार्यक्रमास जि. प. सदस्य साहेबराव पाटील कदम, सरपंच मेघा बोरुळकर, उपसरपंच शरद कदम पाटील, ग्रा. पं. सदस्य राजू धोतरकर, माजी सरपंच प्रवीण जामकर, डॉ. वसंतराव जामकर, विलास मंदाडे, रत्नाकर जामकर, सुधाकर जामकर, शिरीष बोरुळकर, राजू जामकर, अनंता जामकर, विष्णुपंत जामकर, मदन जामकर, मुकिंदा जामकर, अमोल जामकर, पंकज पहुरकर, गजेंद्र जामकर, श्रीकांत जामकर, कुंभार समाज बांधव व गावकरी उपस्थित होते.



### यवतमाळात चार्टर-डे उत्साहात साजरा

**यवतमाळ :** येथील लायनेस क्लबचा चार्टर-डे नुकताच लि. शिवानी पालडीवाल यांच्या निवासस्थानी उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी केक कापण्यात आला व सेवा उपक्रम राबविण्यात आले. कार्यक्रमात विद्यार्थिनींना लेटर बूक व शालेय साहित्याचे वितरण करण्यात आले. लकी लेडी म्हणून लि. कविता कोठारी यांची निवड झाली. त्यांनीच सूत्रसंचालन केले. अध्यक्ष लि. काजल जयपुरीया, सचिव लि. शानू राठोड, माजी प्रांताध्यक्ष लि. शोभा गट्टाणी, लि. नीलिमा मंत्री, लि. पुष्पा पालडीवाल मंचावर उपस्थित होत्या. लि. नीलू मुंदडा, सविता अग्रवाल, रुपाली निमकर, रुपाली बल्की, अरुणा खोरिया, दीपा गुप्ता, सुजया बिजवे, विना देशपांडे, प्रांजली ढुमे आदी सदस्यांनी आनंदपूर्वक सहभाग घेतला.

## निधन वार्ता

### प्रल्हाद खंडारे



**पुसद :** येथील पंचायत समितीचे कर्तव्यदक्ष विस्तार अधिकारी प्रल्हाद दत्ता खंडारे यांचे रविवारी (दि. २७) सकाळी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. खंडारे हे त्यांच्या मनमिळाऊ स्वभावासाठी परिचित होते. त्यांची मुलगी मोहिनी या नुकत्याच आयएएस अधिकारी म्हणून निवडल्या गेल्या आहेत. खंडारे यांच्या पार्थिवावर सायंकाळी ४.३० वाजता पुसद येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे खंडारे परिवार आहे.

# स्मशानभूमिसाठी मोहावासी आक्रमक

## 'स्मशानभूमी हक्काची, नाही कुणाच्या बापाची, तहसीलवर एल्गार, भर उन्हात साखळी उपोषण सुरू

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**पुसद, दि.२७ :** 'आमची स्मशानभूमी आमच्या हक्काची आहे, ती कुणाच्या बापाची नाही,' अशा घोषणा देत तालुक्यातील मौजे मोहा (ई) येथील संतप्त गावकऱ्यांनी आणि महिलांनी पुसद तहसील कार्यालयासमोर बेमुदत साखळी उपोषणाला सुरुवात केली आहे. गावाच्या पारंपरिक स्मशानभूमीवर काही शेतकऱ्यांनी अतिक्रमण केल्याचा आरोप करत, प्रशासनाने तत्काळ कारवाई करून जागा परत मिळवून द्यावी, या मागणीसाठी हा लढा उभारण्यात आला आहे.

शुक्रवार, दि. २५ एप्रिल रोजी सकाळपासूनच मोहा येथील ग्रामस्थ तहसील कार्यालयासमोर जमा झाले आणि त्यांनी शासकीय कार्यालयीन वेळेत भर उन्हात साखळी उपोषणाचा पवित्रा घेतला. गावकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, त्यांची पूर्वापार चालत आलेली, दफनविधीसाठी वापरात असलेली स्मशानभूमीची जागा काही शेतकऱ्यांनी स्वतःच्या फायद्यासाठी हडप केली असून, त्यावर ते शेती करत आहेत.



या विरोधात ग्रामस्थांनी अनेक वेळा प्रशासनाकडे तक्रारी दाखल केल्या, मात्र कोणतीही चौकशी किंवा कारवाई अद्याप झालेली नाही. प्रशासनाच्या या उदासीन धोरणामुळे आणि दिरंगाईमुळे स्मशानभूमीचा प्रश्न थंडबस्त्यात पडून आहे. ग्रामपंचायतही या गंभीर प्रकाराकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप गावकऱ्यांनी केला आहे. जेव्हा शासकीय यंत्रणा जागेची मोजणी करण्यासाठी येते, तेव्हा अतिक्रमण करणारे शेतकरी वाद घालून आणि कथितपणे धमक्या देऊन अधिकाऱ्यांना मोजणी करू देत नाहीत, असेही गावकऱ्यांचे म्हणणे आहे. या त्रासाला कंटाळून आणि न्याय मिळत नसल्याने अखेर उपोषणाचे हत्यार उपसावे लागले, असे आंदोलकांनी सांगितले. जोपर्यंत स्मशानभूमीची जागा अतिक्रमणमुक्त करून गावकऱ्यांच्या ताब्यात दिली जात नाही, तोपर्यंत हे साखळी उपोषण सुरूच राहील, असा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे. प्रशासनाने वेळीच योग्य कारवाई न केल्यास बेमुदत उपोषण करण्याचा इशाराही गावकऱ्यांनी दिला आहे.

### स्मशानभूमीवर शेतकऱ्यांचे अतिक्रमण; प्रशासन मात्र सुस्त!

**मौजे मोहा येथील पारंपरिक स्मशानभूमीवर काही शेतकऱ्यांनी अतिक्रमण करून ती जागा शेतीसाठी वापरायला सुरुवात केली आहे. गावकऱ्यांनी वारंवार तक्रारी करूनही प्रशासन आणि ग्रामपंचायत याकडे दुर्लक्ष करत आहे. चौकशीची मागणी थंड बस्त्यात आहे. इतकेच नव्हे, तर जागेची मोजणी करण्यासाठी येणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांनाही अतिक्रमण करणारे शेतकरी कथितपणे धमकावून, वाद घालून परत पाठवत आहेत. प्रशासकीय उदासीनतेमुळे हा प्रश्न चिघळला आहे.**

# प्रताप विद्यालयात महिला पालकांची सभा

## विद्यार्थिनींच्या समस्यांवर मंथन, सुरक्षेसह विविध अडचणींवर चर्चा

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**बाभूळगाव, दि. २७ :** येथील स्थानिक प्रताप विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात तालुक्यातील ४८ गावांमधील विद्यार्थिनींच्या महिला पालकांची विशेष सभा नुकतीच आयोजित करण्यात आली होती. या सभेत प्रामुख्याने विद्यार्थिनींना शिक्षण घेताना, प्रवास करताना किंवा इतर बाबतीत येणाऱ्या विविध अडचणी आणि त्यावरील संभाव्य उपाययोजना यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. मुलींच्या सुरक्षेच्या दृष्टीने शिक्षक आणि पालकांनी त्यांना नेहमी मार्गदर्शन करणे आवश्यक असल्याचे मत संस्थेचे सचिव जयंतराव घोंगे यांनी यावेळी व्यक्त केले.

प्रताप विद्यालयात परिसरातील ४८ गावांमधून मुली शिक्षणासाठी येतात. त्यांना अभ्यासाव्यतिरिक्त



येण्या-जाण्याच्या सोयी आणि इतर अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. सभेच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष सुभाषराव घोडे होते. यावेळी गोपाळराव खडसे, सचिव जयंतराव घोंगे, प्रकाशचंद छाजेड, भरत इंगोले, राजेंद्र इंगोले, शशिकांत कापसे, मुख्याध्यापिका स्वाती घोडे, महिला पालक प्रतिनिधी रोशनी मांडवगडे, भारती शिंदे, उपमुख्याध्यापक उमाकांत राठोड, पर्यवेक्षक मनोज नगराळे यांची प्रमुख उपस्थिती होती. शशिकांत कापसे यांनी विद्यार्थिनींच्या शिस्तीच्या महत्वावर भर दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन देवेंद्र आत्राम यांनी केले, तर आभार पर्यवेक्षक मनोज नगराळे यांनी मानले. या सभेचे एक महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे, उपस्थित ४८ गावांतील महिला पालकांची मिळून एक व्यवस्थापन समिती स्थापन करण्यात आली. कार्यक्रमानंतर सर्व महिला पालकांनी स्नेहभोजनाचा आस्वाद घेतला आणि विद्यालयाच्या एकूण कामकाजाबद्दल समाधान व्यक्त केले. सभेला शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारीही उपस्थित होते.

### आजपासून पारधी समाजाचे उपोषण

**वणी, दि. २७ :** मेंढोली येथील पारधी समाजाच्या विविध मागण्यांसाठी सोमवारपासून मेंढोली ग्रामपंचायतीसमोर उपोषण करण्यात येणार आहे. मेंढोली येथे पारधी समाजाचे २३ कुटुंब आहेत. या प्रत्येक कुटुंबाला भुखंडाचे वाटप करून गाव नमुना आठ-अ देण्यात यावा, मेंढोली ग्रामपंचायती अंतर्गत घरकूल प्रतीक्षा यादीत या कुटुंबांचे नाव समाविष्ट करण्यात यावे, जागेचे पट्टे तात्काळ नियमानुकूल करून देण्यात यावे, पाच महिन्यांपूर्वी रेशन कार्डासाठी दिलेले अर्ज निकाली काढून रेशन कार्ड द्यावे, या मागणीसाठी हे उपोषण करण्यात येणार आहे. यासंदर्भात प्रकाश केशव भोसले यांच्यासह २३ कुटुंबातील सदस्यांनी मेंढोलीचे सरपंच तथा सचिवांना निवेदन दिले आहे.

# आयटातर्फे पाच दिवसीय शैक्षणिक शिबिराचे आयोजन



**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**उमरखेड, दि. २७ :** येथील नगर परिषद उर्दू हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात ऑल इंडिया आयडियल टीचर्स असोसिएशनतर्फे (आयटा) पाच दिवसीय (२५-३० एप्रिल) 'उन्हाळी शिक्षण शिबिर २०२५' चे शनिवारी (दि. २६ एप्रिल) उद्घाटन झाले.

आयेशा तजीन हिच्या कुराण पठणाने सुरुवात झाली. आयटा महाराष्ट्र अध्यक्ष मोहम्मद अतीक शेख यांनी उद्घाटन करून शिबिराचे महत्व व मूल्यशिक्षणाची गरज सांगितली. गिरीश कुमार यांनी करिअर मार्गदर्शन केले. यावेळी जिल्हाध्यक्ष अब्दुल समद, जिल्हा सचिव समीर अहमद, युनिट अध्यक्ष फीरोज आशा, पर्यवेक्षक सालेह जुनैद उपस्थित होते. अलहाज नासीर खान यांनी संचालन, तर काझी झहीरुद्दीन यांनी आभार मानले. शिबिराचा समारोप ३० एप्रिलला होईल.

# मांगलादेवी येथील शाळेचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश



**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**मांगलादेवी, दि. २७ :** येथील पीएमश्री जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक शाळेच्या २५ विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत यश मिळवले आहे. फेब्रुवारीमध्ये ही परीक्षा झाली होती.

या पात्र विद्यार्थ्यांमध्ये रुचिका उघडे, आरोही ढोमने, श्रेया उघडे, वेदांती मोने, आराध्या मोने, अंकिता बोबडे, श्रद्धा दाढे, रोहित जोल्हे, श्रेया मेश्राम, अथर्व घावडे आदींचा समावेश आहे. मुख्याध्यापक राजू विलायतकर, वर्गशिक्षक अंकुश ढबाले, प्रदीप नायकर, इतर शिक्षक, शाळा व्यवस्थापन समिती व पालकांच्या मार्गदर्शनामुळे हे यश मिळाले. विद्यार्थ्यांच्या सरावाचे व मार्गदर्शनाचे हे फळ असून, त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

### नागरिक तक्रार निवारण दिन

**यवतमाळ, दि. २७ :** महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित, जिल्हा कार्यालय यवतमाळ येथे नागरीकांच्या तक्रारींसाठी महीन्याच्या पहिल्या सोमवारी सकाळी ११ ते १२.३० व दुपारी १ ते २.३० वाजेपर्यंत लोकशाही दिनानिमित्त आयोजन करण्यात येत आहे. ज्या नागरीकांना त्यांच्या प्रलंबित कामाच्या तक्रारी मांडावयाच्या आहेत, त्यांनी तक्रार अर्जासह महामंडळाचे जिल्हा कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सामाजिक न्याय भवन, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादीत जिल्हा कार्यालय यवतमाळ येथे स्वतः उपस्थित राहावे, असे आवाहन महामंडळाच्या जिल्हा व्यवस्थापक माधुरी अवघाते यांनी केले आहे.

# पाच दिवसीय लघू गुरुकूल शिबिर उत्साहात

## विद्यार्थ्यांना मिळाले योगासन, प्राणायाम आणि वैदिक संस्कृतीचे धडे

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**महागाव, दि. २७ :** येथील एल. के. हायर सेकंडरी विद्यामंदिर येथे महर्षी दयानंद सरस्वती वैदिक संस्थानद्वारे संचालित, कान्हा आर्य गुरुकूल महाविद्यालयाचे आचार्य वेदप्रकाश ब्रम्ही यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित 'सनातन वैदिक गुरुकूल सांस्कृतिक पाठशाळा' या पंचदिवसीय निवासी लघू गुरुकूल शिबिराची नुकतीच उत्साहात सांगता झाली. (दि. २० एप्रिल ते २४ एप्रिल) २०२५ या कालावधीत हे शिबिर पार पडले.

या शिबिरात सहभागी शिबिरार्थी विद्यार्थ्यांना पाच दिवसांच्या निवासी व्यवस्थेत योगासन, प्राणायाम आणि वैदिक संस्कृत श्लोक यांचे प्रशिक्षण



देण्यात आले. शिबिराच्या समारोप कार्यक्रमाचे आयोजन एल. के. हायर सेकंडरी विद्यामंदिर येथे करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. वि. ना. कदम होते. प्रमुख पाहुणे म्हणून उद्योजक दिपक तेला, कवी रवी चव्हाण, सेवानिवृत्त विस्तार अधिकारी रवी पुजारी, राजेश कव्हाणे, नगरसेवक शैलेश कोपरकर, सतिष नरवाडे, संजय कोपरकर आदी मान्यवर उपस्थित होते. या शिबिराच्या यशस्वीतेसाठी संस्थेचे अध्यक्ष गोविंदराव तास्के, विवेक तास्के, आदिती विवेक तास्के, बेगाजीराव चिलकर, प्राचार्य रवी भोणे तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक वृंद, ज्यात दिग्गल, इंगोले, राठोड, उंचेगांवकर, बनसोड, वाघमारे, खडसे, रंधे, शिरगिरे, कलाने, साळवे, पोहाणे, गोरे, ठकरे, सुर्यवंशी, राऊत, अजय पिंगाणे, खंदारे, शिरडकर, पानपट्टे आदींसह शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मोलाचे परिश्रम घेतले.

# उमरखेड तालुक्यातील ग्रामीण आरोग्यसेवा रामभरोसे


## प्राथमिक आरोग्य केंद्रांची दुरवस्था, रुग्णांची हेळसांड, उपसंचालकांनी लक्ष देण्याची मागणी

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**✦ संभाजी भोयर**

**उमरखेड, दि. २७ :** शासनाकडून कोट्यवधी रुपये खर्चून ग्रामीण भागात उभारलेली आरोग्य यंत्रणा तालुक्यात सपशेल अपयशी ठरल्याचे भीषण वास्तव समोर आले आहे. वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचारी कर्तव्य सोडून गायब राहत असल्याने किंवा खासगी प्रॅक्टिसमध्ये व्यस्त असल्याने, ऐन आजारपणात गरीब रुग्णांना महागड्या खासगी दवाखान्यांचा रस्ता धरावा लागत आहे.

शासनाने ग्रामीण भागातील सामान्य व गरजू लोकांना सहज आणि मोफत आरोग्यसेवा मिळावी,




यासाठी उमरखेड तालुक्यात मुळावा, विडूळ, ढाणकी, ब्राह्मणगाव, सोनदाभी, थेरडी आणि कोरटा येथे सात प्राथमिक आरोग्य केंद्रे (पीएचसी) उभारली आहेत. या केंद्रांवर उच्चशिक्षित आणि तज्ज्ञ डॉक्टरांच्या नियुक्त्या केल्या असून, त्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या निवासासाठी सुसज्ज निवासस्थानेही बांधली आहेत. मात्र, शहरी भागात राहण्याची सवय लागलेले डॉक्टर आणि कर्मचारी या निवासस्थानांकडे ढुंकूनही पाहत नाहीत, त्यामुळे ती ओस पडली आहेत. हीच गंभीर परिस्थिती तालुक्यातील आरोग्य उपकेंद्रांची आहे. तेथे कार्यरत समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांचे (सीएचओ) दर्शनही लोकांना दुर्लभ झाले आहे. अनेक पीएचसीमधील वैद्यकीय अधिकारी हे केंद्रावर हजर न राहता खासगी प्रॅक्टिसमध्ये व्यस्त असल्याचा आरोप होत आहे. यामुळे इतर कर्मचाऱ्यांचेही फावत असून, मनमानी कारभार वाढला आहे. सध्या वाढत्या तापमानामुळे उष्माघातासह विविध साथीचे आजार डोके वर काढत आहेत. अशा परिस्थितीत सरकारी आरोग्य व्यवस्थेकडून मदतीची अपेक्षा असताना, तेथील बेफिकीरीमुळे त्रस्त झालेल्या गरीब रुग्णांना ऐपत नसतानाही खासगी दवाखान्यांचे उंबरे झिजवावे लागत आहेत. या सर्व अनागोंदीवर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी असलेल्या तालुका आरोग्य अधिकाऱ्यांच्या कार्यक्षमतेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या गंभीर परिस्थितीची आरोग्य उपसंचालकांनी तातडीने दखल घेऊन चौकशी करावी आणि ग्रामीण आरोग्य व्यवस्थेला शिस्त लावावी, अशी जोरदार मागणी नागरिकांमधून होत आहे.

### सरकारी डॉक्टर खासगी सेवेत?

**अनेक प्राथमिक आरोग्य केंद्रांतील वैद्यकीय अधिकारी मुख्यालयी थांबण्याऐवजी किंवा वेळेवर हजर न राहता खासगी प्रॅक्टिसमध्ये अधिक लक्ष देतात, असा आरोप आहे. त्यांच्या अनुपस्थितीमुळे इतर कर्मचारीही मनमानी करतात. यावर तालुका आरोग्य अधिकाऱ्यांचेही कोणतेही नियंत्रण दिसत नाही. त्यामुळे सरकारी रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या गरीब रुग्णांना नाईलाजाने खासगी दवाखान्यात जाऊन आर्थिक भुर्दंड सहन करावा लागतो, ही मोठी शोकांतिका आहे.**

# सामोपचाराने तोडगा काढा

## पालकमंत्री संजय राठोड: वर्धा-नांदेड रेल्वे मार्गाच्या अडचणींबाबत बैठक

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि.२७:** 'वर्धा-यवतमाळ-नांदेड'हा रेल्वे प्रकल्प जिल्ह्याच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण आहे, मात्र यातील कामांमुळे बाधित होणाऱ्या गावांमधील नागरिकांच्या अडचणी प्राधान्याने सोडवल्या पाहिजेत. रेल्वे विभागाने उड्डाणपूल, अंडरपास आणि वळणरस्त्यांबाबत स्थानिकांना विश्वासात घेऊन समाधानकारक तोडगा काढावा,' असे स्पष्ट निर्देश पालकमंत्री संजय राठोड यांनी दिले.

येथील महसूल भवनात रेल्वे प्रकल्पातील स्थानिक नागरिकांच्या अडचणींसंदर्भात पालकमंत्री संजय राठोड यांनी रेल्वे आणि संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांची तातडीची बैठक घेतली. यावेळी आमदार बाळासाहेब मांगुळकर, आमदार संजय देरकर, जिल्हाधिकारी विकास मीना, जिल्हा पोलिस अधीक्षक कुमार चिंता, निवासी उपजिल्हाधिकारी सुदर्शन गायकवाड यांच्यासह रेल्वे विभागाचे अधिकारी आणि बाधित गावांतील ग्रामस्थ उपस्थित होते. बैठकीत दिग्रस तालुक्यातील साखरा ते रामगाव दरम्यान अस्तित्वातील रस्त्यावर उड्डाणपुलाऐवजी लांबचा वळणरस्ता आणि रेल्वेखालून अंडरपास प्रस्तावित असल्याचा मुद्दा उपस्थित झाला. गावकऱ्यांनी मात्र जुन्याच मार्गावर उड्डाणपूल देण्याची मागणी केली. तसेच, दारव्हा तालुक्यातील अंतरगाव येथेही वळण रस्ता व अंडरपासऐवजी उड्डाणपूलच हवा, असे स्थानिकांचे म्हणणे असल्याचे समोर आले. दिग्रस तालुक्यातील नांदगव्हाण, डोल्हारी, सिंधी येथील नागरिकांच्या समस्यांवरही समाधानकारक तोडगा काढण्यास पालकमंत्र्यांनी सांगितले. 'ज्या ठिकाणी लोकांच्या तक्रारी आहेत, तेथे महसूल, वन, भूमी अभिलेख आणि रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी संयुक्त पाहणी करावी, लोकांशी संवाद साधावा आणि त्यांच्या सोईनुसार मार्ग काढावा,' अशा सूचना राठोड यांनी दिल्या. लोकांच्या अडचणी समजून घेऊनच प्रकल्पाचे काम पुढे नेले जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.



### शेतकऱ्यांच्या जमिनीचा मोबदला वन विभागाला

दिग्रस तालुक्यातील सेवानगर येथील शेतकऱ्यांच्या जमिनीचा मोबदला वन विभागास देण्यात आला. वास्तविक ती जमीन शेतकऱ्यांची आहे. चौकशीअंती जमीन शेतकऱ्यांचीच असल्याचे सिद्ध झाल्याने या जमिनींचा मोबदला शेतकऱ्यांना देण्याची कारवाई गतीने करण्याचे निर्देश पालकमंत्र्यांनी याप्रसंगी दिले.

# तालुक्यातील सुपीक जमिनी प्रकल्पांच्या घशात!

**जगाचा पोशिंदाच नाडवला जातोय | शेतकऱ्यांच्या आर्थिक शोषणाचा प्रश्न गंभीर | पिकविलेच नाही तर भविष्यात खाणार काय?**

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

✦ रवी काळे

लक्ष्यवेधी

भाग-२

### बेंबळाग्रस्तांचे झाले ते शेतकऱ्यांचे होऊ नये

- बेंबळा प्रकल्पासाठी तालुक्यातील हजारो एकर सुपीक शेतजमीन संपादित झाली, अनेक शेतकरी भूमिहीन झाले. प्रकल्पग्रस्तांचे शेती गेली, घर गेले आणि रोजगारही गेला. ज्यांनी दुसरीकडे जमीन घेतली त्यांचे चांगभले झाले परंतु मिळालेल्या तुटपुंज्या रकमेतून जे शेती घेऊ शकले नाही ते आज देशोधडीला लागले. आता त्यांना भविष्याची चिंता सतावत आहे.

### शेती तोट्यात, शेतकरी निराशेच्या गर्तेत!

- शेतीतील वाढलेला खर्च आणि शेतमालाला मिळणारा कवडीमोल भाव यामुळे पारंपरिक शेतकरी मेटाकुटीला आला आहे. उत्पादन खर्चही निघत नसल्याने शेती करणे तोट्याचे ठरत आहे. खरेदीदारच शेतमालाचे भाव ठरवत असल्याने शेतकऱ्यांची पिळवणूक होत आहे. या आर्थिक दुष्टचक्रामुळे शेती करण्याची मानसिकता खालावत असून, शेतकरी निराशेपोटी जमिनी विकत असल्याचे वास्तव आहे. शेतमालाच्या भावाबाबत ठोस धोरणात्मक बदलांची गरज आहे.

**बाभूळगाव, दि. २६ :** तालुक्यात सुपीक शेती विकायला काढली जात असल्याने भविष्यातील अन्नसुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण होणार आहे. सुपीक शेतीखालचे क्षेत्र घटत असल्याने चिंता वाढत आहे. यातून शेतकऱ्यांच्या आर्थिक शोषणाचा प्रश्नही गंभीर होत चालला आहे. सुपीक जमिनी व्यापाऱ्यांच्या, उद्योगपतींच्या घशात घालणे भविष्यासाठी फार चिंताजनक बाब असल्याचे शेतकरी सांगत आहेत.

शेती व्यवसाय हा दिवसेंदिवस अधिक जोखमीचा आणि कमी नफ्याचा ठरत असल्याने पारंपरिक शेतकऱ्यांची मानसिकता खालावत चालली आहे. शेतीसाठी लागणाऱ्या निविष्ठांचे भाव गगनाला भिडले आहेत, मात्र शेतमालाला मिळणारा भाव गेल्या दोन दशकांपासून 'जैसे थे'आहे. अनेकदा तर हमीभावापेक्षा कमी दराने माल विकावा लागतो. इतर वस्तूंचे भाव विक्रेते ठरवतात, पण शेतकऱ्यांच्या मालाचा भाव खरेदीदार ठरवतो, या व्यवस्थेत शेतकऱ्यांचे मोठे शोषण होते. वाढलेला खर्च आणि कमी उत्पन्न यामुळेशेतकरी कर्जाच्या खाईत लोटला जात आहे. या सर्व परिस्थितीला कंटाळून अनेक शेतकरी आपली वडिलोपार्जित सुपीक शेती विकायला काढत आहेत. सध्या तालुक्यात शेती विक्रीचे व्यवहार अचानक वाढल्याने अनेक शंका उपस्थित होत आहेत. सरकारचे धोरण सध्या सौर ऊर्जेला प्रोत्साहन देणारे आहे. अनेक ठिकाणी सौर ऊर्जा प्रकल्पासाठी शेतजमिनी खरेदी करण्यात येत आहे. कंपन्यांनी त्यासाठी दलाल नेमले आहेत. एकाच ठिकाणी असलेली शंभर, दोनशे, पाचशे किंवा हजार एकर जमिनीचा शोध घेऊन सदर जमिन कमी भावात खरेदी करून नंतर ती कंपनीला जादा दरात विकली जात आहे. खरडीची, बरड असलेली, डोंगराळ जमिन साडेचार पाच लाख रुपये एकराने तर, सुपीक जमीन १० ते १५ लाख रुपये किंवा रोडवरील असल्यास २० ते २५ लाख रुपये एकराने देखील विकली जात आहे. गेल्या दोन वर्षांपासून शेतीच्या विक्रीचे प्रमाण म्हणूनच वाढल्याचे दिसून येत आहे.

बाभूळगाव तालुक्यातही याच कारणासाठी जमिनी विकल्या जात असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. काही व्यापारी, उद्योजक या तालुक्यात शेती कमी भावात मिळत असल्याने घेऊन ठेवत आहेत. खरे तर, विकासाला किंवा सौर ऊर्जेला विरोध नाही, पण त्यासाठी सुपीक, लागवडीयोग्य जमीन वापरणे भविष्यासाठी अत्यंत धोकादायक आहे. देशाची लोकसंख्या दिवसागणिक वाढत आहे आणि शेतीचे क्षेत्र मात्र औद्योगिकीकरण, शहरीकरण (ले-आउट) आणि आता संभाव्य ऊर्जा प्रकल्पांमुळे कमी होत आहे. हे असेच चालू राहिले, तर भविष्यात अन्नधान्याचा मोठा तुटवडा निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही. आज जरी शेती विकून मोठा मोबदला मिळत असला, तरी येणाऱ्या काळात शेती करणारा खरा शेतकरीच शिल्लक राहणार नाही, तेव्हा सर्वांनाच याची मोठी किंमत चुकवावी लागेल, हे वेळीच लक्षात घेणे गरजेचे आहे.

## थोडक्यात

### फ्लॅट विकण्यावरून एकास शिवीगाळ

**यवतमाळ :** फ्लॅट विकण्याच्या कारणावरून वाद केल्याची घटना घडली. याप्रकरणी फ्लॅट विकण्याच्या कारणावरून लहान भावाने शिविगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली. वैâचीने भावाच्या पोटरीवर व पाठीवर मारून जखमी केले. ही घटना २६ एप्रिलला घडली. याप्रकरणी सुरज बळीराम चंदनगोळे (३७) यांच्या तक्रारीवरून सुशिल बळीराम चंदनगोळे विरूध्द गुन्हा नोंद केला.

### गुल्लकमधील रोख लांबविली

**यवतमाळ :** वाईहातोला येथे गुल्लकधील रोख लांबविल्याची घटना घडली. याप्रकरणी अज्ञात चोरट्याने उघड्या घरातील प्लॉस्टीकच्या व स्टीलच्या गुल्लकमध्ये लहहान मुलाने जमा केलेले ४०,००० रूपये चोरून नेले. ही घटना २४ ते २६ एप्रिलच्या दरम्यान घडली. याप्रकरणी मनोज हरीचंद राठोड यांच्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्याविरूध्द गुन्हा नोंद केला.

### अवैध रेतीची चोरटी वाहतूक

**बाभुळगाव :** अवैध रेतीची वाहतुक करतांना आढळुन आल्याने कारवाई करण्यात आली. याप्रकरणी लेलॅड वाहन क्र. एम.एच. २९ बीई ७४६७ मध्ये १ ब्रास रेती किंमत ६ हजाराची अवैधरित्या विनापरवाना वाहतुक करून चोरून घेवुन जात असतांना मिळून आल्याने रेती व वाहन जप्त करून कारवाई करण्यात आली. याप्रकरणी सरतर्पेâ पोशी २४९८ सागर पोस्टे बाभुळगाव यांच्या तक्रारीवरून राजु भगवान अतकारी विरूध्द गुन्हा नोंद केला.

### जुन्या भांडणावरून एकास मारहाण

**नेर :** जुन्या भांडणावरून मारहाण केल्याची घटना घडली. याप्रकरणी गैरकायद्याची मंडळी जमा करून जुन्या भांडणाच्या कारणावरून वाद करून शिविगाळ केली व लाठाकाठ्याने भरत जेता मंगुसींग पवार व जेता पवार यांना मारहाण करून जखमी केले. याप्रकरणी्ी प्रदुयंम जेता पवार यांच्या तक्रारीवरून अरविंद राठोड, नामदेव राठोड, रविंद्र चव्हाण, विशाल चव्हाण, मधुकर चव्हाण, हरीसींग राठोड विरूध्द गुन्हा नोंद केला.


# गोवंशाची अवैध वाहतूक करणारे वाहन जप्त

## वडकी पोलिसांची कारवाई, १२ गोवंशांची सुटका, २२ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी







**राळेगाव, दि.२७ :** नागपूरवरून तेलंगणा राज्यातील हैदराबाद येथे ट्रकमध्ये जनावरे कोंडून वाहतूक करणाऱ्या वाहनाला अडवून पोलिसांनी १४ गोवंशीय बैलाची सुटका केली. यात ट्रक जप्त करून वाहनचालकासह एका जणांविरुद्ध वडकी पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलिसांनी वडकी येथे रविवार, दि २७ एप्रिल रोजी दुपारी ३ च्या दरम्यान केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार नागपूरवरून हैदराबाद राष्ट्रीय महामार्गाने जनावरांची अवैध वाहतूक होत असल्याची गोपनिय माहिती वडकीचे ठाणेदार सुखदेव भोरकडे यांना मिळाली. या माहितीवरून पोलिसांनी वडकी येथील राष्ट्रीय महामार्गावर सापळा रचला. याच दरम्यान नागपूर येथून येणाऱ्या आयशर ट्रक (क्रमांक : एम. एच. ४०, सी. एम. ३२३०) या ट्रकची पोलिसांनी झडती घेतली असता त्यात १२ गोवंशीय बैल आढळून आले. याप्रकरणी पोलिसांनी आयशर ट्रक जप्त करून या कारवाईत जप्तीतील ट्रक किंमत २० लाख व १२ गोवंश बैल किंमत २ लाख ४० हजार रुपये, एकंदरीत २२ लाख ४० हजार किमतीचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. सदर कंटेनर जप्त करून यातील आरोपी आबिद नूर कुरेशी (२६) रा. नागपूर, जगदीश भीमराव लिंगायत (३७) रा. नागपूर यांना अटक करून त्यांच्याविरुद्ध महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम कलम ५,५ अ, ५ ब, प्राण्यांना क्रूरतेने वागविण्यास प्रतिबंध अधिनियम कलम ११ घ, ड तसेच महाराष्ट्र पोलिस अधिनियम कलम ११ अन्वये वडकी पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदरची कारवाई जिल्हा पोलिस अधीक्षक कुमार चिंता, अप्पर पोलिस अध्यक्ष पियुष जगताप व उपविभागीय पोलिस अधिकारी रामेश्वर वेंजने यांचे मार्गदर्शनात ठाणेदार सुखदेव भोरकडे, पोलिस उपनिरीक्षक प्रशांत जाधव, पोलिस कर्मचारी संदीप मडावी, दीपक वांड्रस्वार व विनोद नागरगोजे यांनी केली आहे.

# अवैध रेती वाहतुकीवर कारवाई

## एक ब्रास रेतीसह मालवाहू वाहन केले जप्त, वडकी पोलिसात गुन्हा

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी







**राळेगाव, दि.२७:** तालुक्यात रेती तस्करीला चाप लावण्यासाठी पोलिस प्रशासनाने धडाकेबाज मोहीम सुरू केली आहे. वडकी पोलिसांनी रेतीची अवैध वाहतूक करणाऱ्या एका मालवाहू मॅक्स पिकअप वाहनाला जप्त केले. मात्र, कारवाया सुरू असतानाही तस्करांचा उन्मत्तपणा कायम असल्याचे दिसून येते.

तालुक्यातील वडकी येथे रविवार, दि २७ एप्रिल रोजी दुपारी ३.३० वाजता रेतीची अवैध वाहतूक करणाऱ्या मॅक्स पिकअप वाहनावर कारवाई करण्यात आली. मॅक्स पिकअप चालकाकडे उपलब्ध रेती वाहतूक पासमधील माहिती आणि प्रत्यक्ष रेती टाकण्याच्या ठिकाणात विसंगती आढळल्याने ठाणेदार सुखदेव भोरकडे यांनी १ब्रास रेतीसह मालवाहू मॅक्स पिकअप (क्रमांक: एमएच ३६/एए २२८३) जप्त करून तो वडकी पोलिस ठाण्यात लावला. या कारवाईत पोलिसांनी १ ब्रास रेती किंमत ६हजार रुपये व मॅक्स पिकअप वाहन किंमत ५ लाख रुपये असा एकंदरीत ५ लाख ६ हजाराचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी संशयित आरोपी अविनाश हनुमान सराटे (वय ३६) याचेवर विविध कलमाखाली वडकी पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई ठाणेदार सुखदेव भोरकडे यांच्या मार्गदर्शनात बिट जमादार संदीप मडावी व विनोद नागरगोजे यांनी केली आहे.

### मंत्री अशोक उईके आज जिल्हा दौऱ्यावर



**यवतमाळ, दि.२७ :** राज्याचे आदिवासी विकास मंत्री प्रा. डॉ. अशोक उईके हे आज सोमवारी (दि. २८) जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. ते जिल्हाधिकारी कार्यालयात सकाळी १०.३० वाजता आयोजित आढावा बैठकीस उपस्थित राहणार आहेत. मंत्री प्रा.डॉ. अशोक उईके यांच्या उपस्थितीमुळे विविध प्रलंबित प्रश्नांवर सकारात्मक तोडगा निघण्याची आशा आहे. या आढावा बैठकीला जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, प्रकल्प अधिकारी व इतर संबंधित विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित राहतील.

# दिव्यांग बांधवांना साहित्याचे वितरण

## माजी नगराध्यक्ष अनिता नाईक यांचा वाढदिवस उत्साहात

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**पुसद, दि.२७ :** पुसदच्या माजी नगराध्यक्षा सौ. अनिता नाईक यांच्या वाढदिवसानिमित्त आज, रविवारी, दि. २७ एप्रिल रोजी गणोबा मंगल कार्यालयात दिव्यांग व वयोश्री योजनेचे साहित्य वाटप करण्यात आले. नाईक फाउंडेशन व आमदार इंद्रनील नाईक मित्र परिवारातर्फे हा कार्यक्रम पार पडला.

या शिबिरात लाखो रुपयांच्या आवश्यक साहित्याचे गरजू दिव्यांग आणि वयोश्री योजनेच्या लाभार्थ्यांना वाटप करण्यात आले. हे लाभार्थी यापूर्वी ना. इंद्रनील नाईक यांच्या वाढदिवसानिमित्त झालेल्या पूर्व तपासणी शिबिरात निवडले गेले होते. नाईक परिवाराचा, 'गरिबो का दाता' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या राज्याचे माजी मंत्री मनोहरराव नाईक यांचा सेवाव्रताचा वारसा ना. इंद्रनील नाईक आणि त्यांचे कुटुंबीय समर्थपणे पुढे चालवत आहेत. कार्यक्रमास ना. इंद्रनील नाईक, अनिता नाईक, मोहिनी नाईक व गणमान्य नागरिक उपस्थित होते. पहलगाम हल्ल्यातील मृतांना श्रद्धांजली वाहण्यात आली. सौ. मोहिनी नाईक यांनी मनोगत व्यक्त केले. दिव्यांग बांधवांना मदतीचा हात देण्याचे आवाहन ना. इंद्रनील नाईक यांनी केले. गुजरात येथे दिव्यांग अश्विनी केशव ढेपे हिने 'दिव्यांग ऑलिंपिक'मध्ये मिळवलेल्या यशाबद्दल तिचा ना. इंद्रनील नाईक यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. हे सेवाकार्य पुढील पाच वर्षे सुरू ठेवण्याचा मानस आयोजकांनी व्यक्त केला आहे.

# अरुणावतीचे पाणी दोन्ही कालव्यात सोडा!

## पालकमंत्री संजय राठोड यांचे निर्देश; डॉ. विष्णू उकंडे यांच्या मागणीला यश

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**आर्णी, दि.२७:** प्रचंड उन्हामुळे आर्णी, घाटंजी आणि दिग्रस तालुक्यात निर्माण झालेल्या भीषण पाणीटंचाईवर मात करण्यासाठी अरुणावती प्रकल्पाचे पाणी डाव्या आणि उजव्या कालव्यात तत्काळ सोडण्याची आग्रही मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ. विष्णू उकंडे यांनी जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांच्याकडे केली. पालकमंत्र्यांनी या मागणीची तत्काळ दखल घेत पाणी सोडण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत.

यंदाचा उन्हाळा अतिशय तीव्र आहे. अनेक गावांमध्ये पाण्याचे अक्षरशः दुर्भिक्ष आहे. पिण्याच्या पाण्याच्या विहिरींनी तळ गाठला असून, जनावरांनाही चारा आणि पाणी मिळेनासे झाले आहे. या गंभीर परिस्थितीमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. ही बाब लक्षात घेऊन डॉ. विष्णू उकंडे यांनी यवतमाळ येथील शासकीय विश्रामगृहात पालकमंत्री संजय राठोड यांची भेट घेतली व त्यांना निवेदन सादर केले. 'अरुणावती प्रकल्प हा या तिन्ही तालुक्यांसाठी संजीवनी ठरू शकतो, त्यामुळे प्रकल्पातील पाणी दोन्ही कालव्यामध्ये सोडल्यास हजारो नागरिकांना आणि जनावरांना मोठा दिलासा मिळेल,' ही बाब डॉ. उकंडे यांनी पालकमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिली. याप्रसंगी शिवसेना संपर्कप्रमुख हरिहर लिंगनवार, जिल्हाप्रमुख श्रीधर मोहोड, पराग पिंगळे, राजूदास जाधव, आर्णी तालुकाप्रमुख राजेंद्र जाधव, शहरप्रमुख श्याम ठाकरे, रवी राठोड आदी उपस्थित होते. पालकमंत्री संजय राठोड यांनी निवेदनाची आणि परिस्थितीची तत्काळ दखल घेतली. त्यांनी तातडीने अरुणावती प्रकल्पाच्या संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधून डाव्या व उजव्या कालव्यात पाणी सोडण्याचे सक्त निर्देश दिले. पालकमंत्र्यांच्या या त्वरित कार्यवाहीमुळे पाणीटंचाईने होरपळणाऱ्या आर्णी, घाटंजी आणि दिग्रस तालुक्यातील जनतेला मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे. एका संवेदनशील मागणीवर प्रशासनाने दाखवलेल्या तत्परतेचे समाधान व्यक्त होत आहे. कालव्यात पाणी आल्यानंतर पिण्याच्या पाण्याचा आणि जनावरांच्या पाण्याचा प्रश्न काही प्रमाणात सुटण्यास मदत होईल.

# गोपाळनगर येथील बालविवाह रोखण्यात प्रशासनाला यश

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**राळेगाव, दि.२७:** तालुक्यातील गोपाळनगर पारधी बेडा येथे आज, रविवारी, दि. २७ एप्रिल रोजी होणारा बालविवाह प्रशासनाच्या सतर्कतेमुळे रोखण्यात आला. अंगणवाडी सेविका सरला आडे व सचिव शंकर मुजमुले यांनी दिलेल्या माहितीवरून ही कारवाई करण्यात आली.

अंगणवाडी सेविका सरला आडे, सचिव शंकर मुजमुले व पर्यवेक्षिका स्नेहा अनपट यांनी बालविवाहाबाबत बालविकास प्रकल्प अधिकारी सागर विठ्ठलकर यांना माहिती दिली. त्यांनी तत्काळ तहसीलदार अमित भोईटे, गटविकास अधिकारी केशव पवार व जिल्हा महिला बालविकास अधिकारी विशाल जाधव यांना सूचित केले. जाधव यांनी संरक्षण अधिकारी अविनाश पिसुरडे यांच्या नेतृत्वात पथक पाठवले. तहसीलदार भोईटे व बीडीओ पवार यांनीही स्थानिक पातळीवर समन्वय साधला. घटनास्थळी तलाठी रूपेश चचाने, सरपंच किसना झाडे, उपसरपंच प्रतिभा फुलमाळी, चाइल्ड लाइन सुपरवायझर गणेश आत्राम, पोलिस विभागाचे गोपाल जाचकर, आशा सेविका विभा मंगाम, कोतवाल मंजूषा सलाम यांच्यासह प्रशासकीय पथकाने मुला-मुलीच्या आई-वडिलांची समजूत घातली. बालविवाहाचे दुष्परिणाम समजावून सांगितल्यावर त्यांनी स्व:खुशीने विवाह रद्द केला. या यशस्वी कामगिरीबद्दल जिल्हाधिकारी विकास मीना यांनी राळेगाव प्रशासनाचे व सरला आडे, शंकर मुजमुले यांच्यासह संपूर्ण टीमचे अभिनंदन केले आहे.